'प्रस्तुत पुस्तक एक बेमालूम 'वाङ्मय चौर्य' आहे हे निराळे सांगण्याचे कारण नाहीच! 'मॅन्स वर्ल्डली गुड्स', 'जॉग्रफी ऑफ कॅपिटॅलिझम्' अशी काही पुस्तके वाचनात आली. समृद्ध (Haves) व असमृद्ध (Have nots) अशा भांडवलदार राष्ट्रांमधील स्पर्धा निसर्गावर आक्रमणास कारणीभूत होते हेही वाचले. राष्ट्रवाद, आर्थिक स्वयंपूर्णतेच्या कल्पना व त्या मागील मनोभूमिका यांची चर्चा करणारे काही वाङ्मयही वाचनात आले; मग संकलित निवेदन प्रसिद्ध करून पाहण्याचा मोह टाळता येईना! जागतिक निसर्ग-संपत्तीचा व तीसाठी मानवाने चालविलेल्या उलाढालींचा हा एक वृत्तांत आहे. ही माहिती अनेक पुस्तकांतून उचल करून काढावी लागल्याने या पुस्तकाला स्वतंत्र लेखन म्हणून काहीच मोल नाही.'

या पुस्तकाच्या आरंभीच लेखकाने तसे म्हटले आहे. यापुढे भांडवलशाही समाजरचना व अर्थशास्त्र यांचा निभाव लागणे कठीण आहे; कठीण होऊ लागला आहे. त्यास जी पार्श्वभूमी आहे तिची कल्पना सामान्य माणसाला यावी एवढाच पुस्तकाचा उद्देश आहे. पुस्तकात घातलेली आकडेवारी युद्धपूर्वकालीन आहे.

हिंदुस्थान हा समृद्ध देश थोडाफार उपेक्षिला गेला, त्याचे कारण, निसर्गसंपत्तीचा कबजा आतापर्यंत तिऱ्हाईत राष्ट्राकडे होता. अद्यापि ती अवस्था संपूर्ण नष्ट होण्याची आशा नाही. आपली राजकीय घडण अद्यापि पूर्णावस्थेला गेलेली नाही. तशात परकीय भांडवलाला दरवाजे खुले करण्यात आल्याची नवी घोषणा करण्यात आली असल्याने पाश्चात्यांच्या आर्थिक साम्राज्यवादामधून आपण अद्यापि सुटू शकलो नाही. संरक्षण, स्वयंपूर्णता, राष्ट्रवाद हे सर्व आर्थिक पद्धतीमधील भांडवलशाही दोष आपल्या देशात आहेत, हे लेखकाचे तत्कालीन निरीक्षण होते.

*अनंतराव कुलकर्णी व श्री.सोमण यांनी संचालक म्हणून 'प्रगती प्रकाशन'च्या नावावर एप्रिल १९४९ मध्ये हे पुस्तक काढले, मिरजेचे तात्या शिखरे यांच्या नवभारत प्रेसने ते छापले. प्रयत्नपूर्वक अशी अभ्यासपूर्ण पुस्तके प्रकाशित करण्याचे हे व्रत होते. मूळ पुस्तकाचे मुखपृष्ठ ओतारी यांनी केले, तरी ते उपलब्ध झाले नाही. अर्पणपत्रिकेत म्हटले आहे, ''भांडवलशाही अनर्थशास्त्राने निर्माण केलेल्या आसुरी समाजरचनेपासून जागतिक मानवाची सुटका करण्यासाठी धडपडणाऱ्या व ग्रामीण अर्थशास्त्राच्या प्रस्थापनेसाठी आयुष्यभर तळमळणाऱ्या महात्माजींना सादर समर्पण.''*

# नि स र्ग-सं प त्ती

आणि

# मा न व

:लेखक:
**दत्त आपटे**
B.A.D.P.Ed.
सांगली


•

किंमत ३ रुपये

**प्र ग ति प्र का श न**

सांगली.


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १ | ४६५ |
| २ | ४६९ |
| ३ | ४८० |
| ४ | ४८६ |
| ५ | ५९३ |
| ६ | ५०३ |
| ७ | ५१५ |
| ८ | ५२४ |




# निसर्ग-संपत्ती आणि मानव

## प्रस्तावना

भांडवलशाहीचा कडवा निषेध करण्यासाठीच या ग्रंथाचा जन्म झाला आहे! आजपर्यंत पश्चिम युरोप व अमेरिका या खंडांतील भांडवलशाही राष्ट्रांनी आफ्रिका आणि आशिया खंडांतील मागासलेल्या लोकांना पद्धतशीर नागविलेले आहे. या प्रदेशातील निसर्गसिद्ध कच्चा माल लुबाडण्याच्या इच्छेतूनच मुळी साम्राज्यवादाचा जन्म झालेला आहे! गेली दोन्ही महायुद्धे जमेस धरून अलीकडच्या काळात झालेल्या सर्व युद्धांची कार्यकारण मीमांसा केली असता एकाच गोष्टीचा प्रत्यय येतो. व्यापारी दृष्टीने पुढारलेल्या राष्ट्रांनी न्यायनीतीची आणि स्वातंत्र्याची बिरुदे मिरविली असली तरी त्यांचा अंतस्थ हेतू स्पष्ट होता. आपल्यासाठी परदेशांतील निसर्गसिद्ध कच्चा माल हस्तगत करणे आणि स्वत:च्या तयार मालासाठी परक्यांच्या बाजारपेठा जिंकणे हाच या राष्ट्राचा अंतस्थ हेतू होता यात शंका नाही.

मार्क्सवादी दृष्टिकोणातून इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यास या मीमांसेत प्रथमदर्शनी काही नावीन्य आढळणार नाही. परंतु श्री.आपटे यांनी आपल्या ग्रंथातून मार्क्सच्या सिद्धांताचा सांगाडा मांडण्याचा प्रयत्न केला आहे इतकेच नव्हे तर प्रत्येक ठिकाणी मार्मिक आणि उद्बोधक उदाहरणे आणि संदर्भ पुरवून त्यांनी आपल्या विवेचनात जिवंतपणा आणला आहे. भांडवलशाहीच्या शोषणाचा इतिहास त्यांनी अत्यंत सविस्तर व सूक्ष्मरितीने मांडला आहे. भौगोलिकदृष्ट्या त्यांनी जगाचे चार विभाग कल्पून औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांनी मागासलेल्या राष्ट्रांच्या प्राणिज, खनिज आणि वनस्पतीजन्य निसर्गसंपत्तीवर कशी धाड घातली याचे मार्मिक चित्रण केले आहे. शास्त्रीय विवेचनात श्री.आपटे यांनी कुठेही सारवासारव न करता सर्वत्र सडेतोड वृत्ती दाखविली आहे. या ग्रंथातील स्पष्ट आणि निर्भीड मीमांसा वाचून, मागासलेल्या बहुजनसमाजावर निर्दय आणि निष्ठुर अशा भांडवलदार वर्गाने जे अमानुष अत्याचार केले त्याची पुरेपूर साक्ष पटते.

परंतु अशा प्रकारे भांडवलशाहीचा कडाडून निषेध करताना पुष्कळवेळा एक चूक होण्याचा संभव असतो. आधुनिक भांडवलशाही युगाच्या आरंभी भांडवलशाहीमुळे जे काही प्रागतिक आणि क्रांतिकारक बदल घडून आले ते अशा निषेधाच्या वेळी विचारवंताच्या दृष्टीआड होण्याची शक्यता असते. पंधराव्या शतकापासून ते अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत जवळजवळ तीनशे वर्षांच्या अवधीत युरोपखंडात तीन मोठ्या क्रांती घडून आल्या. पहिली राजकीय दृष्ट्या धर्माचे वर्चस्व झुगारून देणारी दुसरी भौतिक शास्त्राच्या सामर्थ्याचा आणि व्याप्तीचा प्रत्यय आणून देणारी, वैज्ञानिक क्रांति, आणि व्यक्तिजीवनात आणि समाजजीवनात ऐहिक सुखांची रेलचेल करून टाकणारी तिसरी औद्योगिक क्रांति! या क्रांतिकालात इंग्लंड आघाडीवर उभे होते; तरी इतर राष्ट्रांनाही या तिन्ही प्रकारच्या क्रांतींना

लवकरच तोंड द्यावे लागले. अगदी आरंभी या राष्ट्रांनी नव्या आणि जुन्या जगाशी केवळ व्यापारी संबंध जोडून अफाट संपत्ती कमाविली. या संपत्तीतूनच व्यापारी भांडवलाचा जन्म झाला! नंतरच्या काळात ज्या औद्योगिक भांडवलाचा इमला उठला तो या व्यापारी भांडवलाच्याच पायावर, यात शंका नाही. मागासलेल्या राष्ट्रांतील मनुष्यबळ आणि मालमत्ता यांचा पद्धतशीर अपहार करून त्यांच्या जोरावर भांडवलवाल्यांनी भांडवलासाठी प्रचंड साधनसामग्री जमा केली. अर्थसंचयासाठी लूटमार; तज्जन्य प्रचंड भांडवल, साधनसामग्री, त्यातून अधिक अर्थसंचय; असे हे चक्र फिरू लागले! 'अर्थसंचय अधिक अर्थसंचय!' असा मोझेस आदि तत्ववेत्ते जो आदेश देत होते त्याचे रहस्य तरी हेच होते.

अशा प्रकारे मध्य युगातल्या केवळ पोटभरू आणि प्रगती पराङ्मुख अर्थकारणाचा नि:पात करून अमर्याद उत्पादन करणाऱ्या भांडवलशाहीने त्याची जागा घेतली. राजकीयदृष्ट्यादेखील, सरंजामशाहीतील बेबंदशाहीचा बीमोड करून आधुनिक काळातील केंद्रीय आणि राष्ट्रीय शासनसंस्थेची उभारणी केली. सध्याच्या काळात तरी तात्त्विकदृष्ट्या भांडवलशाहीला कोणी वाली उरला नाही. त्यामुळे असे झाले आहे की, कोणीही ताज्या रक्ताच्या समाजवाद्याने उठावे व भांडवलशाहीवर तोंडसुख उगवून घ्यावे! अशा वेळी स्वत: मार्क्सने भांडवलशाहीच्या प्रथमावस्थेतील कार्याबद्दल जे गौरवोद्गार काढले आहेत त्याचा उल्लेख करणे क्रमप्राप्त होते. 'आपल्या उत्पादन शक्तीने मनुष्य केवढा चमत्कार करू शकतो याचा प्रत्यय जर कोणी पहिल्याने आणून दिला असेल तर तो या भांडवलदार वर्गानेच होय यात शंका नाही. इजिप्तचे मनोरे, रोमचे कालवे आणि गोथिक पद्धतीची भव्य चर्चेस् या गोष्टी विस्मयकारक खऱ्या; परंतु त्याहूनही आश्चर्याने थक्क करून सोडणाऱ्या गोष्टी भांडवलदार वर्गाने केलेल्या आहेत. याच वर्गाच्या कार्यामुळे लहानथोर राष्ट्रे सुसंस्कृत झाली. मोठमोठी शहरे वसवून बहुजनसमाजाला ग्रामीण जीवनातल्या अज्ञानात जे आजवर पिचत पडावे लागले होते त्यांतून मुक्त केले. आपल्या अवघ्या शंभर वर्षांच्या हयातीत प्रचंड आणि अवाढव्य उत्पादनशक्ती निर्माण करून गतकालातील, सर्व प्रकारच्या उत्पादन शक्तीवर मात केली आहे.' अर्थात, ही सर्व प्रगती करताना त्यावेळच्या क्रांतिवादी भांडवलशाही समाजातील इतर सर्व वर्ग श्रमाच्या आणि सुखाच्या दृष्टीने खर्ची घालावे लागले यात शंका नाही. परंतु एका विशिष्ट कालात ही घटना अपरिहार्यच होती. फार तर, या प्रगतीचा वेग थोडा कमी असावयास पाहिजे होता एवढीच अपेक्षा आपण त्यांच्याकडून करू शकलो असतो.

प्रगतीच्या या झंझावाती वेगामुळे सिसमंडी म्हणतो त्याप्रमाणे काही पिढ्यांची जी कर्तृत्वशक्ती मातीमोल झाली तिला वाव मिळावयास हवा होता. परंतु या भांडवलदार वर्गाने आंतरराष्ट्रीय समाजवाद्यांची भूमिका स्वीकारावयास हवी होती अशी अपेक्षा करणे हे केवळ अनैतिहासिक दृष्टिकोणाचे द्योतक होय. ही दृष्टी नि:पक्षपाती चिकित्सकाची नसून पक्षनिष्ठ क्रांतीवाद्याची आहे. या जातीवाल्या क्रांतिवाद्यांची दृष्टी उज्वल भविष्यकालीन स्वप्नांनी धुंद झालेली असल्यामुळे वर्तमानकालीन राजकीय आणि आर्थिक घडामोडीकडे ते एका साचेबंद आणि ठोकळेबाज दृष्टीने पाहात असतात. रुथ फिशर या लेखिकेने

श्री.दत्त आपटे यांनी लिहिलेले ''निसर्ग-संपत्ति व मानव'' हे पुस्तक मी समग्र वाचून पाहिले. या पुस्तकातील पानन्पान साधार माहितीने व सोपपत्तिक विवेचनाने भरलेले आहे. भांडवलशाहीवर आधारलेल्या व भांडवलशाहीचे पोषण करणाऱ्या समाजरचनेत निसर्ग-संपत्तीची धूळधाण होऊन मानव कसा अधिकाधिक दु:खी व अगतिक बनत जातो, याची मीमांसा प्रस्तुत पुस्तकात बहारीची करण्यात आली आहे. संकुचित राष्ट्रवादाच्या किंवा राष्ट्रीयत्वाच्या कल्पना सोडून देऊन विश्वकुटुंबवादाचा स्वीकार केल्याखेरीज आपली विस्कटलेली घडी नीट बसावयाची नाही, असा जो सिद्धांत पुस्तकात मांडण्यात आला आहे तो निरपवाद आहे. निसर्ग-संपत्तीपैकी प्रत्येक बाब घेऊन तिच्या उत्कर्षापकर्षाची जी कारणे देण्यात आली आहेत ती अत्यंत सरस व एका अर्थाने हृदयविदारक आहेत. या दृष्टीने हे पुस्तक मराठी भाषेत केवळ अपूर्व असेच आहे. इतके उपयुक्त पुस्तक लिहून समाजाला चाकोरीबाहेरचे विचार करायला लावल्याबद्दल श्री.आपटे यांचे कोणीही अभिनंदनच करील.

**-डॉ.वि.पां.दांडेकर**
**एम.ए.पीएच.डी., बडोदे**

आपल्या 'स्टॅलिन आणि जर्मन कम्युनिझम' या ग्रंथात रोझा लक्झेम्बर्ग या लेखिकेची याच जातीत गणना केली आहे. ती म्हणते 'लक्झेम्बर्गने अती दूरच्या भविष्यकालातील संपूर्ण नियोजित अर्थपद्धतीवर उभी असलेली समाजवादी जीवनाची जी चित्रे उराशी बाळगली होती त्यांचा तिच्या तत्कालीन राजकीय व आर्थिक मतावर स्पष्ट ठसा उमटलेला होता. या उलट लेनिनची दृष्टी ही नेहमीच दूरच्या रूपांच्यापेक्षा तत्कालीन प्रश्नांकडे, आणि कल्पनारम्यतेपेक्षा व्यवहारिकदृष्ट्या शक्याशक्यतेकडे अधिक होती हे लक्षात ठेवले पाहिजे, आंतरराष्ट्रीयदृष्ट्या मागासलेल्या लोकांची पिळवणूक करणे; कॉफी, गहू यांसारख्या जीवनोपयोगी वस्तूंचा नाश करणे या गोष्टी उघड उघड निषेधार्ह वाटतात. परंतु भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विकासक्रम लक्षात घेता ही घटना अपरिहार्यच होती हे लक्षात ठेवले पाहिजे. पुरातन कालापासून विषुववृत्तावरील प्रदेशांत रबरांच्या झाडांची जंगले माजून राहिली आहेत. परंतु ज्यावेळी भांडवलशाही वर्गाने रबराचे नानाविध उपयोग शोधून काढले तेव्हाच त्यांचे औद्योगिक महत्व प्रकट झाले ही गोष्ट कशी विसरता येईल? अर्थात असे करताना त्यांनी आपल्या ज्ञानाची जबर किंमत मानवजातीवर आकारली किंवा या ज्ञानाचा उपयोग करताना मनुष्यबळ त्याने अगदीच मातीमोलाने घेतले ही गोष्ट खरी आहे. परंतु सर्वच गोष्टी समाजवादी नीती-निकषावर घासून पाहाता येणार नाहीत. भारताकडे पाहिले तरी सर्व तऱ्हेच्या नैसर्गिक संपत्तीने हा देश समृद्ध आहे, असे मानण्यात येते. परंतु या सुप्त संपत्तीचे अर्थशास्त्रीय संशोधन करावयाचे झाल्यास परकीयांच्या ज्ञानाची मदत घेतल्याशिवाय चालेल काय? मागणीपेक्षा ज्याचा पुरवठा कमी आहे अशा वस्तूंची बाजारात अधिक किंमत येते हा तर अर्थशास्त्रातला प्राथमिक सिद्धांत आहे. सरंजामशाहीतील बेदाद लूटमारीपेक्षा भांडवलशाहीतील पद्धतशीर पिळवणूक अधिक बरी असे दगडापेक्षा वीट मऊ या नात्याने म्हणता येईल.

श्री.आपटे यांचा दृष्टिकोण उघड उघड आंतरराष्ट्रीय आहे. कोणतेही राष्ट्र स्वत:पुरते जगू अगर मरू शकत नाही असा त्यांचा विश्वास आहे. एक जगाची कल्पना त्यांना अभिप्रेत आहे. जागतिक समाजवादाचा हा सिद्धांत आपल्याबरोबरच आवश्यक असा दुसरा प्रतिसिद्धांत पुढे आणीत असतो आणि तो म्हणजे श्रमशक्तीची प्रादेशिक विभागणी हा होय. यासंबंधी त्यांनी आपल्या पुस्तकात केलेले विवेचन त्या विचारसरणीतील दोष व तर्कदुष्टता दाखवून देण्यास पुरेसे आहे. श्री.आपटे म्हणतात, ''भौगोलिकदृष्ट्या एखाद्या जिनसाचे उत्पादन ज्या ठिकाणी जास्तीत जास्त किफायतशीर होणे शक्य आहे, अशा ठिकाणीच ते करणे श्रेयस्कर आहे व अशा दृष्टीने व्यापार व उत्पादन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संस्था अस्तित्वात येऊन, जागतिक निसर्ग संपत्तीचे उत्पादन व शोषण पद्धतशीरपणे झाल्यास बहुजनसमाज तर सुखी होईलच; पण महायुद्धासारख्या आपत्तीही टळतील.''

रोझा लक्झेम्बर्गने आपल्या विचारसरणीत हा दोष प्रगट केला आहे. लेनिनमध्ये व तिच्यामध्ये खरा विवाद्य मुद्दा हाच होता. पोलंडच्या सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाने पसार केलेल्या एका ठरावात तिच्या या विचारसरणीचा अर्थ सुस्पष्ट झाला आहे.

''समाजवादी समाजरचनेमध्ये राष्ट्राला एखाद्या आर्थिक घटकाचे स्वरूप येईल असे मानण्यास काहीच आधार नाही. कोणत्याही मूलभूत कल्पनेप्रमाणे 'राष्ट्र' मानून त्यामधील म्हणजे एक विशिष्ट सांस्कृतिक व विशिष्ट भाषा बोलणारा लोकसमूह होय!'' जग हे एक राष्ट्र मानून त्यामधील संपत्तीचा समान उपभोग घेण्याच्या समाजवादी कल्पनेचा पोलिश सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाने किती घातुक मर्यादेपर्यंत विपर्यास केला याची कल्पना पुढील उताऱ्यावरून येण्याजोगी आहे. ''पोलिश कामगारांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य हे ध्येय कधीच मानले नाही. दोन महायुद्धांच्या अनुभवाच्या प्रकाशात पाहाता राष्ट्रीय पिळवणुकीविरुद्ध लढण्याचे साधन म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्याची घोषणा करणे हे सार्थ नाही. समाजवादाच्या मूलभूत कल्पनेला हरताळ फासणारी अशी ही बाब आहे.''

*-(रुथ फिशरकृत 'स्टॅलिन आणि जर्मन कम्युनिझम'मधून)*

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यचळवळीच्या प्राथमिक कालातील हिंदी कम्युनिस्टांच्या अलिप्ततेच्या भूमिकेवर

या उताऱ्याने बराच प्रकाश पडू शकेल. उलटपक्षी लेनिन हा स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा पाठपुरावा करणारा होता. त्याचे पुढील विचार विचारात घेण्याजोगे आहेत.

''निर्भेळ लोकशाही स्थापू इच्छिणारा विजयी समाजवाद निरनिराळ्या राष्ट्रांच्या सरहद्दी ठरविण्याची लोकशाही पद्धत गुंडाळून ठेवणार की काय? लोकांच्या सहानुभूतीची कदर करणार की नाही? आमचे पोलिश सहकारी मार्क्सवादाकडून साम्राज्यवादी अर्थवादाकडे कसे झुकत आहेत याची कल्पना वरील प्रश्नांवरून सहज येईल!''

आंतरराष्ट्रीय समाजवादाच्या ध्येयासंबंधी विचार करताना दोन मुद्द्यांचा ओझरता का होईना पण उल्लेख करणे मला श्रेयस्कर वाटते. प्रत्येक देशाने आपल्याला नैसर्गिकरित्या अनुकूल अशा वस्तूंचे उत्पादन करावे या सर्वसामान्य तत्त्वाला कोणाचाच फारसा विरोध असणार नाही. पण हे तत्त्व गणिती सिद्धांताप्रमाणे अटळ आणि अढळ मानण्याची आवश्यकता नाही. एकोणीसाव्या शतकाच्या आरंभी भौगोलिक मर्यादांनी नियंत्रित केलेल्या श्रमविभागाच्या कल्पना जशाच्या तशा आजच्या व्यवहारात उतरवाव्यात एवढे पावित्र्य त्यांना देण्यात अर्थ नाही. कच्चा माल ही निसर्गाची देणगी आहे, पण या मालाचे महत्व क्रमाक्रमाने आता कमी होत आहे. शास्त्रीय ज्ञान आता आंतरराष्ट्रीय भूमिकेवर येऊन बसले आहे. तुलनात्मक फायद्याच्या तत्वावर या गोष्टीचा बराच मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

दुसरे म्हणजे जागतिक समाजवादामध्ये अभिप्रेत असलेली जीवसृष्टीय ऐतिहासिक सातत्याची कल्पना फार ओढून धरण्यातही अर्थ नाही. सध्याच्या परिस्थितीत तरी निदान मोठ्या राष्ट्रांना त्यांच्या नैसर्गिक आयुष्यक्रमाची सर्वांगीण वाढ करून आपणास सर्व दृष्ट्या व सर्व बाजूंनी संपूर्ण उत्क्रांत होण्यास काही प्रत्यवाय असेलसे वाटत नाही. हिंदने सदा सर्वकाळ शेतीप्रधान देश म्हणून शेतकरीच राहावे काय?

जागतिक समाजवादाची कल्पना अस्तित्वात आली, निसर्गसंपत्तीचे उत्पादन-शोषण, पक्क्या मालात रूपांतर, यांचे जागतिक समाजवादी पद्धतीने नियंत्रण झाले, तरी राष्ट्राराष्ट्रामधून होणारा श्रमविभाग, उत्पादनाची योग्य प्रमाणात सर्व राष्ट्रांमध्ये होणारी विभागणी यासंबंधी अनेक बोचक व गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

जागतिक समाजवादाच्या मार्गातील अडचणीबाबत आजच काही भविष्य वर्तविणे अप्रस्तुत व अप्रासंगिक आहे ही गोष्ट जरी खरी असली तरी अशा काही शंका येणे स्वाभाविक आहे.

मार्क्सचा समाजवाद हा शास्त्र आणि तपशील यांत एकवाक्यता राखणारा आहे. ते निव्वळ शास्त्र नसून प्रत्यक्षात उतरणारे ते शास्त्र आहे. तत्कालिक भविष्यकालीन प्रश्न सुसंगतपणे सोडविणारे ते एक शास्त्र आहे. मार्क्सवादाची खरी कसोटी यातच आहे हे यावरून दिसून येईल. कारण मार्क्सवाद हा नुसताच ध्येयवाद नाही असे नेहमीच म्हणण्यात येते.

केंब्रिज विश्वविद्यालयातील विख्यात अर्थशास्त्रज्ञ मार्शल यांच्यासंबंधी असे म्हणण्यात येते की, त्यांनी आपल्या पुस्तकात दिलेल्या टीपा इतक्या अर्थपूर्ण व सूचक होत्या की, पुढे आलेल्या अर्थशास्त्रज्ञांना त्यावर ग्रंथ लिहावे लागले. श्री. आपट्यांनी सूचित केलेले मुद्दे तितकेच अर्थपूर्ण व विचाराला चालना देणारे ठरले तर त्यांना आपले परिश्रम पूर्णपणे सार्थकी लागले असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही.

*(१८-४-४९)*

***-ना.अ.मावळंकर.***
***विलिंग्डन कॉलेज,सांगली***

## विषय प्रवेश-१

देशाच्या भौगोलिक परिस्थितीचा परिणाम त्या देशाच्या आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावर होत असतो ही गोष्ट निर्विवाद आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणून आपणास इंग्लंडकडे पाहता येईल. इंग्लंडचा व्यापारी व आरमारी दर्जा आज सर्वश्रुत आहे. युरोपखंडाच्या पश्चिम टोकाला या बेटाला मिळालेले स्थान व त्याची खनिज संपत्ती या दोन्ही गोष्टी इंग्लिश लोकांना दर्यावर्दी व व्यापारी बनविण्यास बऱ्याच अंशाने कारणीभूत झाल्या आहेत ही गोष्ट काही खोटी नाही. इंग्लिश लोकांचा कपडालत्ता, आहार, चालचालणूक या सर्वांना इंग्लिश हवामान कारणीभूत आहे. इंग्लिश शेतकऱ्याने गहूच पिकवला पाहिजे, त्याला तांदूळ पिकवता येणार नाही. कपड्यासाठी त्याने कापसाऐवजी लोकरच वापरली पाहिजे व लोकरीच्या उत्पादनाकडे लक्ष दिले पाहिजे, म्हणजेच मेंढपाळाचा धंदा पत्करला पाहिजे. लँकेशायरच्या विशिष्ट हवामानामुळे कापसाचे कापड विणण्याच्या अव्वल दर्जाच्या गिरण्या तेथे आहेत. पण या गिरण्यांना लागणारा कापूस मात्र तेथे अजिबात नाही. तेथे त्याचे उत्पादन करणेही इंग्लिशांना शक्य नाही . इंग्लंडचे हवामान त्याला मुळीच अनुकूल नाही, इंग्लंडसारख्या लहानशा बेटावरील भौगोलिक परिस्थितीचे हे परिणाम पाहिल्यानंतर जगातील इतर लहानमोठ्या प्रदेशावर तिची कशी छाप पडत असेल याची सर्वसाधारण कल्पना येण्यास मुळीच हरकत नाही.

पृथ्वीच्या पृष्ठभागाची सर्वसाधारणपणे चार विस्तृत पट्ट्यात विभागणी करण्यात येत असते.

१ विषुववृत्तीय प्रदेश
२ दुय्यम विषुववृत्तीय प्रदेश
३ मध्य प्रदेश
४ ध्रुव प्रदेश

खुद्द विषुववृत्तापासून दक्षिणेकडे व उत्तरेकडे तीस अंशांपर्यंतच्या प्रदेशाला विषुववृत्तीय प्रदेश मानण्यात येते; व या पलीकडे उत्तर व दक्षिण गोलार्धात क्रमाक्रमाने व साधारणत: याच विस्ताराने बाकीचे प्रदेश येतात.

विषुववृत्तीय प्रदेशात सतत पाऊस असल्याने हवा उष्ण व दमट असते. या प्रदेशात हिमपतन ही गोष्ट कधीच दृष्टोत्पत्तीस येत नाही. दुय्यम विषुववृत्तीय प्रदेशात अल्पकाळ टिकणारा व सौम्य असा हिवाळा अनुभवावयास मिळतो. उन्हाळा व हिवाळा या दोन ऋतूंतील उष्ण तापमानात अंतरही बरेच असते व क्वचित प्रसंगी उंच अशा पर्वत शिखरांवरून हिमपतनाचे दृश्यही पाहावयास मिळते. येथून पुढे ध्रुव प्रदेशाकडे जात असताना वाटेत मध्यकटिबंध लागतो. प्रदेश वैशिष्ट्यानुरूप येथे कमीअधिक लांबीचे हिवाळे दृष्टीला पडतात, हिमपतन हे तर या प्रदेशांचे वैशिष्ट्यच आहे. येथील उन्हाळा सौम्य व ऊबदार असतो. दीर्घकालीन हिवाळा व बर्फाच्छादित प्रदेश यांसंबंधी ध्रुव प्रदेशाची प्रसिध्दी सर्वश्रुत आहे. येथे उन्हाळा नावालाच असतो. अंधुक प्रकाश देण्यापलीकडे त्याचा फारसा उपयोग होत नाही. उन्हाळ्यात क्वचित काही ठिकाणी बर्फ वितळून फुले डोकी वर काढतात. ध्रुवप्रदेशाचे हेच काय ते निसर्गसौंदर्य !

या चारही प्रदेशांत दिसून येणारे हवामानाचे भिन्नत्व तेथे निर्माण होणाऱ्या वनस्पतींमध्येही भिन्नत्व निर्माण करण्यास कारणीभूत झाले आहे. वनस्पती जीवनात भौगोलिक परिस्थितीला प्रथम स्थान असल्याने एका प्रदेशातील वनस्पती प्रतिकूल हवामानाच्या दुसऱ्या प्रदेशात सहसा निर्माण होत नाहीत व त्यामुळे त्यांना स्वाभाविकच एक प्रकारे एकदेशीयता प्राप्त होते. मानवी हस्तक्षेपाशिवाय निव्वळ निसर्गाच्या आधाराने वाढणाऱ्या वनस्पतींमध्ये ही गोष्ट विशेष प्रामुख्याने दिसून येते. पृथ्वीवरील जंगलमय प्रदेशाची पाहणी करताना वनस्पतींचे हे वैशिष्ट्य ठळकपणाने नजरेला येते. अधिक पावसाच्या सर्वच प्रदेशांत जंगलाची वाढ होते ही गोष्ट खरी, पण सर्वच जंगलांत एकाच प्रकारच्या वनस्पती वाढतात असे मात्र मुळीच नाही. रबर, टीक अगर मोहोगनी ही विषुववृत्तीय जंगलमय प्रदेशात दिसून येणारी झाडे, मध्य कटिबंधातील जंगलात वाढणाऱ्या ओक अगर ॲश झाडांच्या जोडीला कधीही दिसणार नाहीत. ध्रुव प्रदेशालगतच्या थंड प्रदेशात दिसून येणारी शंक्वाकृती अगर सूचीपर्ण वृक्षराजी वर नमूद केलेल्या

दोन प्रदेशांमध्ये कोठेच पाहावयास मिळणार नाही. कमी पावसाच्या प्रदेशात वनस्पतीची समृध्दता फारशी असत नाही, पण त्या प्रदेशातही दिसणाऱ्या तृणांमधून हवामानानुरूप फरक दृष्टीला पडतोच. ध्रुव प्रदेशात वाढणाऱ्या शेवाळापासून तो विषुववृत्ताजवळील प्रदेशात वाढणाऱ्या दहा दहा फूट उंचीच्या गवतापर्यंत त्याच्या अनेकविध जाती प्रदेशागणिक आढळून येतात.

काही वनस्पतींच्या बाबतीत मात्र माणसाने ढवळाढवळ करून त्याना त्यांच्या मूळ प्रदेशापासून दूर नेऊनही लागवडीत आणले आहे. तंबाखू ही वनस्पती मूळची मेक्सीको व मध्य अमेरिका येथील आहे. परंतु या वनस्पतीने अर्थोत्पादनाला लावलेला हातभार व तिने मानवावर मिळविलेला ताबा यामुळे तिचे उत्पादन तिच्या जन्मभूमीपासून हजारो मैल दूर असलेल्या प्रदेशांतूनही मानवाने महत् प्रयासाने चालू केले आहे. या वनस्पतीची रानटी अवस्था आता जाऊन मानवी संस्कारांनी तिला एक नवीनच जीवनक्रम प्राप्त झाला आहे. कॅनडा, सुमात्रा, स्वीडन, तुर्कस्तान, दक्षिण आफ्रिका या हवामानाच्या दृष्टीने अत्यंत भिन्न असलेल्या प्रदेशांतूनही आता तंबाखूची लागवड चालू झाली आहे. पण सर्व हवामानांत व प्रदेशांत वाढू शकणाऱ्या तंबाखूसारख्या वनस्पती फारच थोड्या असतात. शिवाय प्रचंड प्रमाणात त्यांचे उत्पादन करावयाचे म्हटल्यास मूळ रानटी अवस्थेत या वनस्पती ज्या प्रदेशात सापडल्या त्या ठिकाणीच ते होऊ शकते. इतरत्र करण्यात येणारे त्यांचे उत्पादन तांत्रिक स्वरूपाचे राहून मानवाचे कौशल्य दाखविण्यापुरतेच ते मर्यादित राहते. विशेष तऱ्हेचे उष्ण तापमान व पर्जन्य या दोन गोष्टी वनस्पतीजीवनात प्रमुख असल्याने त्याच्या उत्पादनाबाबत मानवाला बऱ्याच अंशाने निसर्गावरच विसंबून राहावे लागते.

प्राणीसृष्टीच्या बाबतीतही जवळजवळ हीच स्थिती आहे. मनुष्याने आपल्या वर्चस्वाखाली व पालनपोषणाखाली आणलेले गायी, म्हशी, घोडे असे काही प्राणी सोडल्यास, ज्या प्राण्यांचा आयुष्यक्रम निसर्गसिध्द आहे असे प्राणी ठराविक भौगोलिक परिस्थितीतच आढळतात. पेंगुइन, वालरस , ओटर या प्राणीजाती याचे उत्तम उदाहरण म्हणून घेता येतील. मानवाने या प्राण्यांच्या नैसर्गिक जीवनक्रमात बदल केल्यास अगर त्यात व्यत्यय आणल्यास त्यांच्या जीवनावर प्रतिकूल परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. इंग्लंडमध्ये २० शेरापर्यंत दूध देणारी गाय हिंदुस्थानात येताच निरुपयोगी ठरते असा अनुभव आहे.

पृथ्वीवर इतस्तत: विखुरलेल्या मानवसमाजाचे सूक्ष्म परीक्षण करताच निसर्गस्थितीचा त्याच्या जीवनावर झालेला परिणाम स्पष्टपणे दिसून येतो. गौर, पीत, तांबूसकाळा व काळा अशा चार वर्णाचे मानव समाज आज प्रामुख्याने पृथ्वीच्या पाठीवर वावरत आहेत. त्यांचा जीवनक्रम ते ज्या भौगोलिक परिस्थितीत नांदत आहेत तिच्याशी सुसंगत असाच आहे. कृष्णवर्णीय मानव विषुववृत्ताला लागून असलेल्या प्रदेशात आढळतो. जसजसे उत्तरेकडे अगर दक्षिणेकडे सरकत जावे तसेतसे मानवाचा हा रंग उजळ होत जाऊन ध्रुव प्रदेशीय मानव शुभ्र गोरा असतो. मनुष्याच्या बाह्य देखाव्यावरच भौगोलिक परिस्थितीचा परिणाम होतो असे नाही; तर तो त्याच्या स्वभाव व शरीरधर्मावरही होतो. विषुववृत्तावरील उष्ण व दमट हवा नि:संशय निरुत्साहकारक असते. शारीरिक व मानसिक परिश्रमांना जर अत्यंत प्रतिकूल हवामान कोणते असेल तर ते हेच होय! व यामुळे दक्षिण अमेरिका, आफ्रिका, पासिफिक महासागरातील बेटे या प्रदेशांत वावरणारा बराच मोठा मानवसमाज अद्यापि रानटी अवस्थेतच आहे. पिकेल ते खावे व पूर्वापार चालत आलेल्या परंपरेत वावरावे या पलीकडे त्यांच्या जीवनक्रमाला दुसरे वळणच माहीत नाही. या प्रदेशातील जंगलांतून वावरणाऱ्या प्राण्यांना व मानवांना बदल असा ठाऊक नाही. ध्रुवप्रदेशाकडील बर्फमय प्रदेशांत वावरणाऱ्या मानवांचीही हीच अवस्था!! धडाधड किनाऱ्यावर आदळणाऱ्या सागराच्या पर्वतप्राय लाटांचा गंभीर घोष ऐकण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याच आवाजाशी परिचित नसलेल्या येथील मानवाच्या भोवतालच्या निसर्गाचे स्वरूप इतके रौद्र आहे की, जीवित सुरक्षित राहण्यासाठी जागरूक राहण्यापलीकडे तो काहीच करू शकत नाही. शिकार करून पोट भरणे व कसेबसे करून जगणे यापलीकडे त्याला दुसरा कोणताच विचार करणे शक्य नाही.

मध्यकटिबंधातील मानवाला मात्र सुसह्य व उत्साहजनक असे हवामान मिळते व त्यामुळे जगातील आर्थिक, राजकीय, व सांस्कृतिक दृष्ट्या सुधारलेला, पुढारलेला मानव या प्रदेशात पाहावयास मिळतो. या भागातील माणसे शारीरिक अगर मानसिक परिश्रमात कोणालाच हार जाणारी नाहीत.

जगाच्या प्राथमिक अवस्थेत मानव भौगोलिक परिस्थितीने संपूर्णत: नियंत्रित केला जात असे. निसर्गस्थितीपुढे मान तुकवून त्याला राहावे लागे. आज आफ्रिकेच्या जंगलात वावरणारा मनुष्य ज्याप्रमाणे आजूबाजूला मिळणाऱ्या कंदमुळांवर, फळांवर अगर शिकारीवर विसंबून राहतो त्याप्रमाणे प्राचीन काळी सर्वच मानव समाज वावरत असे. यानंतर वस्तुसंग्रह करणे, गुरे पाळणे व त्यांच्याकडून मानवी जीवनाला पोषक अशी कार्ये करून घेणे वगैरे गोष्टी मानव क्रमाक्रमाने करू लागला. मानवी जीवनाला पोषक, उपयुक्त अशा वस्तूंची निर्मिती करून घेण्याकडे मानवाची प्रवृत्ती होऊ लागताच मानवी प्रगतीची पाऊले झपाट्याने पडू लागली. निसर्गावर विसंबून राहणारा मानव त्याच्यावर सत्ता गाजविण्याची, त्याला स्वत:साठी राबवून घेण्याची इच्छा बाळगू लागला व या इच्छेतूनच आजच्या यांत्रिक युगाचा उदय झाला. आपल्या निर्मितीचा जादा भाग दुसऱ्याला देऊन दुसऱ्याच्या निर्मितीचा जादा व आपणास उपयुक्त असा भाग बदलात घेण्याची प्रथा मध्ययुगीन मानवाने अस्तित्वात आणली व तिनेच व्यापारशास्त्राला जन्म दिला. व्यापाराच्या उदयाने एक गोष्ट झाली. मानव स्वत:च्या प्रदेशापलीकडे दृष्टी टाकू लागला. आपल्या प्रदेशात दुर्मीळ असे पदार्थ बाहेरच्या प्रदेशातून आणण्याची धडपड सुरू झाली. प्रवासाचे व दुसऱ्या देशाशी दळणवळण वाढविण्याचे वेड माणसाला लागले. दळणवळणाची नवी नवी साधने अस्तित्वात आणून निसर्गाचे अडथळे दूर करण्याची खटपट चालू झाली. भूमध्य समुद्रालगतच्या प्रदेशांनी या कामी प्रथम पुढाकार घेतला. सोने, कातडी, कापड इत्यादी जिनसांचा व्यापार त्यांनी प्रथम चालू केला. आपल्या देशातील वस्तूंचे उत्पादन जास्तीत जास्त वाढवून त्याच्या जिवावर दुसऱ्या देशांतील माल पैदा करण्याची त्यांची खटपट आजच्या व्यापारी युगाचा पाया घालण्यास कारणीभूत झाली. विनिमयाची हीच प्रथा त्याच स्वरूपात- पण आधुनिक साधनांच्या जोरावर चालू राहिली असती तर मानवसमाजाचे कोटकल्याण झाले असते, कितीतरी नासाडी आणि परिश्रम वाचले असते. यंत्रयुगाने देशादेशातील अंतर नाहीसे केले आहे. अशा स्थितीत मालाचे उत्पादन व शोषण, उत्पादन करणाऱ्यांचे सामर्थ्य व शोषण करणाऱ्यांची गरज या दोहोंचा पूर्ण विचार करून घेण्यात आले असते. नफेबाजीला वाव न देता विनिमयाला प्राधान्य देऊन बहुजनसमाजाचे सुख डोळ्यापुढे ठेवण्यात आले असते तर मानवाला काहीच कमी पडले नसते. त्याच्यावर दु:ख, यातना सहन करण्याची पाळी आली नसती. पण उत्पादन गेले एका विशिष्ट वर्गाचे हाती ! त्या वर्गाची सर्व दृष्टी नफ्यावर, वैयक्तिक अर्थसंचयावर !! यामुळे उत्पादनात व व्यापारधंद्यात सारासार असा विचारच राहिला नाही. मध्य कटिबंधातील राष्ट्रे निसर्गत:च अनुकूल परिस्थितीत असल्याने स्वाभाविकच उत्क्रांत, वरील स्वार्थी प्रवृत्तीचा त्यांनी आश्रय केल्याने, उरलेल्या प्रदेशावर त्यांचे आर्थिक व राजकीय दास्य स्वीकारण्याची पाळी आली . मध्यकटिबंधातील राष्ट्रांच्या अर्थलालसेला त्यांना बळी पडावे लागले.

भांडवलशाही युगाच्या उदयाने जागतिक व्यापाराला लागलेले वळण अगदीच निराळे झाले. गरजेपुरता होणारा विनिमय मागे पडून बहुजन समाज व निसर्गसंपत्ती यांची लूटमार करण्याच्या अनेक योजना अमलात आणणे हे व्यापाराचे आद्य सूत्र झाले. पैशाच्या मागे लागलेल्या भांडवलदार वर्गाने निसर्गाशी अहोरात्र स्पर्धा चालू ठेवून व भौगोलिक परिस्थितीवरही विजय संपादन करून उत्पादन करण्यास सुरुवात केली. त्यांचे सारे लक्ष नफेबाजीकडे असल्याने त्याच्या संशोधनाला एक प्रकारे गौणत्व प्राप्त झाले.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात चालू यांत्रिकयुगाची सुरुवात झाली. एका देशातील पदार्थ हां हां म्हणता दुसऱ्या देशात जाऊ लागले. जगाचा कानाकोपरा धुंडाळून निसर्गसंपत्तीचा कबजा घेण्याची स्पर्धा यांत्रिक युगात पुढारलेल्या राष्ट्रांमध्ये सुरू झाली. आंतरराष्ट्रीय व्यापारवृध्दीमुळे देशादेशांतील परस्परावलंबित्व वाढीला

लागले. एके काळी एकलकोंडे व स्वयंपूर्ण असणारे देश देवघेवीच्या संबंधांनी परस्पराशी इतके निगडीत झाले की, या संबंधांत काही कारणाने व्यत्यय निर्माण झाल्यास जीवन अशक्य होण्याची पाळी आली. आजचे इंग्लंड अशा संबंधाचे एक उत्तम उदाहरणच आहे. साम्राज्यातील देशांशी इंग्लंडचे संबंध तुटताच इंग्लिश जनतेचा जीवनक्रम अशक्यप्राय होऊन बसणार आहे.

फार कशाला, अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्राचीसुद्धा हीच स्थिती आहे हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. अमेरिकन नागरिकांच्या गरजा आजच्या जगातील कोणत्याही राष्ट्रातील नागरिकांच्या गरजांच्या मानाने अधिक आहेत. मोटारी, रेडिओ, टेलिफोन, हरतऱ्हेचे कपडे, फौऊंटनपेन्स, साखर, कॉफी, कोको, वर्तमानपत्र, एक ना दोन अनेक वस्तू आज अमेरिकन नागरिकांच्या रोजच्या वापरात आहेत. पण या सर्वच वस्तू अमेरिकेतच निर्माण होतात असे मात्र मुळीच नाही.अमेरिकन नागरिकालासुध्दा निर्भेळ स्वदेशीचा पुरस्कार करणे अशक्य आहे.

कित्येकांची अशी कल्पना आहे की, अमेरिका सर्व बाबतीत 'स्वयंपूर्ण' आहे. पण ही कल्पना चूक आहे! अमेरिकेत कॉफी होईल. पण ती ज्या डब्यात बंद करावी लागते त्या डब्यांना लागणारे जस्त दक्षिण अमेरिकेतील 'बोलेव्हिया' किंवा आशियातील 'मलाया' या प्रदेशांतून आणावे लागते. खुद्द कॉफीला लागणारा 'बुंद', 'ब्राझील', अगर 'कोलंबिया' येथून आणावा लागतो. कॉफीला लागणाऱ्या साखरेसाठी अमेरिकन नागरिकाला 'क्यूबा' अगर ' फिलीपाईन' या बेटांकडे पाहावे लागते. कपड्याला लागणारी लोकर अगर रेशीम ऑस्ट्रेलिया व जपान यांच्याकडून घ्यावे लागते. मोटारींना लागणारे रबर मलाया, डच ईस्ट इंडीज बेटे अगर लिबेरिया ( आफ्रिका) येथून आणल्याशिवाय गत्यंतर नाही. 'क्रोम' साठी ऱ्होडेशियाकडे धाव घेतली पाहिजे तर 'शेलॅक' साठी हिंदुस्थानची याचना केली पाहिजे. मग अमेरिकेने आपल्याच मालावर विसंबून राहावे म्हटले तर ते कसे शक्य आहे? अमेरिकन नागरिकांना स्वदेशीचा उपदेश करू म्हटल्यास तेथील वर्तमानपत्रांनाही ती गोष्ट शक्य नाही. ती बिचारी तरी कोठे सर्वस्वी अमेरिकन असतात? त्यांना लागणारा कागद कॅनडाचा तर छापण्याच्या शाईसाठी लागणारा 'व्हॅंड्यूअम' हा पदार्थ पेरूचा! अमेरिकन नागरिकांचे जीवन जर इतके परावलंबी तर मग इतरांचे पाहावयासच नको !! वस्तुत: यांत वाईट असे काहीच नाही, यंत्रयुगामुळे मानवी जीवनाला प्राप्त झालेली आधुनिकता, विविधता त्याच्या गरजांची अमर्याद वाढ करण्याला कारणीभूत झाली असली तरी त्या गरजा भागविण्याचे सामर्थ्यही त्याला प्राप्त झाले आहे. दोष इतकाच की, गरजा निर्माण करण्याचे व त्या भागविण्याचे कार्य काही विशिष्ट राष्ट्रेच करू पाहातात, व त्यामुळे जगाची कारखानदारी व निसर्गसंपत्ती यांची मिरासदारी फक्त आपणाकडे राहावी अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारी ही राष्ट्रे साम्राज्यवादाच्या मागे लागून जगाची संस्कृती आणि शांतता यांना धोका आणतात. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, जपान, अमेरिका या सर्व राष्ट्रांनी कमी- अधिक प्रमाणात या उचापती करून जागतिक संपत्तीचा अपहार केला आहे, जगातील बहुजनसमाज दरिद्री केला आहे. खुद्द या देशांत तरी संपूर्ण स्वास्थ आहे म्हणावे तर तेही नाही. निर्मितीची साधने हाती असणारा भांडवलदार वर्ग आपली संपत्ती प्रत्यही वाढवीत आहे तर त्यांच्या हाती साधन म्हणून सापडलेला मजूरवर्ग बेकारी, दारिद्र्य यांनी गांजला जात आहे. साम्राज्य निर्माण करण्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या सामान्य इंग्लिश मनुष्याला उद्देशून कार्ल मार्क्स लिहितो,

''हिंदी मनुष्याला दास्यशृंखलेत जखडणारा इंग्लिश शिपाई इंग्लिश भांडवलदाराची दास्यशृंखला स्वत:च्या पायांत अडकवून घेत असतो.'' चालू यंत्रयुगाबद्दल तिरस्कार निर्माण होण्याचे खरे कारण हे आहे. यंत्रयुगाच्या आघाडीवर असलेल्या पाश्चात्य राष्ट्रांची अर्थलालसा व तिने जगावर घातलेला धुमाकूळ यांचे स्वरूप इतके हिडीस आहे की, सात्विक प्रवृत्तीच्या कोणाही व्यक्तीला 'मध्ययुगीन' बनवण्याचा मोह झाल्यास त्यात मुळीच आश्चर्य नाही. या धुमाकुळाची थोडी फार कल्पना यावी यासाठीच हे पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न आहे. जागतिक संपत्तीचा आदर्श विनीमय परस्पर सहकार्याच्या तत्वावर झाल्याशिवाय जगाला खरी शांतता लाभणे कसे शक्य आहे?

●●●

२

पृथ्वीचा प्रथम विचारात घेण्याजोगा महत्त्वाचा भाग म्हणजे विषुववृत्तीय प्रदेश होय. हा प्रदेश विषुववृत्ताच्या दोनही बाजूस पसरलेला असून युरोपखंडाखेरीज बाकीच्या खंडाचा काही ना काही भाग या प्रदेशात आल्याशिवाय राहात नाही. या प्रदेशाचा बराचसा भाग अद्यापि असंशोधित व मागासलेला आहे. कोणत्या ना कोणत्या युरोपियन राष्ट्राचे दास्यत्व स्वीकारण्याची पाळी या पट्ट्यात मोडणाऱ्या बहुतेक प्रदेशांवर आली आहे आणि याचे मुख्य कारण म्हणजे येथील मागासलेला मानवसमाज व वैभवशाली निसर्ग हेच होय! युरोपियन राष्ट्रांच्या अर्थतृष्णेला या प्रदेशाइतका दुसरा कोणताच प्रदेश बळी पडला नसेल.

खुद्द विषुववृत्तावर दिसणाऱ्या घनदाट अरण्यापासून तो सहारासारख्या ओसाड वाळवंटापर्यंत हवामानानुरूप दिसणारे भूपृष्ठाचे अनेकविध प्रकार येथे पाहावयास सापडतात. वाळवंटात पाऊस व वनस्पती यांचा संपूर्ण अभाव, तर जंगलमय प्रदेशात या दोहोंचीही रेलचेल ! या दोन प्रदेशांच्या मधील प्रदेशांत विषुववृत्तापासून जसजसे दक्षिणेकडे अगर उत्तरेकडे सरकावे तसतसे पाऊस व वनस्पती यांचे प्रमाण कमी कमी होत जाते. विषुववृत्तीय जंगलमय प्रदेशात मनुष्यप्राण्याचा सरसकट शिरकाव अद्यापि झाला नसूनही चालू युगातील कित्येक महत्त्वाच्या जिनसा या विभागातूनच गोळा केल्या जातात हे विशेष आहे. भरगच्च पाऊस व प्रखर उष्णता यांमुळे येथील निसर्ग अत्यंत समृध्द आहे. विशाल वृक्ष व त्यांना बिलगून असलेल्या घनदाट वेली यांची अखंड भिंतच्या भिंत येथे पाहावयास मिळते. ६० ते २०० इंचांपर्यंत पडणारा पाऊस व सूर्याचे अखंड पडणारे प्रखर लंबकिरण या वनस्पतीजीवनाला पोषक अशा दोन गोष्टी येथे असल्याने जगाच्या पाठीवरील घनदाट अरण्ये येथे पाहावयास मिळतात. ऋतू नसल्याने हवामानाचे सातत्य राहते व वृक्षराजी सदैवच हिरवीगार असते.

या भागात सापडणाऱ्या वृक्षजातींत रबराच्या झाडाइतके आर्थिक महत्व अद्यापि दुसऱ्या कोणत्याच झाडाला प्राप्त झालेले नाही, या झाडाच्या सालीखाली असणारा पांढरा चीक हाच आज बाजारांत मिळणाऱ्या सर्व रबरी वस्तूंचा खरा आधार होय. या जातीच्या वृक्षांना वनस्पतीशास्त्रात 'हेवी ब्रासिलेसिस' असे म्हणतात. विषुववृत्तीय प्रदेशात मोडणाऱ्या अमेझान नदीच्या खोऱ्यातील मूळचा हा वृक्ष आहे. रबरासाठी पाश्चात्य राष्ट्रांची धाड स्वाभाविकच प्रथम या प्रदेशावर पडली, व असंख्य वृक्षांची व त्याचबरोबर तेथील रानटी रहिवाशांची कत्तल झाली. रबर मिळवितांना कोणतेच धरबंध ठेवण्यात न आल्याने अमर्याद नासाडी झाली. अमेझान नदीला मिळणाऱ्या पुटमायो नदीच्या किनाऱ्यावर रबर काढण्यास प्रथम सुरुवात झाली. विसाव्या शतकाच्या आरंभाला 'कोलंबियात' वसाहत करून राहिलेल्या काही लोकांनी रबरासाठी दौरा काढला व तेथील रानटी लोकांना वेठीला धरून व त्यांना जंगलांत घुसण्यास भाग पाडून रबर गोळा करण्यास सुरुवात केली. या धंद्यात अधिकाधिक भांडवल गुंतविले जावे म्हणून काही तरी आमिष दाखविणे भाग असल्याने, रबराचे उत्पादन व त्यापासून मिळणारा नफा भरमसाट वाढत्या प्रमाणात दाखविण्याची आवश्यकता भासू लागली. या दोन्ही गोष्टी साधावयाच्या म्हणजे जास्त कामगार, कमी मजुरी अशी योजना आखणे भाग होते. सर्व रानटी जमाती वेठीला धरून ही गोष्ट साधणे सुलभ होते. वसाहतवाल्यांनी शस्त्राच्या जोरावर रानटी जमातींना उपाशीपोटी राबविण्याचा चंग बांधला.

या प्रकरणांत दक्षिण अमेरिकेतील रानटी जमाती नामशेष झाल्या. भरपूर काम न केल्यास अगर ठराविक प्रमाणांत रबर आणून न दिल्यास या मजूर गुलामांना उपाशी मारण्यात येई. अगर असह्य असा दुसरा काही देहदंड करण्यात येई. या शिक्षांची मजल फटके मारणे, हातपाय तोडणे अगर ठार मारणे येथपर्यंत जाई !

या दहशतवादामुळे रबर काढण्यास जाणारे तद्देशीय लोक रबर मिळवण्यासाठी वाटेल ते उपाय योजीत, झाडाला पन्हाळी पाडून काही दिवसांच्या अंतराने पध्दतशीरपणे चीक गोळा करीत न बसता ते कचाकच

झाडे तोडून मोकळे होत. रबराचा ठराविक साठा मालकापुढे नेऊन ओतणे हे त्यांचे मुख्य काम असल्याने जंगलाची काय नासाडी होईल याची पर्वा ते मुळीच करीत नसत. रबर निर्मितीच्या धंद्यांतील नफ्याचे प्रमाण या मार्गानी वाढीला लागताच भांडवलाचा ओघ तत्काळ त्या दिशेने वाहू लागला, व या सर्वांचा परिणाम थोड्याच दिवसांत असा झाला की, 'बोलेव्हिया व पेरू' या प्रदेशांतील रबराची झाडे अल्पावधीतच नाहीशी झाली. 'पुटमायो' नदीच्या खोऱ्यातील रानटी लोकांची संख्या पन्नास हजारावरून आठ हजारावर आली.

अमेझान नदीच्या खोऱ्यात मोडणाऱ्या ब्राझीलच्या भागातही रबराचा व्यापार करणाऱ्या मंडळ्यानी असाच धुमाकूळ घातला. येथील मागासलेल्या लोकांना प्रथम मंडळ्यामार्फत रबर काढण्यास लागणारी साधन सामग्री, व चालचलाऊ आर्थिक मदत देण्यात आली. त्यांच्यावर व्यापारी मंडळ्यांनी जुलमाने लादलेला हा कर्जाचा बोजा पुढे कधीच फिटला नाही. या उपकारांच्या ओझ्याखाली त्यांना जन्मभर राबविण्यात आले. त्यांनीच गोळा केलेल्या रबराचा काही भाग त्यांना मजुरी म्हणून देण्यात येई व फिरून तोही भाग स्वस्त दरांत कंपन्यांकडून विकत घेण्यात येई. या चक्रांतून सुटका करून घेण्यास तद्देशीय लोकांना आत्महत्त्या करणे अगर जंगलात गडप होऊन जाणे याखेरीज दुसरा उपायच राहत नसे.

रबराची लागवड करण्याची प्रथा आता अनेक ठिकाणी रूढ झाल्याने दक्षिण अमेरिकेतील रबराचे प्रस्थ आता बरेच कमी झाले आहे. तद्देशीय लोक नाहीसे होत असल्याने, तेथील जंगलात काम करण्यासही आता माणसे मिळेनाशी झाली आहेत. वृक्षांची मोठ्या प्रमाणात मोडतोड झाली असल्याने तेथील रबराचा पुरवठाही अत्यंत कमी झाला आहे. एके काळी रबराच्या उत्पादनात आघाडीवर असलेला ब्राझील आज शेवटी आहे. डच ईस्ट इंडीज या गटात मोडणाऱ्या सुमात्रा, जावा इ. पॅसिफिक महासागरातील बेटांचे वार्षिक उत्पादन २९० हजार टनांचे असून त्याचा दुसरा अनुक्रम आहे. ब्राझीलमधील जंगलांची किती मोठ्या प्रमाणात नासधूस करण्यात आली असेल याची कल्पना या आकड्यांनी येण्यास मुळीच हरकत नाही.

रबराच्या उत्पादनाचा सध्याचा क्रम साधारणपणे पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| मलाया | वार्षिक उत्पादन | ४२५ हजार टन |
| सिलोन | ,, ,, | ५६ ,, ,, |
| बोर्निओ | ,, ,, | ३० ,, ,, |
| फ्रेंच इंडोचायना | ,, ,, | ३० ,, ,, |
| सयाम | ,, ,, | २५ ,, ,, |
| हिंदुस्थान | ,, ,, | १५ ,, ,, |
| ब्राझील | ,, ,, | १४ ,, ,, |

ब्राझीलप्रमाणे मध्य आफ्रिकेतील कांगो नदीच्या खोऱ्याचीही हीच स्थिती झाली. रशियाखेरीज उरलेल्या युरोपचे जे क्षेत्रफळ आहे. तितकेच क्षेत्रफळ या प्रदेशांचे आहे. एवढा मोठा प्रदेश घनदाट जंगलाने भरलेला असून त्यातील काही वेलीही रबर देऊ शकतात. येथील निग्रो लोकांना वेठीला धरून बेलजीयम् दलालांनी निग्रोंचा व जंगलाचा दोहोंचाही फन्ना उडविला. हस्तीदंत व रबर या दोन जिनसांचा व्यापार करण्याची निग्रो लोकांना बंदी करण्यात आल्याने रबर कंपन्यांच्या दलालांची गुलामगिरी पत्करण्यापलीकडे त्यांना गत्यंतर राहिले नाही.जंगलांतून मोठ्या प्रमाणात रबराचे उत्पादन करण्यासाठी निग्रो लोकांवर अनन्वित अत्याचार करण्यात आले, व त्याचा परिणाम शेवटी असा झाला की, जंगलांची भयंकर नासधूस होऊन निग्रोंची संख्याही झपाट्याने घटली. त्यांची शेती, खेडी सर्व काही नष्ट होऊन सुमारे ३० वर्षांच्या कालावधीत निग्रो लोकांची संख्या दोन कोटिवरून ऐंशी लाखावर आली. गेल्या महायुध्दापूर्वी रबराला आलेल्या तेजीमुळे रबर कंपन्यांना अतोनात फायदा झाला . पण त्यासाठी एक कोटि वीस लक्ष जीवांचा व हजारो एकर जंगलाचा नाश झाला.

रबरोत्पादनाची ही अत्याचारी पध्दत अशीच चालू ठेविल्यास रबराचे झाड व रानटी जमात जगात औषधालाही शिल्लक राहणार नाही व पुढे कुचंबणा होईल, याची जाणीव भांडवलदार वर्गाला हळू हळू होऊ लागली व तीमधूनच रबराच्या लागवडीची कल्पना जन्माला आली. रबर लागवडीचा विचार करण्यापूर्वी, रबर उत्पादन करणारा

जगातील तिसरा महत्वाचा भाग विचारात घेणे आवश्यक आहे. या भागात जावा, सुमात्रा, बोर्निओ या पॅसिफिक महासागरातील बेटांचा समावेश होतो.मलायाचे द्वीपकल्पही याच विभागात मोडते. अमेझॉन खोऱ्यातील रबर वृक्षांच्या जातीचे बी आणून त्यांची मलायात लागवड करण्यात आली. मलायाचे हवामान या वृक्षांना इतके अनुकूल ठरले की, ही लागवड सर्व दृष्ट्या संपूर्ण यशस्वी झाली. १९१० साली या लागवडीपासून ११हजार टन रबर मिळाले. या सालच्या नैसर्गिक रबराच्या उत्पादनाचा आकडा ८३हजार टनांचा होता. १९१४ साली लागवडीच्या रबराचे उत्पादन नैसर्गिक रबरापेक्षा ७०हजार टनांनी अधिक झाले; आणि आता तर जागतिक रबराच्या उत्पादनाचा ९० टक्के भाग लागवडीपासून मिळू लागला आहे. यात मलायाचा पहिला नंबर असून पॅसिफिक महासागरातील बेटांचा दुसरा आहे.

नैसर्गिक रबराच्या उत्पादनाबाबत झालेला नाश लागवडीबाबत होत नाही.रबराचे उत्पादन कौशल्याने व लागवडीचा नाश न होईल अशा बेताने करण्यात येते. भांडवलशाहीचे सुधारलेले स्वरूप येथे पाहावयास मिळते.डनलाप या रबर कंपनीची मलायाची लागवड यशस्वी होताच इतर भांडवलदार राष्ट्रांचे लक्ष या धंद्याकडे लागले. फायरस्टोन कंपनीची लागवड आफ्रिकेतील 'लिबेरिया' या प्रदेशात अस्तित्वात आली. राष्ट्राराष्ट्रांतील स्पर्धा, जादा उत्पादन व किमतीचा अस्थिरपणा या गोष्टींचा सुळसुळाट अल्पावधीतच झाला. निरनिराळ्या राष्ट्रांतील व्यापारी स्पर्धा, राष्ट्रवंश धर्म इत्यादी अनेक स्वरूपांनी प्रकट होऊन युध्दाला कारणीभूत होऊ लागली.

इंग्लिश भांडवल जसे मलायात ओतले जाऊ लागले तसे डच भांडवल जावा, सुमात्रात व अमेरिकन भांडवल लिबेरीयात ओतले जाऊ लागले. तद्देशीय लोकांनीही युरोपियनांच्या जोडीने अल्पस्वल्प प्रमाणात रबर लागवडीस सुरुवात केली. तमीळ, चिनी व जाव्हानीज मजूरीसाठी या भागांतून गोळा होऊ लागले. रबराचे उत्पादन अहमहमिकेने चालू झाले. रबर बाजाराला स्थैर्य असे अजीबात राहिले नाही. १९१४ च्या महायुध्दानंतर रबराला फिरून एकदा तेजी आली. इंग्लिश, डच, चिनी, व तद्देशीय लोक या सर्वांनी मिळून पॅसिफिक क्षेत्रात २० लाख एकर जमीन लागवडीखाली आणली. झाडे जास्तीत जास्त दाटीवाटीने लावून व वारंवार चीक काढून रबर जास्तीत जास्त मिळवण्याची धडपड चालू झाली. रबराचे उत्पादन झपाट्याने वाढताच स्वाभाविकच बाजाराला मंदी आली. आणि सुमारे ६ वर्षांच्या कालात बाजार पूर्ण घसरगुंडीला लागण्यास व नवी लावलेली झाडे चीक देण्याइतपत मोठी होण्यास एकच गाठ पडली. वाढलेले उत्पादन व शोषण यांतील अंतर एवढे मोठे होते की, मालास मागणी येईना . व किंमती मूळच्या किमतीच्या एक अठरांशावर येऊन बसल्या. १८ रुपयांचा रबर एक रुपयापर्यंत खाली आल्याने नव्या झाडांतून चीक काढून घेण्याची आवश्यकताच राहिली नाही. अर्थातच हजारो कामगार बेकार झाले. त्यांना मायदेशास परत जाण्यास पैसा नाही, धड तेथे काम नाही, धड पोटाला नाही अशी स्थिती होऊन बसली. यावर इलाज म्हणून इंग्लिश भांडवलवाल्यांनी रबराचे उत्पादन नियंत्रित करण्याचे ठरविले. पण त्यांचे प्रतिस्पर्धी डच भांडवलवाले या गोष्टीस मान्यता देण्यास तयार झाले नाहीत.

यांतून सुटण्याचा मार्ग म्हणून शेवटी ब्रिटिश सरकाराने किमती नियंत्रित व स्थिर करण्यास दुसराच एक उपाय अमलात आणण्याचे ठरविले. किंमतीच्या चढउतारावर रबराचे उत्पादन अवलंबून ठेवण्यात येऊ लागले. किंमती पडल्या, उत्पादनाला कात्री लावण्यात येई ! किमती चढल्या, उत्पादन वाढवण्यात येई !! काही कालपर्यंत ही योजना यशस्वी झाल्यागत दिसली. १९२६ साली रबराला फिरून तेजी आली व सर्व ब्रिटिश साम्राज्यात या साली मलायाचा व्यापार पहिल्या दर्जाचा ठरला. मलायाच्या लागवडीच्या कक्षेबाहेर वावरणाऱ्या लागवडवाल्यांनी १९२० ते २६ सालच्या दरम्यान लावलेली झाडे वाढून या कालात तयार झाली होती. किमती चढताच या लागवडीवाल्यांनी इतक्या नेटाने उत्पादन केले की, लगेच १९२७ साली रबराच्या किंमती घसरल्या, रबराच्या तेजीला एक वर्षातच मंदीने गाठले. फिरून ब्रिटिश सरकाराने किंमती नियंत्रित करण्याची खटपट करून पाहिली; पण डचांनी मान्यता न दिल्याने हा नाद सोडावा लागला. उलट ब्रिटिशांनी उत्पादन कमी करताच त्यांनी आपले उत्पादन

वाढविलेच ! डच भांडवलदारांच्या या कारवायांमुळे ब्रिटिश सरकारने १९२८ साली रबरोत्पादनावरील आपले नियंत्रण काढून टाकले. डच व ब्रिटिश या भांडवलदारांची ही स्पर्धा कामगारवर्गाला चांगलीच भोवली. १९३४ साली मात्र डच व ब्रिटिश समझौता करून उत्पादनाबाबत एकवाक्यता करण्याचे ठरविले. उभयतांनीही नियंत्रित प्रमाणात रबराचे उत्पादन करण्याच्या योजनेला पाठिंबा दिला. रबराच्या निर्यातीवर कर बसवून तद्देशीय लोकांच्या उत्पादनाची गळचेपी करण्यास मात्र ते विसरले नाहीत; व अशा रितीने फिरून एकदा रबर बाजाराला स्थैर्य व तेजी आणण्यात आली.

ज्यादा उत्पादनाचे अनेक दुष्परिणाम रबराच्या बाबतीत दिसून आले. भरभराटीच्या कालात लागवड करणाऱ्या प्रत्येकाची अशी कल्पना होती की सहा वर्षांनी आपण रबर काढणार व भरमसाट फायदा घेणार ! वस्तुत: या जादा लागवडीपासून मिळणाऱ्या रबराची जगाला आवश्यकता नव्हती; व यामुळे सहा वर्षांनंतर प्रत्येक लागवडीचा सरासरी चौथा हिस्सा पडीक राहू लागला व त्यावरील परिश्रम फुकट गेले. तो पडीक टाकला नाही तर माल पडून राही व उत्पादनाची मजुरी गळ्यात पडे ! या सर्वांचा हजारो युरोपियन, डच, चिनी लागवडवाले आणि त्यांच्याकडे काम करणारे तामीळ व जाव्हानीज मजूर यांच्यावर काय परिणाम झाला ते पाहण्याजोगे आहे. १९१० ते २० च्या दरम्यान या लोकांची या भागातील संख्या ७लाखावरून ३४लाखावर गेली होती. मध्यंतरीच्या मंदीच्या काळात बाहेरून कोणी लोक मलायात आले नाहीतच; पण येथून त्यांना बाहेर पडणे मात्र भाग पडले व लोकसंख्या थोडीफार घटली. १९२६ साली रबराला थोडीफार तेजी येताच टोळधाडीसारखे लोक या भागात गोळा होऊ लागले व संख्या ५०लाखावर गेली. १९३२ साली मंदी येताच बेकार झालेले हजारो तामीळ मजूर हिंदुस्थानाकडे पिटाळले गेले व त्यांना येथेही धंदा न मिळाल्यामुळे ते उपासमारीला बळी पडले. मलायाची लोकसंख्या रबरावर हलणारी आहे. पाश्चात्य रबर कंपन्यांच्या गरजेप्रमाणे मेंढरागत लोक जहाजावर चढविले जातात आणि काम होताच परत पिटाळले जातात. त्यांच्या जीवनाला रबराच्या किमतीइतपतही स्थैर्य लाभत नाही.

विषुववृत्तीय जंगलमय प्रदेशाच्या पट्ट्यात मिळणारा दुसरा महत्वाचा पदार्थ म्हणजे नारळ अगर तत्सम फळे(पाम) यांपासून मिळणारे तेल हा होय. पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील सेनीगाल ते कांगोपर्यंतच्या विभागात पाम जातीची झाडे विपुल आहेत. पामच्या फळांपासून मिळणारे तेल, साबण मेणबत्ती व टिन या कारखान्यांमधून मोठ्या प्रमाणात लागते. इंग्लंड व फ्रान्स ही दोन राष्ट्रे या तेलाची बडी गिऱ्हाइके आहेत. या राष्ट्रांची पाम तेलाची मागणी पुरी करण्यासाठी आफ्रिकन लोकांना राबविण्यात येते. तेल काढताना खूप नासाडी तर होतेच, पण येथील लोकांच्या आहारातील हे तेल एक महत्वाचा भाग असल्याने व तोच लुबाडण्यात आल्याने त्यांची चांगलीच कुचंबणा होते.वाहतुकीच्या साधनांच्या अभावी हे तेल आफ्रिकन लोकांवर लादून बंदरापर्यंत नेण्यात येते, व तेथून ते फ्रान्स अगर इंग्लंडला रवाना होते. पाम तेलाचा धंदा हा रबराइतका व्यापक नसला तरी महत्वाचा आहे. याशिवाय साबूदाणा, लाख इत्यादी पदार्थ या जंगलापासून मिळतात.

या पट्ट्यांत मोडणारा रबराइतकाच - किंबहुना त्याहूनही अधिक महत्वाचा दुसरा मोठा धंदा म्हणजे साखरेचा होय. उसापासून साखर तयार करण्याचा धंदा प्रचंड प्रमाणावर फक्त या विभागातच चालतो.रबराप्रमाणेच उसाचीही लागवड करण्यात येते. अमेरिकेला लागून असलेले क्यूबा बेट आज कित्येक वर्षे साखरेचे पहिल्या दर्जाचे उत्पादन करीत आहे. पॅसिफिकमधील जाव्हा बेटाचा या कामी दुसरा नंबर आहे. हवाई, फिलीपाईन, पोर्टोरिका ही बेटेही मोठ्या प्रमाणात साखरेचे उत्पादन करीत असतात. जमिनीचा मगदूर व हवामान यांची क्यूबाला असलेली अनुकूलता मात्र तितक्या प्रमाणात दुसरीकडे कोठेच नसल्याने क्यूबाच्या साखरेचे उत्पादन अद्यापि कोणीच मागे टाकलेले नाही. इंग्लंड व अमेरिका या दोन बड्या राष्ट्रांशी व्यापार करण्यास अनुकूल असे मध्यवर्ती स्थान क्युबाला मिळालेले असल्याने त्याची व्यापारी भरभराटही सहजसुलभ झाली आहे. सपाट व सुपीक भूप्रदेश, अनुकूल व निश्चित हवामान यांमुळे या बेटांतील उसाचे

पीक अव्वल दर्जाचे ठरले आहे.

मे ते नोव्हेंबरपर्यंत येथे भरपूर पाऊस असतो. हवेत उबाराही खूपच असतो. यानंतर पावसाचे प्रमाण बरेच कमी येते. आरंभीच्या ६ ते ७ महिन्यांत उसाची भरपूर वाढ होत असल्याने पाऊस कमी येण्याचा काळ व ऊस कापणीला येण्याचा काळ एकदमच येतात. उष्ण तापमानाचे सातत्य या प्रदेशामध्ये आहे. ऋतुमानपरत्वे फारच थोडा बदल त्यात होतो. गारठा, धुके, बर्फ इत्यादिकांचा संपूर्ण अभाव असल्याने उसाचे पीक निर्वेध होते. उसाची कापणी झाल्यानंतर त्याचे सड तसेच जमिनीत राहू देण्यात येतात व तेच पुन्हा वाढतात. अशा तऱ्हेने एकाच बियावर १० ते १५ पिके घेण्याची पध्दत क्यूबात पाहावयास सापडते. १० वर्षांनंतर फिरून नवीन लागवड करण्यात येते. उसाची खरी शेती जगात फक्त एका क्यूबात होते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ऊस व साखर म्हणजे क्यूबाचे सारसर्वस्व. या दोन धंद्यांपलीकडे क्यूबातील जनतेला दुसरा व्यवसाय माहीतच नाही. साखरेच्या धंद्यातील क्यूबाचे अग्रस्थान भांडवलदार राष्ट्रे दृष्टीआड कसे करतील? क्यूबाला त्यांनी इतके शर्करामय करून सोडले की, क्यूबाचे राष्ट्रीय अर्थसामर्थ्य म्हणजे साखर असा प्रकार होऊन बसला; व त्यामुळे साखरेच्या भावातील क्षुल्लक हालचाल ही क्यूबातील जनतेची तारक अगर मारक ठरू लागली.

आर्थिक व लष्करी अशा दोन्ही दृष्टींनी क्यूबाला अमेरिकेचे महत्त्व आहे. अमेरिकेचे क्यूबात असलेले हितसंबंध दुहेरी आहेत. क्यूबा बेट फ्लॉरिडापासून सुमारे १०० मैलांच्या आतबाहेर आहे. आणि येथे उसापासून साखर प्रचंड प्रमाणात निर्माण होऊ शकते. साखर अमेरिकेत तयार होऊ शकत नाही. गेले महायुध्द संपण्याच्या सुमारास क्यूबा अमेरिकन पेढीवाल्यांच्या हातात सापडले होते. ह्या बेटावर अमेरिकेने कबजा कसा केला हा इतिहास मोठा कलंकित आहे. १९ व्या शतकाच्या शेवटी क्यूबाने स्पेनविरुध्द बंड केले. उत्तर अमेरिकेने क्यूबाच्या स्पेनच्या जोखडाखाली चिरडल्या जाणाऱ्या जनतेला शुध्द सहानुभूती दाखवायची, त्यांनी चालू केलेल्या राष्ट्रीय लढ्याला मदत करावयाची म्हणून क्यूबाच्या अंतस्थ व्यवहारांत हात घातला. क्यूबातील लोकांना स्पेनविरुध्द लढण्याला मदत केली. 'क्यूबातील लोक स्वतंत्र आहेत, स्वतंत्र राहण्याचा त्यांचा हक्क आहे, क्यूबावर राज्य करावे तेथे आपला अंमल प्रस्थापित करावा अशी कोणतीच इच्छा अमेरिकेला नाही, ह्या बेटात शांतता राहावी यापलीकडे अमेरिकेला दुसरे काही नको आहे, तेथे कोणतेच हितसंबंध निर्माण करून घेण्याची अमेरिकेला जरूरी नाही, क्यूबात शांतता होताच अमेरिका तेथून आपल्या फौजा काढून घेईल व क्यूबाच्या लोकसत्ताक सरकाराला आपल्या बेटाचा कारभार आपल्या मर्जीप्रमाणे हाकण्याची मुभा देण्यात येईल.' अमेरिकन सरकारला काँग्रेसने 'टेलर' ठरावाला मान्यता देताना ही गोष्ट जाहीर केलेली आहे. क्यूबाने लढाई जिंकली, स्पेनचा पराभव झाला, क्बूबात लोकसत्तेची प्रस्थापना झाली. मग मात्र अमेरिकेने तत्काळ आपली भाषा बदलली. १९०१ साली प्लॅट पुरवणी काढण्यात आली. (हीच पुरवणी क्यूबाच्या राज्यघटनेत व पुढे १९०३ साली झालेल्या क्यूबा अमेरिकन तहनाम्यात समाविष्ट करण्यात आली.) ह्या पुरवणीत म्हणण्यात आले, 'अमेरिकने क्यूबाचे स्वातंत्र्य राखण्यासाठी अगर क्यूबातील जनतेच्या जीविताचे, मत्तेचे व वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी क्यूबात हस्तक्षेप करावा, त्याला क्यूबा सरकारची मान्यता आहे.' १८९८ सालच्या अमेरिकेच्या गोड वचनांनी क्यूबाचा अमेरिकन कबजात जाण्याचा मार्ग आखून ठेविला. क्यूबा अमेरिकन संरक्षित प्रदेश म्हणून थोड्याच दिवसांत ओळखला जाऊ लागला.

अमेरिकन नाविक दलाच्या संरक्षणाखाली हवाना येथे क्यूबाचे स्वतंत्र सरकार निर्माण करण्यात आले. अर्थात ह्या सरकारामध्ये अधिकाराच्या जागा स्वीकारण्यासाठी आलेले लोक बहुधा नालायक व लाचखाऊ असत. क्यूबा सतत ३५ वर्षे अशा नियंत्रणाखाली नांदत आला आहे. क्यूबातील जनतेने अमेरिकेच्या हातातील ह्या सरकारविरुध्द क्वचित् प्रसंगी उठावणी करताच अमेरिका कायदा व सुव्यवस्था याचे निमित्त करून तत्काळ हस्तक्षेप करी व तिला वठणीवर आणी. क्यूबावर अशा रीतीने अप्रत्यक्ष सत्ता संपादन केल्यानंतर अमेरिकेने तेथील साखरेच्या उत्पादनाच्या धंद्याची वाढ करण्याच्या दृष्टीने खटपट चालू

केली. आपल्या ' अमेरिका हिस्पाना' ह्या पुस्तकात वॉल्डो फ्रँक यासंबंधी लिहितो - ' मोठ्यामोठ्या रकमा देऊन प्रथम जमीन खरेदी करण्यात येते. सबंध प्रांतच्या प्रांत आपल्या मालकीचा होईल एवढी जमीन पदरात पडताच त्या भागात खाजगी रेल्वेरस्ता टाकण्यात येई व आपल्या मालाची वाहतूक करण्याचा मक्ता एखाद्या अमेरिकन कंपनीला देण्यात येई. यानंतर त्या विभागाची थोडीफार राहिलेली जमीन आर्थिक दृष्ट्या निराधार झाल्याने अल्प किंमतीत खरेदी करण्यात येई. क्यूबातील बहुतेक सर्व साखरेच्या गिरण्यांचे आता एकीकरण करण्यात आले आहे. रेल्वेरस्त्याचा शेवट ज्या ठिकाणी असेल तेथेच या गिरण्या ठेवण्यात आल्या आहेत. क्यूबातील पिकांची विविधता नष्ट करण्यात आली आहे. क्यूबातील शेतकऱ्याचे, प्रथम शेतीतून उच्चाटन केल्यानंतर अमेरिकेने क्यूबातील मजुरांकडे दृष्टी वळविली. प्रथम क्यूबातील मजुरांना सांस्कृतिक दर्जा मोठा होता. त्यांची राहणी खर्चाची होती. अमेरिकन मळेवाल्यांना स्वस्त मजूर पाहिजे होते.अमेरिकन मालकीच्या मळ्यांतील उसाची कापणी करण्यासाठी हेटी व जमेका येथील हजारो निग्रो आणण्यात आले. हे निग्रो अशिक्षित व गुलामवजा असल्याने क्यूबातील मूळच्या रहिवाश्यांशी त्यांचा मिलाप होणे कोणत्याच दृष्टीने शक्य नव्हते. त्यांना स्पॅनिश भाषाही बोलता येत नसे व क्यूबातील लोक त्यांच्याशी संपर्कही ठेवण्यास तयार नसल्याने त्यांना ती कधीकाळी येईल अशी आशा करण्यासही जागा नव्हती. त्यांच्या वसाहती अगदी घाण असत. वेतन अत्यंत कमी असल्याने क्यूबातील माल घेणे त्यांना शक्य नसे. साखर कारखानदार त्यांना कापड व अन्न देत. स्वाभाविक हे पदार्थ अमेरिकेतून आलेले असत. १९२० साली क्यूबातील पिकाऊ जमिनीपैकी शेकडा ४० टक्के जमीन अमेरिकन भांडवलदारांच्या मालकीची होऊन बसली होती. उरलेल्या जमिनीवर अमेरिकन पेढ्यांचे नियंत्रण होते. तेथील आयात निर्यात माल, किंमती, वाहतूक, वेतन वगैरे सर्व बाबींवर अमेरिकन पेढीवाल्यांनी कब्जा केला होता. तद्देशीय मळेवाले अमेरिकन भांडवलशाहीच्या या आक्रमणाने अगदी टेकीला आले होते. क्यूबातील कोणतेही सरकार अमेरिकन भांडवलाशिवाय एक दिवसही टिकणे शक्य नसल्याने त्यांना दाद मागण्यास कोठे जागाच राहिली नव्हती. क्यूबाचे कारखानदारीत रूपांतर होऊन तेथील जनतेवर या अमेरिकन कारखानदारीची गुलामगिरी लादली गेली होती.

क्यूबातील अमेरिकन भांडवलाने क्यूबाला संपन्न बनविले ही गोष्ट फारशी काही खोटी नाही. उसापासून उत्पन्न होणाऱ्या साखरेच्या जागतिक उत्पादनाचा चौथा हिस्सा उत्पादन एकट्या क्यूबात होत असे. १९२८ साली क्यूबातील लोकांची संपत्ती जगातील कोणत्याही राष्ट्राच्या मानाने अधिक होती. क्यूबाची नैतिक व मानसिक वाढ मात्र खुंटलेली होती. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होण्याइतपत या बेटातील खनिज व कृषिसंपत्ती असूनही क्यूबा बेट अमेरिकन मळेवाल्यांची वसाहत होऊन बसले होते. स्वत:ची संस्कृती यामुळे क्यूबाला वाढविता आली नाही. तीवर अमेरिकन संस्कृतीचे कलम झाले व तेच वाढीला लागले. हवानातील सरकारी कचेरीसुध्दा वॉशिंग्टनच्या कचेरीबरहुकूम बांधण्यात आली. क्यूबातील एक वर्ग अत्यंत श्रीमान आहे ही गोष्ट जितकी खरी आहे तितकीच, दुसरा बहुसंख्य वर्ग दरिद्री आहे हेही खरे आहे. त्याला शेती नाही. निग्रोच्या बराबरीने मजूरी करता येत नाही.

१९२९ साली अमेरिकेच्या क्यूबाविषयक धोरणात काही शैथिल्य निर्माण होण्याची आशा दिसू लागली. क्यूबाचे अमेरिकन वकील नगेनहिम यांनी जाहीरपणाने १९०३ च्या प्लॅटपुरवणी तहाचा धि:कार केला. ते म्हणाले, ' क्यूबाशी तहाच्या वाटाघाटी करताना क्यूबाला आपल्या प्रगतीचा मार्ग चोखाळण्यास मुभा देण्यात आली पाहिजे. त्याने चुका केल्या तरी ते स्वाभाविक आहे हे आपण लक्षात ठेविले पाहिजे. क्यूबाने स्वत: चुका केल्या तरी चालतील. अमेरिकन सरकाराने त्या सुधारण्याच्या निमित्ताने तेथे हस्तक्षेप करून आपण तेच करण्यापेक्षा पहिलीच गोष्ट अधिक श्रेयस्कर. क्यूबातील अमेरिकन नागरिकांच्या रक्षणाच्या दृष्टीने क्यूबाशी आपले संबंध आंतरराष्ट्रीय कायद्याला बाध आणणारे नाहीत इतपतच असावेत.'

१९३३ साली वॉशिंग्टनचे बाहुले बनून क्यूबावर सुलतानशाही गाजविणारे अध्यक्ष 'मॅशॉडो' यांना हाकून देण्यात आले. व रूझवेल्टनी क्यूबाशी स्वतंत्र तहाच्या वाटाघाटी चालू केल्या. ह्या तहान्वये क्यूबाच्या

राजकारणात ढवळाढवळ करण्याचे धोरण अमेरिकेने सोडून दिले. पण क्यूबाची अमेरिकन भांडवलाची गुलामगिरी मात्र अद्यापि सुटली नाही. क्यूबावरील राजकीय वर्चस्व अमेरिकेने सोडले.कारण आता दुसरीकडे अमेरिकेला साखरेची मिरासदारी मिळाली होती.

गेल्या महायुध्दात (१९१४-१८) जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड इत्यादी देशांतील बीटच्या साखरेचे उत्पादन घटल्याने व युध्दमान राष्ट्रांना पुरेशी बीट साखर मिळेनाशी झाल्याने बहुतेक बड्या राष्ट्रांच्या साखरेचे गिऱ्हाईक क्यूबाला मिळाले व त्याच्या आर्थिक भरभराटीला सीमा राहिली नाही. युध्दसमाप्तीनंतर वरील राष्ट्रांनी एक राष्ट्रीय महत्त्वाचा धंदा म्हणून फिरून बीट साखरेच्या धंद्याचे पुनरुज्जीवन केले. युरोपमध्ये बीटच्या साखरेचा जम बसताच क्यूबाचा धंदा गडगडला. वस्तुत: बीटपासून मिळणारी साखर व्यापारी दृष्ट्या उसाच्या साखरेशी स्पर्धा करू शकत नाही. पण राष्ट्रीय भावनेचा प्रकर्श व राष्ट्रीय आर्थिक स्वयंपूर्णतेच्या कल्पनेचा उदय यांमुळे क्यूबाची स्वस्त साखरही युरोपियन बाजारपेठेत मार खाऊ लागली. राष्ट्रीय धंदा म्हणून सरकारी संरक्षण मिळाल्याने युरोपात बीटच्या साखरेला प्राधान्य येऊन बसले व क्यूबाचे शेतकरी भिकेला लागण्याची पाळी आली. त्यांची पूर्वीची गिऱ्हाईके साखरेसाठी जास्त पैसा देण्यास तयार होती, पण क्यूबाची स्वस्त साखर घेण्यास तयार नव्हती. युरोपियन भांडवलशाही राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली सामान्य जनतेला स्वस्त जिन्नस पैदा करून देण्यास तयार नव्हती !

युध्दकालात क्यूबाला आलेली भरभराट अशा रितीने नाहीशी झाली. साखरेची किंमत घसरून पहिल्या किंमतीच्या एकपंचमांश आली. क्यूबाचा शेतकरी तरीही कशीबशी तग धरून होता. पण क्यूबात साखरेचे कारखाने काढून बसलेले परकीय कारखानदार निराळ्याच उद्योगात होते. आतापर्यंत लागवडीखाली नसलेली जमीन लागवडीखाली आणून उसाचे व साखरेचे जादा उत्पादन करून किंमती घटवून फिरून गेलेल्या बाजारपेठा काबीज करण्याचा चंग त्यांनी बांधला होता. नव्या नव्या जमिनी भराभर लागवडीखाली आणण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन दिले जात होते. इकडे युरोपात दुसरेच कारस्थान चालू होते. राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली बीट साखरवाले सरकारी संरक्षण संपादन करून बसले होते. बीटच्या साखरेचे उत्पादन वाढविण्याची कोशीश करून त्यांनी १९२५ साली युरोपातील बीटच्या साखरेचे उत्पादन कळसाला नेऊन भिडविले. क्यूबाची साखर फिरून पडून राहिली. युरोपियन कारखाने तिला युरोपाच्या बाजारपेठेत तसूभर जागाही मिळू देण्यास तयार नव्हते. किंमती आणखी तिसऱ्या हिश्श्याने घटल्या; तशातच १९२९ साली निसर्गाने क्यूबावर मेहेरनजर केली ! या साली हवामान इतके अनुकूल झाले की उसाच्या पिकाने पूर्वीचे सारे उच्चांक मोडले ! पीक चांगले आल्याने आर्थिक अध:पात हा भांडवलशाही युगातील विशेष चमत्कार क्यूबाला अनुभवावयास मिळाला. पीक चांगले आले पण भाव नाही. या साली क्यूबाचा शेतकरी साफ बुडाला. त्याचा ऊस खपल्याखेरीज जीवनोपयोगी एकही वस्तू तो खरेदी करू शकत नाही, शेतात उसाखेरीज पीक नाही, देशात दुसरा उद्योगधंदा नाही, साखर पडून असल्याने कारखानदार त्याचा ऊस घेण्यास तयार नाही अशी चमत्कारिक परिस्थिती क्यूबात निर्माण झाली. साखर व ऊस हा क्यूबाच्या आर्थिक जीवनाचा खरा आधार अशा रीतीने डळमळल्यामुळे क्यूबाचा शेतकरी अक्षरश: ठार झाला. निर्मितीवर निर्बंध घालून साखरेच्या किंमतीत सुधारणा करण्याचा प्रयत्न क्यूबाने करून पाहिला. या कामी जाव्हाचे भांडवलवालेही सहभागी झाले. साखरेचे उत्पादन करणारे आणखीही काही देश या योजनेत सामील होऊ लागले. पण इंग्लंड व अमेरिका ही दोन बडी राष्ट्रे आपापल्या मालकीच्या प्रदेशात साखरेला संरक्षण देऊन साखर निर्माण करू लागल्याने क्यूबा - जाव्हाचे हे प्रयत्न यशस्वी हीऊ शकले नाहीत. या दोन प्रदेशांनी आपले उत्पादन दोन तृतीयांश वर आणूनही चार वर्षांत त्यांच्याकडे पडून असलेल्या ७० लाख टन साखरेपैकी फक्त १४ लाख टन साखर हलली व बाकीची ५६ लाख टन तशीच पडून राहिली. यावरून या दोन बेटांच्या साखरेचे उत्पादन किती प्रचंड असेल याची कल्पना येण्यास हरकत नाही.

स्वदेशी साखरच फक्त वापरायची; मग ती कितीही महाग पडली तरी हरकत नाही असे धोरण बऱ्याच राष्ट्रांकडून स्वीकारले गेल्यामुळे साखरेच्या भावाचे स्थैर्य

संपूर्णत: नष्ट झाले. खुद्द इंग्लंड दुप्पट दराने पडणारी बीट साखर निर्माण करून वापरीत होते, पण क्यूबाची साखर घेण्यास ते तयार नव्हते. ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका हे ब्रिटीश साम्राज्यातील प्रदेश उसापासून साखर तयार करू शकतात व तिचा काही भाग इंग्लंडलाही देऊ शकतात. पण क्यूबाच्या मानाने ही साखर सरासरी दुपटीने महाग पडते. साम्राज्यातील देशांना वाव देण्याचे इंग्लंडचे धोरण असल्याने या महागाईकडे स्वाभाविकच दुर्लक्ष करण्यात येते. युद्धपूर्व कालांत इंग्लंड साम्राज्यातील साखर क्वार्टरला ८ शिलिंग या भावाने घेई; पण क्यूबाची ४ शिलिंग भावाची साखर नाकारण्यात येई. जनतेच्या खिशाला कात्री लावून आपले भांडवलदार पोसण्यापलीकडे इंग्लिश सरकारच्या या धोरणाचा दुसरा काय अर्थ असणार? पोट्रोरिको, फिलिपाईन अगर हवाई या अमेरिकन नियंत्रित प्रदेशांमध्ये तयार झालेली साखर अमेरिका दीडपट महागाईने घेते, याचा अर्थ तरी काय ? आधुनिक युगाने बहुजन समाजाला उपलब्ध करून दिलेली सुबत्ता काही विशिष्ट वर्गाच्या नफेबाजीसाठी समाजाला लाभू न देणे व या कामी 'सरकार' संस्थेने भांडवलशाहीशी संगनमत करणे हा केवढा मोठा जनताद्रोह आहे!

क्यूबाला आपले उत्पादन आखडते घेण्याखेरीज गत्यंतरच राहिले नाही. नवीन लागवडीखाली आणलेली हजारो एकर जमीन फिरून पडीक करून टाकण्यापलीकडे उपाय राहिला नाही. योग्य मजुरांची जोड क्यूबाला मिळाल्यास मानवी जीवनाला अत्यंत उपयुक्त असा हा पदार्थ अत्यंत स्वस्त दरात क्यूबा जगाला पुरवू शकेल. पण सध्याच्या जगाची राजकीय व आर्थिक घडण संपूर्ण बदलली गेली तरच ही गोष्ट शक्य आहे. चालू परिस्थितीतसुध्दा इंग्लंड, अमेरिका व युरोपचा बराचसा भाग यांना क्यूबा साखर पुरवू शकेल. नैसर्गिकरित्या अनुकूल परिस्थितीत असलेल्या ज्या प्रदेशांकडून जे कार्य होणे शक्य असेल त्यांना ते करू न देता आपली तुंबडी भरण्यासाठी ओढून ताणून उत्पादन करण्याने बहुजन समाजाचे नुकसान होते. राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली हे उपद्व्याप करून भांडवलदार वर्ग आपले कार्य साधीत असतो व बहुजन समाजाच्या स्वास्थ्याचा बळी घेत असतो. आर्थिक क्षेत्रात शिरलेल्या राष्ट्रीयवादाचे उच्चाटन झाल्याखेरीज बहुजन समाजाला नैसर्गिक सुखसाधने विपुल प्रमाणात मिळणे अशक्यच आहे.

राष्ट्रीय अर्थवादामुळे क्यूबावर आपत्ती आली, पण त्या प्रमाणात अमेरिका व इंग्लंड यांच्या साम्राज्यात साखर तयार करणाऱ्या प्रदेशांना आर्थिक स्वास्थ लाभले म्हणावे तर तेही नाही. अमेरिकन साम्राज्यातील पोट्रोरिका बेटाची स्थिती या दृष्टीने विचारात घेण्याजोगी आहे. वेस्ट इंडीज द्वीप समूहातील हे बेट अमेरिकेच्या ताब्यात येताच, अमेरिकन साखर कंपन्यांनी तेथील मूळच्या जमीनदारांकडून किनाऱ्यालगतच्या साऱ्या जमिनी सक्तीच्या खुशीने विकत घेऊन आपल्या मालकीच्या केल्या व पूर्वीच्या सर्व जमीनदाराना असंतुष्ट केले. कित्येकांना भिकेला लावले. अमेरिकन कंपन्यांच्या मालकीच्या शेतांत त्यांनी राबावे, उत्पादन करावे व या श्रमांतून निर्माण होणारी संपत्ती अमेरिकन कंपन्यांच्या भागीदारांनी खिशात घालावी असा मामला सुरू झाला. एकेकाळचे मालक मजूर झाले, व चालू काळचे मालक जमिनीचे दर्शनही न घेता परस्पर बंगल्यात बसून पैसे घेऊ लागले. स्वाभाविकच पोट्रोरिकात असंतोष वाढू लागला. शेवटी अमेरिकन सरकाराने दयावंत होऊन तद्देशीय लोकांना अल्प प्रमाणात का होईना पण फिरून शेती खरेदी करण्याची मुभा दिली; पण ती देताना एक दक्षता घेतली. ऊस निर्माण करणारी जमीन तेवढी नेमकी या सवलतीमधून वगळण्यात आली. डोंगराळ दड्ड जमीन की, कोणी फुकटही घेणार नाही, ती जमीन अमेरिकन सरकार पोट्रोरिकातील जनतेस विकण्यास केव्हाही तयार होते. ज्या जमिनीतून पोटापुरते अन्नही निर्माण होण्याची वानवा, अशी जमीन घेण्यास पोट्रोरिकन जनता कशी तयार होणार? जमीन विकत घेण्याची मुभा असून नसल्याप्रमाणेच होती. या प्रदेशात निर्माण होणाऱ्या साखरेला संरक्षण देण्यासाठी अमेरिकन सरकारने इतर साखरविरुध्द संरक्षक जकात बसविल्याने येथील अमेरिकन साखर कंपन्याचे खिसे स्वाभाविकच गरमागरम झाले; पोट्रोरिकोतील मूळची जनता मात्र गुलाम बनून हकनाक मेली. भांडवलशाही काव्यामुळे पोट्रोरिकोतील जनतेला आलेली दैना आज कित्येक राष्ट्रांच्या नशिबी आली आहे. निसर्ग संपत्तीचा योग्य उपभोग बहुजन समाजाला मिळू न देणे हा तर भांडवलशाहीचा

पाया. नफेबाजीसाठी होणारे उत्पादन मानवाच्या श्रमाचा अपरिहार तर करतेच पण त्याला पोटभर खाऊही देत नाही.

हिंदुस्तान साखर निर्माण करणाऱ्या देशात अग्रणी आहे. आणि हा धंदाही बऱ्याच अंशाने हिंदी भांडवलदाराच्या हाती आहे. परंतु हिंदुस्थानची साखरेची गरज मोठी असल्याने साखरेची निर्यात अशी हिंदुस्तान आतापर्यंत करू शकत नव्हता. याशिवाय हिंदी कारखानदारांना अल्कोहलसारखे पदार्थ तयार करण्याची सर्रास मुभा नसल्याने ही साखर म्हणावी तशी स्वस्तही पडत नसे. आता युध्दोत्तर काळात मात्र या धंद्याला हिंदुस्थानात बराच मोठा वाव राहीलसे दिसते. जगातील देशांच्या साखरेच्या उत्पादनाची साधारण कल्पना नकाशावरून व आकड्यावरून येण्यास हरकत नाही.

साखरेनंतर या प्रदेशातील व्यापारी दृष्ट्या महत्त्वाचा जिन्नस म्हणजे कोको होय. कोकोच्या झाडाच्या फळातील बियांपासून हा पदार्थ तयार होतो. विषुववृत्तीय अमेरिकन प्रदेशात हे झाड प्रामुख्याने तयार होते. मूलत: या विभागातीलच हे झाड आहे. ब्राझीलमधील बोहीमा संस्थान कोकोच्या लागवडीबद्दल प्रसिध्द आहे. आफ्रिकेमधील गोल्ड कोस्ट कॉलनी हा प्रदेशही कोकोच्या लागवडीत हल्ली बराच पुढारलेला आहे. पूर्वीच्या टोगो व कामेरून या जर्मन वसाहती इंग्लंडने हस्तगत करून कोकोच्या व्यापाराचा बराच मोठा भाग हस्तगत केला आहे. अमेरिकेच्या खालोखाल जर्मन जनता कोकोची चाहती असल्याने व नेमका हाच पदार्थ ब्रिटिश भांडवलशाहीने गिळंकृत केल्याने जर्मन भांडवलदारांचा जळफळाट झाला असल्यास आश्चर्य नाही.

जगातील कोकोच्या उत्पादनापैकी तृतीयांश उत्पादन एकट्या आफ्रिकेत होते व हे उत्पादन जगातील तीन प्रमुख साम्राज्यवादी राष्ट्रांत विभागले गेले आहे. इंग्लंड, अमेरिका व पोर्तुगाल ही ती राष्ट्रे होत ! कोकोचा मुलूख विषुववृत्तावर असल्याने तेथे राबणे गोऱ्या चामडीला शक्य नाही. अर्थात् राबणुकीचा मक्ता स्वाभाविकच निग्रो लोकांच्याकडे येतो. कोकोच्या उत्पादनाच्या पायात त्यांना अनेक वेळा यमयातना सहन कराव्या लागतात, युरोपियन राष्ट्रांची गळेकापू स्पर्धा या निग्रोंची हाडे पुरेपूर चिंबवून काढते.

पोर्तुगीज वसाहतींपैकी सॅनथोम व प्रिन्सीपी येथील कोकोच्या लागवडीत निग्रोंवर होणारे अत्याचार आता जगजाहीर झाले आहेत. येथे लागणाऱ्या सर्व मजुरांची भरती पश्चिम आफ्रिकेमधून केली जाते. हजारो निग्रो मेंढराप्रमाणे जहाजात भरून एकदा येथे आणून टाकले की, फिरून त्यांना निसटून जाता येऊ नये म्हणून कडेकोट बंदोबस्त केला जातो. त्यांना इतक्या बिकट तऱ्हेने राबविण्यात येते की, दरसाल हजारी १०० या प्रमाणात ते मृत्यूमुखी पडतात; येथील मजुरांच्या गाऱ्हाण्यांची रडकथा युरोप व अमेरिकेतही पसरू लागली व त्यामुळे या यमपुरीत तयार होणाऱ्या कोकोवर युरोप अमेरिकेने बहिष्कार घातला. या बहिष्काराचा थोडाफार परिणाम होऊन पोर्तुगीज भांडवलवाल्यांनी आपले क्रौर्य थोडेफार मर्यादित आणल्याचे जाहीर केले. पण येथील मजुरांच्या गुलामगिरीत फारशी सुधारणा झाल्याचे अद्यापि ऐकिवात नाही.


विषुववृत्तीय जंगलमय प्रदेश सोडून थोडेसे उत्तरेला अगर दक्षिणेला सरकताच सॉव्हाना या नावाने ओळखला जाणारा गवताळ प्रदेश लागतो. हा प्रदेश कॉफीचे उगमस्थान आहे. चहा, कॉफी व कोको या तीन पेयांत व्यापारी दृष्टचा कॉफीला अग्रस्थान आहे. सॉव्हाना विभागातील सुमारे २ ते ६ हजार फूट उंचीच्या प्रदेशात कॉफीचे उत्पादन उत्तम प्रकारे होते. येथे उष्ण तापमान व पाऊस खुद्द विषुववृत्तीय प्रदेशाच्या मानाने कमी असतो व ही हवा कॉफीला मानवते.

कॉफीच्या जागतिक उत्पादनाचा चतुर्थांश भाग एकट्या ब्राझीलमध्ये होतो. ब्राझीलच्या दक्षिणेकडील पठाराच्या प्रदेशात कॉफीची लागवड फारच मोठ्या प्रमाणात होते. अलीकडे कॉफीच्या उत्पादनावरील ब्राझीलचे वर्चस्व थोडेफार कमी झाले असून ब्राझीलचे उत्पादन ७५ वरून ६२ टक्क्यावर आले आहे. क्यूबाच्या आर्थिक जीवनात साखरेला जे स्थान तेच कॉफीला ब्राझीलच्या जीवनात आहे. इतर राष्ट्रांच्या आर्थिक स्वयंपूर्णतेच्या धोरणामुळे क्यूबाला दुर्दिन आले तर ब्राझीलला जादा उत्पादनामुळे आले.

कॉफीच्या लागवडीबाबत पूर्वीपासूनच ब्राझीलमध्ये एकसूत्रीपणाचा अभाव आहे. लागवडीचे मालक या

धंद्यातील फायद्याचे सर्वस्वी धनी असत. ते दूर कोठेतरी शहरांतून राहात व लागवडीत तद्देशीय लोकांना मुकादमामार्फत राबवून घेत. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत गुलामांकरवीच मजुरी करवून घेण्यात येत असे. सध्या मजुरीची अस्तित्वात असलेली पध्दती 'कोलनो' या प्रतिष्ठित नावाने ओळखली जाते. या पध्दतीप्रमाणे जमिनीचे विभाग करून मजुरांना वाटून देण्यात येतात. जमिनीची मशागत, लागवड इत्यादी बाबतची सर्व जबाबदारी त्या कामगारांवर असते, जमिनीचा मालकी हक्क मात्र त्यांना कधीच देण्यात येत नाही. नफ्यात हिस्सा असत नाही. पिकाच्या प्रमाणात त्यांना अल्पसे वेतन देण्यात येते व ते इतके अपुरे असते की, त्यातून त्यांचा चरितार्थही धड चालू शकत नाही. जागेवर नसलेला जमीनदार सदा सर्वकाळ सरकाराशी संगनमत करून आपल्या धंद्याला कोणीकडून का होईना चलती कशी मिळेल हे पाहात असतो. ब्राझीलमधील बहुजन समाजाचे हित त्याच्या डोळ्यापुढे कधीच नसते. कॉफीचा व्यापार जास्तीत जास्त किफायतशीर होऊन आपले खिसे कसे भरता येतील इकडे त्याचे सर्व लक्ष असते.

कॉफीचे झाड मोठे लहरी आहे. त्याच्या या लहरीपणापासून आपल्याला धोका बसू नये म्हणून कॉफी मळेवाल्यांनी काढलेली युक्ती नमूद करण्याजागी आहे. भांडवलदार वर्ग आपल्या नफ्याच्या बाबतीत किती दक्ष राहतो याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. कॉफीचे पीक दरसाल बदलत असते. एकाच लागवडीतील कॉफीचे उत्पादन कधीही ठराविक असत नाही. एक साल भरपेट पीक येताच झाड निसत्व होते व लगेच दुसऱ्या साली पीक निम्यावर येते. नंतर फिरून सर्वसाधारण पीकसाल येण्यास क्रमाक्रमाने सुरुवात होते व काही काळानंतर फिरून भरपेट पिकाचे साल येते. कॉफीच्या पिकाचे हे चक्र सतत याच क्रमाने फिरत असते. भरपूर पिकाचे साल येताच बाजारात कॉफीची लयलूट होते, किमती पडतात व लागवडीच्या धन्याला व्हावा तसा नफा होत नाही. निसर्गाची कृपा पर्यायाने त्याला अवकृपाच वाटते. याला उपाय म्हणून जमीनदारांनी जादा उत्पादन पाडून ठेवून कृत्रिमरित्या किंमती सावरून धरण्याची योजना काढली.




वनस्पतीजन्य संपत्तीची विभागणी

कॉफीची किंमत ठरवून, तिला चिकटून राहण्याच्या दृष्टीने उत्पादनाचे नियंत्रण करण्यात येऊ लागले. त्यांनी ठरवलेली किंमत इतकी जास्त होती की, कॉफीची लागवड हा धनिक बनण्याचा एक राजमार्गच होऊन बसला. लगेच कॉफीच्या नव्या नव्या लागवडी मोठ्या नेटाने अस्तित्वात येऊ लागल्या. मूळचे लागवडदारही कॉफीच्या व्यापारात झालेला नफा नव्या लागवडी अस्तित्वात आणण्यासाठी खर्चू लागले. कॉफीच्या उत्पादनाला मर्यादा अशी राहिलीच नाही. कॉफीचे साठे होऊन पडू लागले. साठ्यांचे तारणावर ब्राझीलमधील अमेरिकन बँका कर्जे देऊ लागल्याने ब्राझील अल्पावधीतच कॉफीमय झाला. १९२७ साली कॉफीचे पीक इतके सुंदर आले की, हे साठे एकदम दुपटीवर गेले. १९२९ सालच्या पिकानंतर या कॉफीच्या साठ्याचे काय करावे असा प्रश्न ब्राझीलला पडला. किंमती भरमसाट पाडून कॉफी निकालात काढली असती तर अलम दुनिया कॉफी पिऊन तृप्त झाली असती. पण हे करण्यास कॉफी राज्यातील अमेरिकन भांडवलदार मुळीच तयार नव्हते. जादा कॉफी अल्प प्रमाणात ब्राझील सरकाराने खरेदी करून तिचा जाळून नाश केला. १९३३ ते ३६ दरम्यान ३०० लक्ष पोती कॉफी जाळण्यात आली. १९४२ ते ४५ चे दरम्यान ६०० लक्ष पोती कॉफी जाळण्यात आली. म्हणजे सर्व जगाला ४ वर्षे पुरून उरणारी कॉफी ब्राझीलमधील भांडवलदारांनी जाळून टाकली. पण स्वस्त विकून जगाला पाजण्याचे पाप केले नाही ! दुसरी गोष्ट म्हणजे कॉफीचे उत्पादन टाकून कापसासारखी दुसरी पिके काढण्यासही हा जमीनदार तयार नाही. भांडवलशाही अर्थशास्त्रांतून कॉफीच्या धंद्याची सुटका झाली तरच ब्राझीलमध्ये होणारा कॉफीचा नाश थांबणे शक्य आहे; व त्याचबरोबर जगातील बहुजन समाजालाही ती चाखणे शक्य होणार आहे.

कॉफीचे झाड मूळचे दक्षिण अमेरिकेतील आहे हे वर नमूद केले आहे. पण कित्येकांच्या मते अबिसीनिया ही कॉफीची जन्मभूमी आहे. हिंदुस्तान, सिलोन, ईस्ट इंडीज या भागात कॉफीची माहिती होण्यास पोर्तुगीज व्यापारी खरे कारणीभूत झाले. ब्रिटिश साम्राज्यातील केनीयात उत्पन्न होणारी कॉफी अत्यंत उत्कृष्ट समजली जाते. हलक्या दर्जाच्या कॉफीला स्वाद आणण्यासाठी तीत ही कॉफी अल्प प्रमाणात मिसळण्यात येते. कोकोप्रमाणेच कॉफीलाही अमेरिकेत फार मोठ्या प्रमाणात खप आहे. कॉफी तयार करण्याच्या विशेष पध्दतीत अमेरिकनांचा हातखंडा आहे. त्यांचे ते आवडते पेय आहे.

उष्ण कटिबंधातील साखर उसापासून मिळते तर मध्य कटिबंधातील साखर बीटापासून मिळते.

जंगलातील साखरेच्या उत्पादनाचा अनुक्रम पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ हिंदुस्तान | ९ लक्ष टन | (उसापासून) |
| २ क्यूबा | ६ '' '' | (उसापासून) |
| ३ रशिया | ३॥ '' '' | (बीटपासून) |
| ४ जर्मनी | ३ '' '' | (बीटपासून) |
| ५ अमेरिका | २॥ '' '' | (ऊस + बीट) |
| ६ फोर्मोसा | २॥ '' '' | (उसापासून) |
| ७ फिलीपाईन्स | २ '' '' | (उसापासून) |
| ८ हवाई | २ '' '' | (उसापासून) |
| ९ ब्राझील | १॥ '' '' | (उसापासून) |
| १० पोर्टोरिको | १॥ '' '' | (उसापासून) |
| ११ आस्ट्रेलिया | १॥ '' '' | (उसापासून) |
| १२ झेकोस्लोव्हाकिया | १॥ '' '' | (उसापासून) |
| १३ जाव्हा (ईस्ट इंडीज) | १॥ '' '' | (उसापासून) |

एके काळी जगात सर्वतोमुखी असलेले जाव्हा आता साखरेच्या उत्पादनात शेवटी येऊन बसले आहे. आर्थिक स्वयंपूर्णतेकडे जगातील राष्ट्राचे कसे लक्ष लागले आहे हे यावरून दिसून येणार आहे. हिंदुस्थानचे उत्पादन जरी अव्वल दर्जाचे असले तरी तेथून निर्यात मात्र होत नाही. कारण हिंदुस्थानची साखरेची गरजही तितकीच मोठी आहे.

कोकोला युरोपमध्ये पुष्कळच प्राधान्य आहे. चॉकलेटचे बहुविध प्रकार कोकोपासून तयार होत असल्याने जागतिक व्यापारातील प्रमुख पदार्थात कोकोचा समावेश होतो. प्रथम दक्षिण अमेरिका व आफ्रिका येथील कोको उत्पादकांमध्ये चांगलीच स्पर्धा चाले. आता गोल्डकोस्ट व नायजीरिया येथील इंग्लिश कोको उत्पादकांनी हा धंदा बराचसा काबीज केला आहे. कॅमेरून (आफ्रिका) व स्पॅनिश गिनी (आफ्रिका) येथेही कोकोचे उत्पादन होते. कोकोचे सर्वांत बडे गिऱ्हाईक म्हणजे अमेरिका होय. जागतिक

उत्पादनाचा ४० टक्के भाग एकट्या अमेरिकेला लागतो. व त्याचा पुरवठा दक्षिण अमेरिकेतून होऊ शकतो. चॉकलेट अगर कोको याचा आशिया खंडात मात्र फारसा खप नाही.

कोकोचे उत्पादन -

| | |
|---|---|
| गोल्डकोस्ट- (आफ्रिका-ब्रिटिश) | ६८६७० टन. |
| ब्राझील- (दक्षिण अमेरिका) | २७५०० टन. |
| नायजीरिया (आफ्रिका ब्रिटिश) | १७३८० टन. |
| पश्चिम आफ्रिका (फ्रेंच) | १३००० टन. |
| फ्रेंच कामेरून (आफ्रिका) | ६१७५ टन. |

याशिवाय त्रिनिदाद (आफ्रिका), युकॅडोर (दक्षिण अमेरिका) वगैरे प्रदेशांतून अल्पस्वल्प प्रमाणात कोको निर्माण होतो.

कॉफी

जागतिक उत्पादनापैकी ६२ टक्के कॉफी एकट्या ब्राझीलमध्ये निर्माण होते. याशिवाय दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया हे संस्थान ईस्ट इंडीज बेटे (जावा-सुमात्रा) आफ्रिका, अरबस्तान, हिंदुस्तान इत्यादी प्रदेशही कॉफीचे उत्पादन करतात. १९३६ साली अमेरिकन कॉफी उत्पादकांची एक सभा भरून आशिया व आफ्रिका येथील कॉफी उत्पादन कसे हाणून पाडावे याची चर्चा झाली. ब्राझीलने जागतिक कॉफी पुरवठ्याचा मक्ता संपादन करावा म्हणून त्यांची सारी धडपड!

कॉफीचे उत्पादन

| | | |
|---|---|---|
| ब्राझील- | ५९०५० टन | दक्षिण अमेरिका |
| कोलंबिया- | ५३७५० टन | |
| ईस्ट इंडीज बेटे व हिंदुस्तान | २७५०० टन | |
| आफ्रिका | १२५०० टन | |

●●●

## ३

विषुववृत्तापासून ध्रुव प्रदेशाकडे सरकताना लागणाऱ्या प्रदेशाची पाहणी करत आपण मध्यकटिबंधापर्यंत आलो. चालू युगातील भांडवलशाही राष्ट्राचा गट याच कटिबंधात पाहायला मिळतो. या कटिबंधाचा दक्षिण गोलार्धात मोडणारा बहुतेक सर्व भाग जलमयच असल्याने उत्तर गोलार्धातील या प्रदेशाचा विचार काय तो आवश्यक आहे. या पट्ट्यातील सर्व प्रदेशाचे हवामान एकाच नमुन्याचे आहे असे नाही. उष्ण तापमान , पाऊस वगैरे बाबतीत अक्षांशानुरूप थोडा फार बदल या विभागात ठिकठिकाणी पाहावयास मिळतो. दुय्यम विषुववृत्तीय प्रदेशात ज्याप्रमाणे थोड्या फार फरकाने हवामानाचे बदल दृष्टीला पडतात तोच प्रकार काही अंशाने याही विभागात दृष्टोत्पत्तीला येतो. मनुष्याला लागणारे अन्न व कापड यांना आवश्यक अशा वस्तूंच्या निर्मितीबाबत मात्र या कटिबंधातील सर्व प्रदेशांची एकवाक्यता आहे.

या विभागातील मानवाचे मुख्य अन्न म्हणजे गहू होय! जागतिक पिकात तांदुळाइतकेच -किंबहुना काटाभर अधिक महत्त्व गव्हाला आहे. या कटिबंधातील प्रत्येक प्रदेशांत गहू प्रामुख्याने खाल्ला जातो. ज्या ठिकाणी प्रदीर्घ हिवाळा आहे असे काही प्रदेश सोडल्यास प्रत्येक देशात तो कमीअधिक प्रमाणात निर्माण होतो. पोलंडसारख्या काही प्रदेशात राय नावाच्या गव्हाच्या जातीचे पण किंचित हलक्या दर्जाचे धान्य खाल्ले जाते, पण त्याला कारण पोलंडचे दारिद्रय ! तांदूळ निर्माण करणारा हिंदी शेतकरी ज्याप्रमाणे घरी नाचणी खातो त्यातलाच हा प्रकार आहे. युरोपियन धनिकांनी निर्माण केलेल्या विषमतेचा तो परिणाम आहे. पोलंडमधील धनिक गहूच खातात पण राबणाऱ्या गरिबांच्या वाट्याला मात्र राय येतो!

अमेरिका खंडाचा शोध लागण्यापूर्वी बहुतेक सर्व युरोपियन राष्ट्रे आपणास लागणाऱ्या गव्हाचे उत्पादन करीत. एखाद्या राष्ट्रास गहू कमी पडल्यास त्याचा पुरवठा शेजारच्या दुसऱ्या एकाद्या राष्ट्राकडून होऊ शके. पण अमेरिकेच्या वसाहतीमुळे, उत्तर अलबर्टापासून उत्तर टेक्सासपर्यंत विस्तारलेले असे एक प्रचंड गव्हाचे शेतच

युरोपियन राष्ट्रांना उपलब्ध झाले. एकोणिसाव्या शतकात युरोपियन जनतेने शेती सोडून कारखानदारीत धाव घेतल्याने तर या प्रचंड प्रदेशातील गव्हाचे उत्पादन हा एकच अन्नाचा आधार तिला राहिला, व या प्रदेशात गव्हाचे उत्पादन कसून करण्यास सुरुवात झाली. अल्पसा पाऊस, किंचित उबदार उन्हाळा व कोरडी थंड हिवाळी हवा यांमुळे या प्रदेशातील गव्हाचे उत्पादन खात्रीलायक! युरोपियन हवेची अस्थिरता येथे नसल्याने पीक बुडण्याची भीती या प्रदेशाला नाही! कोठे झाड ना झुडूप ! हजारो मैल विस्तारलेली एकजात सपाट शेतजमीन ! यांत्रिक शेती साधनांची उपलब्धता! सर्व युरोपियन राष्ट्रांना गहू पुरविण्याचा मक्ता एकट्या अमेरिकेने घेतल्यास मुळीच आश्चर्य नाही. अमेरिकेतील या गव्हाच्या प्रदेशास 'प्रेरीज' असे म्हणतात.

प्रथम प्रथम कापसाप्रमाणे गव्हाच्या शेतीवरही वसाहतवाल्यांनी काहीच निर्बंध घातले नाहीत. ते जमीन निकस होईपर्यंत पिके काढीत, तिची जाळपोळ करीत, जमीन नापीक झाली की पुढे जात व दुसऱ्या जमिनीवर शेती सुरू करीत, अठराव्या शतकाच्या अखेरीच्या आतच न्यूझीलंडच्या विभागातील शेती त्यांनी भिकेला लावली. उत्तरेकडील संस्थानांतून हा प्रकार तर अद्यापि चालू आहे. डॅकोटा, मिनोस्टा वगैरे संस्थानांतील शेतकरी शेती उजाड करीत करीत कॅनडात घुसू लागले आहेत. जुनी शेती बाद करून नवी हुडकण्याचा हा क्रम असाच या गतीने चालू राहिल्यास सर्व शेतजमीन खराब होऊन जाण्यास फारसा वेळ लागणार नाही.

गव्हाच्या बाबतीत अमेरिकेला मिळालेले प्राधान्य फार काळ टिकू शकले नाही. विसाव्या शतकात सुरू झालेल्या स्पर्धेमुळे गहू मोठ्या प्रमाणात निर्माण करणाऱ्या राष्ट्रांत आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. अमेरिकेच्या बाजारातील गव्हाचे प्रस्थ ब्रिटिश साम्राज्यातील आस्ट्रेलिया व कॅनडा या दोन प्रदेशांनी मोडून काढले. कॅनडाचे अलबर्टा, सस्कॅचिव्हान व मॅनिटोबा हे तीन जिल्हे गव्हाची प्रचंड प्रमाणात निर्यात करू लागल्याने अमेरिकेचे गिऱ्हाईक बुडाले. वस्ती थोडी, शेती विपुल व हवामानाची संपूर्ण अनुकूलता यामुळे कॅनडाचे उत्पादन ज्या प्रमाणात वाढले त्या प्रमाणात शोषण मुळीच वाढले नाही, व कॅनडात निर्यातीसाठी विपुल गहू शिल्लक राहू लागला. साम्राज्यातील प्रदेशांना प्राधान्य देण्याचे धोरण इंग्लंडने चालू केल्यामुळे इतके दिवस अमेरिकेला मिळणारे इंग्लंडचे बडे गिऱ्हाईकही कॅनडाला मिळाले. युरोपियन राष्ट्रांत गव्हाची मोठ्या प्रमाणात आयात करणारे इंग्लंड हे एकच राष्ट्र आहे. इंग्लंडइतकी आयात युरोपातील दुसऱ्या कोणत्याच राष्ट्राची नाही. इंग्लंडचे गिऱ्हाईक अशा रीतीने नाहीसे झाल्यामुळे अमेरिकन गव्हाच्या शेतीवर बराच परिणाम झाला. कापसाप्रमाणे गहूही पडून राहू लागल्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती खालावली, व गव्हाचा नाश करण्याची पाळी अमेरिकन सरकारवर आली. जगातील बहुजन समाजाला हा गहू अल्प किंमतीत पुरविण्याचे सत्कृत्य अमेरिका करू शकली नाही हे लक्षात ठेवण्याजोगे आहे.

विषुववृत्ताच्या दक्षिणेस अर्जेंटिना (दक्षिण अमेरिका) व ऑस्ट्रेलिया हे दोन भूमीभाग आता गव्हाच्या उत्पादनात पुढे आले आहेत. या प्रदेशांनाही वरीलप्रमाणेच निसर्गाची अनुकूलता आहे. पश्चिम युरोप हे एक गव्हाचे मोठे गिऱ्हाईक आहे. या भागातील जनतेचे शोषण उत्पादनाच्या मानाने अधिक असल्याने त्याला गव्हाची आयात करावी लागते. अर्जेंटिना व ऑस्ट्रेलिया यांच्या गव्हाचा हंगाम उत्तर गोलार्धातील हिवाळ्याचे संधीस येतो. युरोप उत्तर गोलार्धात असल्याने तेथे हिवाळ्यात गव्हाची चणचण होण्यास व ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना यांची पिके येण्यास एकच गाठ पडते व स्वाभाविकच युरोपचे गिऱ्हाईक या प्रदेशांना मिळते.

कॅनडाने गव्हाच्या उत्पादनाबाबत मिळवलेले यश मात्र या दोहोंपैकी एकाही प्रदेशाच्या वाट्याला आलेले नाही. ऑस्ट्रेलियात पावसाची निश्चितता नसल्याने पिकात नेहमीच चढउतार होतो. अर्जेंटिनात शेतीच्या चुकीच्या पध्दतीमुळे उत्पादन वाढावे तसे वाढत नाही. युरोपातून परागंदा होऊन आलेल्या लोकांना अर्जेंटिनातील बडे जमीनदार आपल्या जमिनीचे छोटे छोटे तुकडे पाडून लागवडीसाठी देतात. या उपऱ्या कुळांना मिळणाऱ्या जमिनी लांब मुदतीने मिळत नसल्यामुळे कोणीकडून पोटापुरते मिळाले म्हणजे झाले, या धोरणाने ते उत्पादन

करतात. वर्ष दोन वर्षे काढवतील तशी काढून दुसरीकडे निघून जातात. शेतीत त्यांना कायम स्वरूपाचे हितसंबंध वाटत नसल्याने त्यांचे उत्पादन अगदी बेताचेच असते. अर्जेंटिनातील एकेक जमीनदार शंभर शंभर चौरस मैल शेतीचा धनी आहे. हा प्रदेश पूर्वी पंपास या नावाने ओळखला जाणारा गवताळ प्रदेश असल्याने गुरे पाळण्याचा धंदाही येथे चालू शकतो. शेतीची मशागत करून गहू पिकविण्याने जो पैसा मिळतो तो जनावरांच्या मांसावरही मिळू शकतो. मग मशागत करण्याचे परिश्रम तरी का घ्या? हाही एक विचार डोक्यात आल्याने अर्जेंटिनात जनावरे पाळण्याचा धंदा सध्या विशेष तेजीत आहे. गहू निर्मितीची यातायात करण्यास कोणी फारसे तयार नाही.

गव्हाच्या उत्पादनाचा सूक्ष्म विचार केल्यास असे आढळून येईल की, गव्हाचे उत्पादन शोषणाच्या मानाने नि:संशय अधिक आहे. हे विधान करताना अर्थातच एक गोष्ट गृहीत धरण्यात आलेली आहे. आणि ती म्हणजे, गव्हाची कमीत कमी किंमत गव्हाच्या व्यापाराचे नियंत्रण करणाऱ्या भांडवलदारांनी आपल्या हाती ठेविली आहे ही होय. ही किंमत आणखी कमी होण्याची शक्यता निर्माण झाल्यास जगातील बहुजन समाज सर्रास गहू खाऊ शकेल व मग कदाचित आज पडून अगर जळून जाणारे गव्हाचे साठे ज्यादा उत्पादन या सदरात पडणारही नाहीत ! गेल्या महायुध्दानंतर गव्हाच्या लागवडीखाली असलेल्या शेतीचे प्रमाण खूपच वाढले. ही वाढ मुख्यत्त्वेकरून पूर्वीपासून गव्हाच्या निर्यातीबद्दल प्रसिध्द असलेल्या चार प्रदेशांतच झाली. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा व अर्जेंटिना हेच ते चार प्रदेश होते. हे प्रदेश युध्दापूर्वी ३ कोटी बुशेल गहू निर्माण करीत असत. १९२४ ते २८च्या दरम्यान हे उत्पादन ४ कोटी बुशेलपर्यंत गेले. युध्दकालात गव्हाने दिलेला पैसा डोळ्यापुढे दिसत असल्यामुळे दिसेल तेवढी जमीन गव्हाच्या शेतीसाठी उपयोगात आणण्याचे वेड शेतकऱ्यांना व जमीनदारांना लागले होते. आपण निर्माण करीत असलेल्या ज्यादा गव्हाचा खप होईल अशी कल्पना त्यांनी का करून घेतली होती हे कळण्यास काहीच मार्ग नाही. त्यांना कोणीही तशी हमी दिलेली नव्हती. आज ना उद्या ज्यादा उत्पादनाची ही शर्यत या लोकांना गोत्यात आणणार हे स्पष्ट दिसत होते. १९२८ सालच्या पिकामुळे तो दिवस उजाडला. या सालचे मुबलक पीक पदरात पडण्यास आणि गव्हाच्या किंमतीला उतार लागण्यास एकच गाठ पडली. लिव्हरपूरला १५ शिलिंगास क्वार्टर या भावाने विकला जाणारा गहू १० शिलिंगावर आला. आणखी ३ वर्षानी म्हणजे १९३१ चे सुमारास गव्हाचा भाव ४।। शिलिंगावर आला. भाव इतके उतरूनही अमेरिकन शेतकरी फारसा नुकसानीत आला नाही. गहू निर्यात करणाऱ्या इतर देशांच्या मानाने अमेरिकन शेतीची स्थिती पुष्कळच बरी होती. पण तिचा गव्हाचा साठा बेताबेताने वाढू लागला होता व किंमती आणखी कमी होण्याची भीती होती.

पडत्या किंमतीचा फायदा घेण्याच्या बुध्दीने कॅनेडियन सट्टेवाल्यांनी भरमसाट गहू खरेदी करून ठेविला होता. पण जागतिक बाजारात गव्हाला तेजी येण्याचे चिन्ह कोठेच दिसेना. त्यामुळे या सट्टेवाल्यांना दे माय धरणी ठाय झाले! कॅनेडियन सरकाराच्या दारात त्यांनी धरणे धरले. इकडे अमेरिकन सरकार कापसाप्रमाणेच गहू निर्माण करणाऱ्या लोकांनाही संरक्षण देण्याचा विचार करू लागले होते. गव्हाचे साठे खरेदी करून आशिया खंडाला स्वस्त दरात गहू पुरविण्याचा अमेरिकन सरकारचा विचार होता. पण अमेरिकन भांडवलदार वर्ग या योजनेला अनुकूल नव्हता. या प्रकरणात गव्हाची निर्यात करणारा देश म्हणून अमेरिकेला असलेले महत्त्व मात्र क्रमाक्रमाने नाहीसे झाले. अमेरिकन सरकारप्रमाणेच कॅनेडियन सरकारनेही आपल्या सट्टेवाल्यांच्या बचावासाठी गहू खरेदी करण्याचा कार्यक्रम आखला. गव्हाची किंमत कमी होत होत एका विशिष्ट पातळीला आली की, सरकार गहू खरेदीचा कार्यक्रम आखून किंमती सावरून धरण्याचा प्रयत्न करी; परंतु सरकारची ही हालचाल शेतकऱ्यांपेक्षा भांडवलदार वर्गाला अधिक उपकारक असे. या देशातील सरकारसंस्था भांडवलशाहीच्या हाती असल्याने भांडवलदार वर्गाच्या हिताला तिच्याकडून प्राधान्य मिळे यात काहीच आश्चर्य नाही. १९३५ साली कॅनडाने गहू खरेदी करून कसेबसे गव्हाच्या किंमतीला स्थैर्य आणले. पुढे गव्हाची दोन पिके बुडाल्याने शिल्लक गव्हाला तेजी आली व प्रश्न तात्पुरता सुटला. गहू बहुजन समाजाच्या खाण्यात यावा व

शेतकऱ्यांचेही नुकसान होऊ नये या दृष्टीने एखादी कायम स्वरूपाची योजना आखण्याचा प्रयत्न यांपैकी एकाही देशाने केला नाही हे केवढे आश्चर्य ? गहू निर्माण करणाऱ्या या प्रदेशात गव्हाचे साठे पडून राहण्यास आणखी एक विशिष्ट गोष्ट कारणीभूत झाली व तिचे मूळ पश्चिम युरोपमध्ये होते. निर्यात करण्यासाठी अमेरिकन व कॅनेडियन भांडवलवाले गव्हाचे साठे करीत बसले असता इकडे जर्मनी, फ्रान्स, इटली वगैरे देशांतील भांडवलवाले व त्यांची सरकारे निराळाच डाव खेळत होती. आर्थिक स्वायत्ततेच्या नावाखाली स्वत:चे गव्हाचे उत्पादन वाढवून गव्हाची आयात शक्यतो कमी करण्याचे त्यांचे प्रयत्न कसून चालले होते. अमेरिकन गव्हाला प्रवेश मिळू नये म्हणून त्यांनी संरक्षण जकातीची भिंत उभी केली होती, व राष्ट्रात निर्माण होणारा महाग गहू जनतेच्या गळ्यात बांधण्याचे काम सुरू केले होते. गहू खपेल या आशेने अमेरिकेने जादा गहू निर्माण करावा, गव्हाच्या किंमती त्यामुळे उतराव्या, या उतरलेल्या किंमती आपल्या गव्हाला बाधक होतील म्हणून वरील युरोपियन राष्ट्रांनी आयातीवरील जकाती वाढवाव्या, असा प्रकार सर्रास सुरू झाला. जर्मनीचा जकातीचा दर प्रत्येक बुशेलला १ डॉलर ६० सेंट होता. म्हणजे अमेरिकेत १ बुशेलला गव्हाला जी किंमत पडेल त्याच्या चौपट जकात हा गहू जर्मनीला पाठवावयाचा झाल्यास भरावी लागे. शिवाय वाहतुकीचा खर्च निराळाच ! इटलीत ही जकात १डॉलर होती; तर फ्रान्समध्ये ८० सेंटस् होती. (१ डॉलर = १०० सेंटस्). हे देश अशा प्रकारे आपल्या देशात निर्माण होणाऱ्या गव्हाला संरक्षण तर देतेच, पण उत्पादन वाढावे म्हणून शेतकऱ्यांना सवलतीने भांडवलही पुरवीत. या तीन राष्ट्रांनी मिळून अशा प्रयत्नाच्या जोरावर आपली गव्हाची आयात १० कोटी बुशेलांनी घटविली. युध्दकालात अन्नासाठी अगर इतर दुसऱ्या कोणत्याही गोष्टीसाठी विसंबून दुसऱ्यावर राहण्याचा प्रसंग येऊ नये हा या राष्ट्रीय आर्थिक स्वयंपूर्णतेच्या तत्त्वामागील मुख्य उद्देश असतो व यामुळे नैसर्गिक परिस्थिती प्रतिकूल अगर तितकीशी अनुकूल नसताही स्पर्धाशील भांडवलदार राष्ट्रे बहुजन समाजाला राष्ट्रवादाची मदिरा पाजून त्याची पिळवणूक करीत असतात व परस्पर सहकार्याने मानवी जीवनाला मिळू शकणारी सुबत्ता, स्वास्थ्य टाळीत असतात. अमेरिकन प्रेरीजना निसर्गत: गव्हाच्या उत्पादनाबाबत मिळालेले प्राधान्य याप्रमाणे युरोपियन राष्ट्रांनी बुध्दिपुरस्सर हाणून पाडले. लाखो बुशेल गहू इकडे अमेरिकेत सडून चालला होता, जाळला जात होता. तर इकडे पश्चिम युरोपातील राष्ट्रे नुकसान सोसूनही आपणास लागणारा गहू स्वत:च निर्माण करून घेण्याचा अट्टहास करीत होती. निसर्गाची सुबत्ता डावलून माणसे स्वत:च्या कृतीने बुध्दिपुरस्सर दारिद्र्य व दु:ख ओढवून आणतात ते असे !

आंतरराष्ट्रीय गहू करार करण्याच्या दृष्टीने आयात व निर्यात करणारी राष्ट्रे एकत्र आली, त्यांनी करारमदारही केले. पण गव्हाचे उत्पादन नियंत्रित करण्याची योजना कोणीच पुढे आणली नाही. शेवटी अमेरिकन सरकारने A.A.(ॲग्रिकलचरल ॲडजस्टमेंट) ही योजना काढली व आपल्यापुरते गव्हाचे उत्पादन नियंत्रित केले. कापसाप्रमाणेच अमेरिकन सरकारने गहू निर्माण न करण्याबद्दल पैसे देऊ केले. ६ कोटी ६ लक्ष एकर जमीन गहू पिकवीत असे या योजनेनंतर हा आकडा ४ कोटी २० लक्षावर आला व एकाकाळी जगाला गहू पुरविणारा हा प्रदेश फक्त अमेरिकेपुरता गहू निर्माण करू लागला. पण अमेरिकन सरकार अशा रितीने किती काळ पैसा पुरवीत बसणार हा प्रश्नच होता. या योजनेची कालमर्यादा संपताच फिरून गव्हाची शेती ७ कोटी ५० लक्ष एकरांवर गेली ! अमेरिकेने गव्हाची जागतिक बाजारपेठ काबीज तरी करावी नाहीतर गहू जाळून तरी टाकावा अशी परिस्थिती निर्माण झाली. १९३९ चे महायुध्द म्हणजे अमेरिकेला एकाद्या पर्वणीप्रमाणे वाटले असल्यास काय आश्चर्य !

जगातील एक तृतीयांश लोकसंख्येचे गहू हे मुख्य अन्न आहे. गहू खाणारे लोक बरेचसे सुधारलेले असून जगावर त्यांचेच प्रभुत्व चालते. रशिया, चीन, अमेरिका, हिंदुस्थान हे देश जरी गव्हाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करीत असले, तरी एका अमेरिकेखेरीज जगाच्या बाजारात यांपैकी कोणाचाच गहू येऊ शकत नाही. कारण त्यांच्या उत्पादनाच्या मानाने त्यांचे शोषणही तितकेच मोठे आहे. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना वगैरे प्रदेशांचे उत्पादन व शोषण यांत भलतेच अंतर असल्याने जागतिक गहू बाजारात

या प्रदेशाचा गहू प्रामुख्याने दृष्टोत्पत्तीला येतो; व गव्हाचे उत्पादक म्हणून प्रामुख्याने या देशांची नावे पुढे येतात.

गव्हाच्या उत्पादनाचा जागतिक अनुक्रम सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे आहे.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रशिया | १२५२० | लक्ष | बुशेल | (किंवा) | १२५ | कोटी | २० | लक्ष | बुशेल |
| चीन | ८५२० | " | " | " | ८५ | " | २० | " | " |
| अमेरिका | ४९२० | " | " | " | ४९ | " | २० | " | " |
| हिंदुस्तान | २९७० | " | " | " | २९ | " | ७० | " | " |
| इटली | २३१० | " | " | " | २३ | " | १० | " | " |
| फ्रान्स | २२८० | " | " | " | २२ | " | ८० | " | " |
| कॅनडा | २२५० | " | " | " | २२ | " | ५० | " | " |
| अर्जेंटिना | १२०० | " | " | " | १२ | " | ० | " | " |
| ऑस्ट्रेलिया | ११४० | " | " | " | ११ | " | ४० | " | " |

यानंतर इतर किरकोळ देशांचा अनुक्रम लागतो. कॅनडा, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया या देशांचे उत्पादन बरेच खालच्या दर्जाचे असून गव्हाच्या निर्यातीत मात्र त्यांचा दर्जा बराच वर आहे. किंबहुना या प्रदेशाइतकी गव्हाची मोठी निर्यात दुसऱ्या कोणाचीच नाही असे म्हटल्यास हरकत नाही. याचे एकच कारण म्हणजे उत्पादनाच्या मानाने या देशाची गव्हाची गरज अत्यंत अल्प आहे हेच होय .

याच विभागातील दुसरे महत्त्वाचे धान्य म्हणजे मका होय. अमेरिकेत 'धान्य प्रदेश' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विभागातच मका होतो. मक्याच्या एकंदर उत्पादनाचा नऊ दशांश भाग डुकरे पोसण्यासाठी उपयोगात आणला जातो. शिकागोचा खाटीकखाना जगाला मांसाचे हवाबंद डबे लाखांनी पुरवितो. या खाटीकखान्यात बळी जाणारी जनावरे, विशेषत: डुकरे पोसण्याचे काम मका निर्माण करणारा प्रदेश करतो. मका हे धान्य गव्हाप्रमाणे जगाच्या बाजारात येत नाही त्याचे मुख्य कारण हेच आहे. अमेरिकेप्रमाणेच अर्जेंटिनातही मक्याचे उत्पादन बऱ्याच मोठ्या प्रमाणात होते. गुरांच्या पोषणाला पुरेसा मका ठेवून बाकीचा मका अर्जेंटिनामधून पश्चिम युरोपला जातो. अमेरिकेत मका व मांस हे जोड उत्पादन समजण्यात येते. जागतिक बाजारात मांसाला प्राधान्य असल्याने अमेरिकन शेतकऱ्याच्या उत्पन्नाला डुकरे पाळण्याच्या धंद्याने चांगली जोड मिळते. मक्याप्रमाणेच डुकराचे पीकही ते काढतात. अमेरिकन लोकांच्या खाण्यात येणाऱ्या मांसापैकी निम्मे मांस डुकराचे असल्यामुळे अमेरिकन शेतकऱ्यांना हा जोडधंदा चांगलाच मानवतो. अलीकडे रशियानेही डुकरे पोसण्याचा धंदा मोठ्या प्रमाणात चालू केला असल्याने तेथील अमेरिकन डुकराच्या मांसाचे गिऱ्हाईक घटले आहे. ऑस्ट्रेलियानेही मेंढीचे मांस हवाबंद डब्यात भरून जागतिक बाजारात विक्रीस आणल्याने डुकराचे मांस व मेंढीचे मांस अशी जागतिक बाजारात स्पर्धा चालू झाली आहे. व अमेरिकन शेतकऱ्याच्या या जोडधंद्याला अवकळा येऊ लागली आहे. गेल्या महायुध्दानंतर काही काळ मांसाच्या धंद्याला तेजी आली. पण शांतता होऊन सर्वत्र स्थिरस्थावर होऊन जगातील सर्व राष्ट्रांची अन्नोत्पादन शक्ती वाढताच मांसाच्या व्यापाराला हळू हळू मंदी येण्यास सुरुवात झाली. १९३२ साली अमेरिकेचा मांस व्यापार तिसऱ्या हिश्श्याने घटला. युरोपियन राष्ट्रे मांसासाठी अमेरिकेवर विसंबून न राहता स्वत:च्या मांस पुरवठ्याच्या योजना आखू लागली व यामुळे १९३३पासून पुढे अमेरिकेत डुकराचा सुळसुळाट झाला. यातून सुटण्याचा मार्ग म्हणून ८० पौंड वजनाच्या आतील डुकरे सर्रास कापण्यात आली. त्याचे मांस खत म्हणून वापरण्यात आले, व चरबीचा उपयोग यंत्रांना लागणाऱ्या वंगणासाठी करण्यात आला.


पश्चिम युरोपमधील बहुतेक सर्व राष्ट्रे दाट लोकवस्तीचे प्रदेश म्हणून प्रसिध्द आहेत. वस्तुत: त्यांनी आपणास लागणारे मांस अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना वगैरेसारख्या प्रदेशांतून आणणे सोयीचे व स्वस्त आहे. परंतु नेहमीच्या खाण्यात येणारा हा पदार्थ परकीय देशांतून आणण्यात आल्याने येणारे परावलंबित्व स्वीकारण्यास ही राष्ट्रे तयार नाहीत. गेल्या महायुध्दात जर्मनीच्या पराभवाला त्याचे खाद्यपदार्थ-परावलंबित्व विशेष करून कारणीभूत झाले असल्याने युध्दोत्सुक भांडवलशाही राष्ट्रे परावलंबित्व टाळण्याची दक्षता घेत असल्यास आश्चर्य नाही. मांस पुरवठ्याबाबत इंग्लंड सर्वस्वी परावलंबी आहे. इंग्लिश साम्राज्यातील न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया हे दोन प्रदेश इंग्लंडला मांस पुरवठा करू शकतात. इंग्लंडला आरमाराची जोड असल्याने व साम्राज्यात मांस पुरवण्याची सोय असल्याने युध्दकालातही इंग्लंडची मांसविषयक कुचंबणा

होऊ शकत नाही.

अर्जेंटिनात जनावरे पाळण्याचा धंदा मोठ्या प्रमाणात चालतो. पण मेंढी अगर डुक्कर यांच्या मांसाला आहारात असलेले प्राधान्य इतर गुरांच्या मांसाला नसल्याने जागतिक मांस बाजाराचा फायदा जसा मिळावा तसा अर्जेंटिनाला मिळेना. या जनावरांची काय वाट लावावी हा मोठा प्रश्न येऊन पडला. खाण्यास लागणाऱ्या मांसापुरती गुरे मारावयाची म्हटल्यास फारच थोडक्या जनावरांवर काम भागू लागले. शेवटी अर्जेंटिनातील सरकाराने चामड्याचा बाजार काबीज करण्याची कल्पना काढली, व लाखो जनावरे चामड्यासाठी मारण्यात येऊ लागली. जनावरांच्या खुरापासून सरस मिळू लागल्याने चामड्याच्या धंद्याला जोड मिळाली. या दोन पदार्थांपासून मिळणारे उत्पन्न पुरेसे असल्याने मांसाची फिकीर करण्याचे कारण अर्जेंटिनाला राहिले नाही; याचा परिणाम असा झाला की, मांसाचे पर्वतप्राय ढीग अर्जेंटिनात जागचेजागी सडून जाताना दिसू लागले.

मांस वाहतुकीच्या कामी इंग्लंड व अमेरिकन जहाज कंपन्या यांची स्पर्धा जगद्विख्यात आहे. मांस बंद करण्यास लागणारे डबे जस्ती असतात. इंग्लंडला ही धातू मलायांत मिळत असल्याने आरंभी आरंभी मांस अमेरिका, ऑस्ट्रेलिया इत्यादिकांचे, व डबे बंद करून ते जागतिक बाजारात नेण्याचे काम इंग्लंडचे, असा प्रकार होऊ लागला. मांस निर्माण करणारी अमेरिका पुढील धंदे इंग्लंडला सुखासुखी थोडीच करू देणार ! दक्षिण अमेरिकेतील बोलेव्हिया प्रांतात जस्ताच्या खाणी लागल्या. तत्काळ अमेरिकन भांडवलवाल्यांनी त्या ताब्यात घेऊन जस्ताच्या डब्याचे उत्पादन चालू केले. स्वाभाविकच इंग्लंडला शह बसला. अमेरिकन नौकंपन्यांनीही गेल्या महायुध्दानंतर आपला व्याप वाढवून मांसाचे डबे जगभर पोहोचविण्याचे काम हाती घेतले. व या दोन व्यवसायांमधून इंग्लंडला काढता पाय घ्यावा लागणार असा रंग दिसू लागला. इतक्यात इंग्लिश नौकंपन्यांनी आपल्या जहाजांवरून मांस महिनामहिना सुरक्षित व ताजे राहू शकेल अशा हिमयुक्त थंड जागेची सोय केल्याने या योजनेनुरूप बाजारात येणारे मांस ताजे व स्वस्त मिळू लागले व फिरून मांस वाहतुकीचा जागतिक मक्ता इंग्लंडकडे आला.

ब्रिटिश साम्राज्यातील मांसोत्पादन करणाऱ्या देशांमध्ये न्यूझीलंडचा मांसोत्पादन अनुक्रम पहिला आहे. न्यूझीलंडमधील मेंढ्या मांसाच्या दृष्टीने अधिक फलदायी



जागतिक खनिज संपत्तीची विभागणी

आहेत, तर ऑस्ट्रेलियन मेंढ्या लोकरीच्या दृष्टीने अधिक उपयोगी आहेत. मनुष्यजातीला कपडा पुरविणारी वस्तू म्हणून कापसाच्या खालोखाल लोकरीला महत्व आहे. विशेषत: मध्य कटिबंध हा प्रदेश वर्षातून बरेच महिने थंड असल्याने येथील लोकांचे लोकरीच्या कपड्यावाचून भागत नाही. जगाला होणारा लोकरीचा पुरवठा मुख्यत: ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना, न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिका या प्रदेशांकडून केला जातो. हे देश कच्ची लोकर निर्माण करीत, व इंग्लंडमधील यॉर्कशायर परगण्यातील शहरे व पश्चिम युरोपमधील औद्योगिक केंद्र या कच्च्या लोकरीपासून कापड बनविण्याचे काम करीत. कापूस बाजारात दिसून येणारी अस्थिरता येथेही आहे. इटली, स्पेन, जर्मनी या सर्व राष्ट्रांनी कपड्याबाबत स्वयंपूर्ण बनण्याचे धोरण आखल्याने एका इंग्लंडखेरीज बहुतेक सर्व युरोपियन राष्ट्रांची लोकरीची आयात घटली. १९३२ साली इटली व जर्मनी यांनी ऑस्ट्रेलियन लोकर घेण्याचे स्थगित केले. व त्यामुळे २ लाख गासडी लोकर तेथे पडून राहिली. रशियाने ताग, अंबाडी यांसारख्या वनस्पतींपासून रासायनिक क्रियेच्या जोरावर धागा व कापड बनविण्याचे उद्योगधंदे चालू केले. व जागतिक कापड बाजारातील रशियाचे गिऱ्हाईक एक दिवस अदृश्य झाले. साखर निर्मितीबाबत जे धोरण युरोपियन राष्ट्रांनी दाखविले तेच धान्य व कापड या बाबतींतही त्यांनी दाखविले. आर्थिक स्वयंपूर्णतेच्या नादी लागलेल्या राष्ट्रांनी आपली राहणी टंचाईची व महागाईची करून ठेवली. सर्वसामान्य जनतेला सहजसुलभ असणारी सुबत्ता युध्द कल्पनांच्या आहारी जाऊन त्यांनी नष्ट करून टाकली. अटलांटिक महासागराच्या पूर्व किनाऱ्यावर लोक दात कोरून पोट भरताना दिसून आले तर पश्चिमेस खंडोगणती खाद्यपदार्थ लोक समुद्रात फेकताना अगर इंजिनातून जाळताना दिसू लागले. मनुष्य सुकाळात दुष्काळी जिणे कंठू लागला असंख्यांचे परिश्रम निरर्थक होऊ लागले. निसर्गाची सुबत्ता फुकट जाऊ लागली.

●●●

४

आतापर्यंत वनस्पतीजन्य संपत्तीचा व तिच्या देवघेवीचा विचार झाला. यापुढे प्राणी -संपत्तीचा विचार करावयाचा आहे. सृष्टीमधील प्राण्यात मानव श्रेष्ठ असल्याने इतर अनेक प्राण्यांवर तो आपली सत्ता चालवीत असतो, आपल्या सुखसंवर्धनासाठी त्यांची आपल्या इच्छेनुरूप वासलात लावीत असतो. भांडवलशाही व्यापारीतंत्राने वनस्पतीसृष्टीत जो धुमाकूळ घातला तितकाच -किंबहुना त्याहून काटाभर अधिक -प्राणीसृष्टीत घातला आहे. उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत विस्तारलेल्या या भूगोलावर हवामानानुरूप व प्रदेश वैशिष्ट्यानुरूप अनेक प्राणी पसरलेले आहेत. या प्राण्यांच्या हत्येवाचून मानवी जीवित अशक्यप्राय आहे अशी मुळीच स्थिती नाही. पण मानवी सुखाच्या, सौंदर्याच्या, बाष्कळ कल्पनांमुळे प्राणीसृष्टीवर मानवाने एवढा मोठा आघात केला आहे की, जगातील प्राण्यांच्या कित्येक जाती आता नष्टप्राय झाल्या आहेत व काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

प्राणी सृष्टीच्या संपूर्ण नाशाचे कार्य मानव कशा तऱ्हेने करीत आहे याचे उत्तम उदाहरण मध्य कटिबंध व ध्रुवप्रदेश यांच्या सीमाप्रांतात असलेल्या थंड प्रदेशात पाहावयास मिळते. या प्रदेशाला दुय्यम ध्रुवप्रदेश म्हणून संबोधण्यास हरकत नाही. उत्तर अमेरिकेच्या पॅसिफिक किनाऱ्यापासून तो तहत उत्तर सैबेरियाच्या पूर्व टोकापर्यंत हा प्रदेश पसरलेला आहे. कॅनडाचा उत्तर भाग, नॉर्वे, स्वीडन, फिनलंड व सैबेरियाचा काही भाग इतके प्रदेश या पट्ट्यात मोडतात. या पट्ट्याच्या दक्षिणेस शेतीचा प्रेअरी अगर स्टेप्स् या नावाने ओळखला जाणारा प्रदेश येतो. शंक्वाकृती वृक्षराजी या दुय्यम ध्रुवप्रदेशात पहावयास मिळते व त्याच्या लगतच

खाली असलेल्या प्रदेशात पानझडी वृक्षाची अरण्ये आहेत. हा सर्व प्रदेश जंगलमय आहे. सूचिपर्ण अथवा शंक्वाकृती वृक्षराजीपासून मिळणारे लाकूड मऊ असल्यामुळे कागद, शिसपेनी, आगकाड्या यांना अत्यंत उपयुक्त असते व स्वाभाविकच जागतिक बाजारात या लाकडाला व त्याच्या व्यापाराला प्राधान्य मिळते. पानझडी जंगलातील लाकूड बांधकामासाठी व लाकडी वस्तू तयार करण्यासाठी उपयोगी पडते. मानवी व्यवहारात धातूचे प्राधान्य वाढल्यामुळे लोकांची अशी कल्पना होती की, यापुढे लाकडाचे महत्व कमी होऊन जंगले खर्ची करण्याच्या धंद्याला थोडीफार मंदी येईल. परंतु असे काहीच घडले नाही. उलट अधिक मोठ्या प्रमाणात जंगलांचे खर्चीकरण चालू झाले. जळण, जहाजे बांधणे, चालू युगातील कागदाची प्रचंड मागणी पुरविणे, शिसपेनी, आगकाड्याच्या पेट्या, घरातील शोभेच्या लाकडी वस्तू, कृत्रिम रेशीम या साऱ्यांसाठी जंगलाची इतक्या मोठ्या प्रमाणात तोड चालू झाली की, थोड्याच काळात पृथ्वीवरील जंगले नाहीशी होतात की काय अशी भीती निर्माण झाली आहे. तज्ज्ञांच्या अंदाजाने आणखी ५० वर्षांत जळण व मऊ लाकूड यांचा संपूर्ण दुष्काळ पडेल.

युरोपखंडामध्ये लाकूड तोडीचा धंदा विशेष मोठ्या प्रमाणात चालू होऊन सुमारे १०० वर्षे झाली. खाणी व कारखाने यांत पुढारलेल्या इंग्लंडसारख्या देशात जंगलाचा मागमूसही शिल्लक राहिलेला नाही. निव्वळ जंगलावर आधारलेल्या उद्योगधंद्याची वाढ ही एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी अखेरीस झाली असल्याने तेव्हापासून आतापर्यंत जगाच्या प्रत्येक भागातील जंगलांवर माणसाने धाड घातली आहे; व कितीतरी मुलुख उजाड करून टाकला आहे. लाकूडपुरवठा भरपूर असूनही लाकडाची निर्यात न करणारा एकच देश आहे आणि तो म्हणजे रशिया होय ! जागतिक उद्योगधंद्यांना लागणाऱ्या लाकडापैकी निम्मे लाकूड कॅनडा व अमेरिका हे दोन देश पुरवितात व यामुळे या प्रदेशातील सूचिपर्ण वृक्षांची जंगले मूळच्या विस्ताराच्या एकतृतीयांशावर आली आहेत. नवीन लागवडीकडे लक्ष न देता, सतत गेली ८० वर्षे हे दोन देश आपली जंगले खर्ची करीत आले आहेत, व आता त्यांच्या लाकूड पुरवठ्याचे दिवाळे वाजत आले आहे. प्लेगाच्या साथीने मानव संहार व्हावा त्याप्रमाणे अमेरिकेत सरोवरांचा प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशातील वृक्षांचा संहार झाला आहे. मिशिगन सरोवराच्या आसपासचा प्रदेश जगाला लाकूड पुरवठा करीत असे. १९०० ते १९११ च्या दरम्यान हा पुरवठा निम्यावर आला. १९२० मध्ये तो चतुर्थांशावर आला आणि एके काळी लाकडाची निर्यात करणारा हा प्रदेश आता लाकडाची आयात करू लागला आहे. मिशिगनची अशा तऱ्हेने वाट लागल्यानंतर विस्कोसिनकडे लाकूडतोड्यांची धाड वळली, व आता मिनोस्टाची पाळी आली आहे. जंगलावर योग्य देखरेखीचा अभाव, लाकूड तोडण्यात प्रमाणबध्दतेचा अभाव, व वणवे या सर्वांमुळे अमेरिकेतील सुमारे २ कोटि एकर जंगलाची संपूर्ण नासाडी झाली आहे. अमेरिकन जंगलमय प्रदेशाचे क्षेत्र सरासरी चार कोटि एकर आहे. म्हणजे ८० वर्षांच्या कालावधीत अमेरिकेने आपल्या निम्या जंगलाचा नाश केला आहे. याच गतीने जंगलाचा नाश चालू राहिल्यास आणखी ३०-४० वर्षात अमेरिका उजाड होण्यास हरकत नाही. नुकत्याच भरलेल्या आंतरराष्ट्रीय जंगल परिषदेत झालेल्या चर्चेमध्ये शेवटी असा निष्कर्ष निघाला की, जंगलाचे संरक्षण करणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे, व त्या दृष्टीने काही खटपट होणेही जरूर आहे. अर्थात अशा तऱ्हेच्या योजनांना लाकूड धंद्यावर पैसा मिळविणाऱ्या भांडवलवाल्यांचा विरोध होणार ही गोष्ट उघडच होती; व तो त्याप्रमाणे झालाही ! जंगल संरक्षणाची कोणतीही निश्चित योजना न आखताच ही परिषद विसर्जन पावली व जंगलाचा नाश पूर्ववत चालू राहिला. सैबेरियातील जंगले मात्र अद्यापि अतूट राहिली आहेत. लाकूड पुरवठ्याचे त्याचे सामर्थ्य किती आहे याची निश्चित कल्पना येणे जरी कठीण असले तरीपण ते बरेच मोठे असावे यात शंका नाही. दळणवळणाची, वाहतुकीची योग्य व भरपूर साधने उपलब्ध झाल्यास जागतिक लाकूडपुरवठा सैबेरियाच्या जिवावर बराच काल तग धरू शकेल अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे.

सूचिपर्ण वृक्षाचे लाकूड ज्या कार्यासाठी उपयोगात आणले जाते, त्याच कार्यासाठी विषुववृत्तीय जंगलमय प्रदेशातील काही झाडांचे लाकूड उपयोगी पडणे शक्य

आहे. पण अशी झाडे विषुववृत्तीय जंगलमय प्रदेशातून हुडकून काढणे, ती तोडणे, व त्याचे लाकूड विषुववृत्तीय प्रदेशाच्या दलदलीतून बाहेर काढून ते कारखान्यात नेणे म्हणजे फारच मोठी यातायात असल्याने या भानगडीत सहसा कोणी पडत नाहीत. व त्यामुळे मऊ लाकूड पुरवण्याची सर्व जबाबदारी एका सूचिपर्ण वृक्षराजीवरच पडते. विषुववृत्तीय जंगलमय प्रदेशातील काही वृक्षजाती विशिष्ट गुणामुळे जगाच्या बाजारात महत्वाचे स्थान घेऊन बसल्या आहेत. मजबूत व दिखाऊ लाकडी वस्तूंसाठी सीडर मोहागनी या वृक्षाची कत्तल केली जाते. तर चंदन वृक्षाची कत्तल त्यापासून मिळणाऱ्या सुगंधी तेलामुळे होते.

झपाट्याने होणारा हा जंगलाचा नाश भावी लाकूड पुरवठ्यावरच परिणाम करणार आहे असे नसून, त्यापासून आणखीही कित्येक आपत्ती ओढवणार आहेत, ओढवल्या आहेत. जंगले नष्ट झाल्यामुळे पावसाने जमीन धुपून धुऊन जाते व उपयुक्त अशा जमिनीचा नाश होतो. हिमालयाच्या उतारावरील जंगलांची खच्ची केल्यामुळे पायथ्यालगतच्या शेतीचा नाश झाल्याचे आढळून आले आहे. पर्वत उतारावरून पडणारा पाऊस जंगलानी शोषिला अगर अडविला न गेल्यामुळे, पर्वत उतारावरील माती घेऊन लोंढ्याच्या रूपाने पायथ्याकडे घुसतो व तेथील सपाट प्रदेशावरील शेतीची नासधूस करतो. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदुस्थानात ब्रिटिशांची राजवट सुरू झाली. या राजवटीत उत्तर हिंदुस्थानातील सपाट प्रदेशाची तेथील समृध्द शेतीमुळे विशेष भरभराट झाली, व येथील लोकवस्तीही झपाट्याने वाढली. वाढत्या लोकवस्तीची लाकडाची गरज भागविण्यासाठी हिमालयाच्या उतारावरील बरीच जंगले तोडण्यात आली व तो प्रदेश उजाड करण्यात आला. उन्हाळ्यात व पावसाळ्यात या प्रदेशातून खाली येणाऱ्या पाण्याच्या प्रचंड लोंढ्याच्या मार्गातील अडथळा अशा रीतीने नाहीसा झाल्यामुळे पायथ्याशी असलेल्या हजारो चौरस मैल शेतीप्रदेशाचे नुकसान झाले. या प्रदेशातील खेडुतांची शेती बुडाली ! जंगलात गोळा करून मिळणारा लाकूडफाटा बंद झाला. गुरांना आवश्यक अशी चराऊ जमीन गेली, व अशा तऱ्हेने एका जंगलाच्या पायात हजारो शेतकरी कुटुंबे देशोधडीला लागली.

ऑस्ट्रेलियातील मरे नदीच्या काठीही हाच प्रकार घडला. या प्रदेशातील टेकड्यांवरून कठीण लाकडाच्या वृक्षांची अनेक जंगले होती. पुढे पुढे घुसणाऱ्या वसाहतवाल्यांनी ती तोडून त्यांचा धुव्वा उडविला; व त्यामुळे ऑस्ट्रेलियात अत्यंत सुपीक म्हणून गणला जाणारा मरे नदीच्या काठचा प्रदेश आता नापीक, उजाड व दरिद्री बनला आहे. अमेरिकेत अपालेशियन पर्वताच्या आसपास असलेली जंगले तोडून लोकांनी तंबाकू व कापूस यांच्या लागवडीसाठी शेते तयार केली. थोड्याच दिवसांनी शेते धुवून गेली. जंगलेही नाहीत व शेतेही नाहीत असा प्रकार झाला. चीनसारख्या दरिद्री व दुष्काळी मुलखात तर जंगलतोडीने हाहाकारच करून सोडला आहे. पायंगो नदीच्या आसपास असलेल्या पर्वत उतारावरील जंगले तोडून जमीनदारांनी लाकूड विकून पैसा केला. चीनमध्ये दळणवळणाची आधुनिक साधने विपुल नसल्यामुळे तोडलेले लाकूड खेचरावरून वाहून न्यावे लागे, व त्यामुळे जंगलतोडीचे व लाकूड वाहतुकीचे काम बरेच खर्चाचे व त्रासाचे होई. अर्थात लाकडाची किंमतही त्या प्रमाणात वाढे. जंगल तोडून होताच त्या जमिनीवर शेतकरी ओट अगर बटाटे यांचे पीक काढीत. पुढे एक दोन पावसाळे लोटताच जमीन धुपून जाऊन तिची नासाडी होण्यास सुरुवात होई. शेतकरी तत्काळ आपला मोर्चा नवीन तोडलेल्या जंगलाकडे वळवीत व तेथे लागवडीस आरंभ करीत. अशा तऱ्हेने होहँगहो नदीच्या खोऱ्यातील बहुतेक जंगले व शेती आता खलास झाली असून लाखो चिनी कुटुंबे आता देशोधडीस लागली आहेत.

जंगले नष्ट होण्यामुळे पर्जन्यमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे हे निराळेच ! हिंदुस्थानातील सह्यपर्वतावरील जंगले बऱ्याच मोठ्या प्रमाणात नष्ट करण्यात आल्याने पठाराच्या प्रदेशात दुष्काळाची आपत्ती सदैव आहे. धान्योत्पादन करणारी लाखो टन जमीन माती पर्वत उतारावरील झाडी तोडून टाकल्यामुळे वाहून जाते असा सर्व देशांचा अनुभव आहे. पावसाकडे डोळे लावून बसणारा शेतकरी पाऊस पडूनही यामुळे शेतीला मुकतो व दुष्काळाच्या आपत्तीत सापडतो. उघड्या पर्वत उतारावरून धाव घेणारे पाणी अडथळा न आल्यामुळे अधिकच गतिमान

होऊन पर्वतावरील मातीचा प्रचंड साठा नद्यांमध्ये नेऊन ओततात. नद्यांची पात्रे त्यामुळे उथळ होतात व पुराचे पाणी दूरवर पसरते व पाऊस पडूनही पिकांची नासधूस होते. जंगलांची ही नासधूस थांबविण्यासाठी सुप्रसिध्द अमेरिकन भूगोलशास्त्रज्ञ म्हणतो, 'सध्याची नफेबाज भांडवलदारांची निसर्गसंपत्तीवरील पकड ढिली झाल्याशिवाय तिचा नाश थांबणे शक्य नाही.'

अरण्याच्या बाबतीत जो प्रकार झाला तोच या अरण्याच्या आश्रयाने राहणाऱ्या प्राण्यांच्या बाबतीतही झाला. कित्येक प्राण्यांचे अस्तित्व आता कायमचे पुसले जाण्याचा प्रसंग आला आहे. सांबर, हरीण इत्यादी निरुपद्रवी जातीसुध्दा आता खलास होत आल्या आहेत. पक्षांचाही अपरिमित संहार झाला आहे. सर्वच प्राण्यांचा सविस्तर विचार स्थलसंकोचास्तव करणे शक्य नसल्याने मानवाच्या आर्थिक जीवनात महत्व प्राप्त झालेल्या काही पशुपक्षांचा विचार करण्यास हरकत नाही.

सूचिपर्ण वृक्षराजीने भरलेला दुय्यम ध्रुवप्रदेश केसाळ जातीच्या प्राण्यांनी एके काळी व्यापला होता. या केसाळ प्राण्यांची कातडी मऊ, ऊबदार व शोभिवंत असल्याने युरोपियन लोकांच्या नजरेत भरली. त्यासाठी आजपर्यंत सुमारे १०० वर्षे पाश्चात्य राष्ट्रे या प्राण्यांची शिकार करीत आहेत. या कातड्यांची पैदास व शोषण करण्यांत अमेरिकेचा पहिला नंबर आहे. त्यांच्या खालोखाल कॅनडा व रशिया हे देश येतात. युरोपियन स्त्री समाजाच्या कपड्यालत्यांत एके काळी या केसाळ कातड्यांना भलतेच प्राधान्य असल्याने केसाळ कातड्यांचा व्यापार हे एक बडे प्रस्थ होऊन बसले होते. गोऱ्या लोकांचा सूचिपर्ण जंगलात प्रवेश होण्यापूर्वी, एस्किमोज्, रेडइंडियन्स, लॅपलंडरस् अन्नासाठी व कपड्यांसाठी केसाळ प्राण्यांचा वध करीत; पण त्यांच्या गरजा व साधने मर्यादित असल्यामुळे या प्राण्यांची सर्रास कत्तल अशी उडत नसे. पुढे इंग्लिश व फ्रेंच व्यापाऱ्यांच्या नजरेत ही कातडी भरताच त्यांनी आधुनिक शिकारसाधनांची जोड देऊन पगारी शिकारी टोळ्या या प्रदेशात पाठविल्या. या शिकाऱ्यांनी ही जंगले तर धुवून काढलीच; पण शिवाय ध्रुवाकडील बर्फाळ प्रदेशातून वावरणारे पांढरे अस्वल, ओटर, वालरस, रेनडीयर असे प्राणीही झोडपून काढले. या प्रदेशातील बंदरांतून ठिकठिकाणी, या प्राण्यांच्या कातड्याची देवघेव करणारी केंद्रे उघडण्यात आली. येथील बर्फाळ समुद्रातून वावरणे सोपे जावे म्हणून स्वतंत्र तऱ्हेची जहाजे बांधण्यात आली. खुद्द येथील जंगलातून व बर्फाळ प्रदेशातून वावरणारे रेडइंडियनस्, एस्किमोज वगैरे लोक हाताशी धरण्यात येऊन व त्यांनी आणलेल्या कातड्यांना आधुनिक शिकार - साधनांच्या रूपाने मोबदला देऊन पाश्चात्य व्यापाऱ्यांनी शिकारीच्या धंद्याला भलतीच तेजी आणली. एका काळची ध्रुवप्रदेशाची नीरवता नष्ट झाली. पदोपदी बंदुकीचे आवाज उठू लागले. तशातच जंगलतोडीचा धंदा पुढे आला. प्राण्यांची आश्रयस्थाने भराभर उजाड होऊ लागली. शिकाऱ्यांची चांदरात झाली.  कॅनडा व अमेरिका येथील जंगलांतील प्राण्यांच्या केसाळ, मऊ कातड्यांनी युरोपच्या बाजारपेठा भरून गेल्या. उत्तर अमेरिकेच्या विभागातील बीव्हर, ओटर, लिंक्स, काळा अस्वल, केसाळ गवे, व एडके हे प्राणी आता संपूर्णपणे नाहीसे झाले आहेत. ते पाहावयाचेच झाल्यास आता एखाद्या प्राणी संग्रहालयाकडे अगर सरकाराने खास राखून ठेवलेल्या जंगल विभागाकडे जाणे भाग आहे. केसाळ प्राणी संपुष्टात आल्याने आता पाश्चात्य राष्ट्रांच्या बाजारपेठांतून केसाळ कातडी अदृष्य झाली आहे. नष्टप्राय करीत आणलेल्या केसाळ प्राण्यांची पैदास कृत्रिमरित्या करण्याची खटपट प्राणीशास्त्रविशारद करीत आहेत. परंतु जी प्राणीसंख्या निसर्गाने हजारो वर्षाच्या कालावधीने तयार केली ती मानव कृत्रिम साधनांनी परत आणू शकेल असे मुळीच वाटत नाही. फक्त ससापुरते मात्र मानवाला या कामी यश आले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. सशांची जोपासना व पैदास मानवी देखरेखीखाली मोठ्या प्रमाणात काही ठिकाणी चालू झाली आहे.

गवताळ प्रदेशात वावरणाऱ्या प्राण्यांवरही हाच प्रसंग ओढवला आहे. अमेरिकेत पुष्ट अशा हजारो रानरेड्यांचे कळप एके काळी वावरत असत. सतराव्या शतकाच्या आरंभालाच वसाहतवाल्यांनी एका वर्षात दहा लक्ष म्हणजे रोज सरासरी तीन हजार गवे मारल्याचा दाखला मिळतो. गव्यांची शिकार मुख्यत: कातड्यासाठी व त्यांच्या

जिभांसाठी करण्यात येते. मांसबाजारात गव्याच्या एका जिभेला सरासरी १।। ते २ रुपये किंमत येई. युरोपात उदयाला येऊ लागलेल्या कारखानदारीला चामड्याचीही अतिशय गरज असल्याने गव्याच्या चामड्यालाही चांगला भाव येई. १९०६ साली गवा संपूर्ण नष्ट होण्याची वेळ येताच अमेरिकन सरकारने शिकारीला बंदी केली व गव्याची मोजदाद केली. या मोजदादीत असे आढळून आले की, एके काळी लाखांनी वावरणाऱ्या या प्राण्यांची संख्या आता फक्त ५०० वर आली आहे. अमेरिकन सरकारने तत्काळ या प्राण्यांना संरक्षण देऊन त्यांना सरकारी राखीव कुरणात कोंडण्याची व्यवस्था केली. पुढे 'ग्रेट स्लेव्ह' सरोवराच्या आसपास वावरणारा गव्यांचा एक छोटासा कळप आढळून आला, त्यालाही संरक्षण देण्यात आले.

मांस व कातडी यांच्या पुरवठ्याच्या दृष्टीने गवा हा गायीपेक्षा अनेक दृष्टींनी सरस आहे. गवा मोठा व मजबूत असल्याने मांस अधिक देतो व त्याचे कातडेही जास्त टिकाऊ असते. त्याचे मांस पचनाला हलके व टिकाऊ असल्यामुळे खाण्यात गोमांसापेक्षा त्याला अधिक मागणी आहे. गव्याच्या केसापासून लोकरीप्रमाणे धागाही निघू शकतो. या अनेक कारणांमुळे गायीपेक्षा गव्याच्या संहाराकडे लोकांची अधिक प्रवृत्ती आहे. मांस पुरवठ्यामध्ये सांबर, हरिण इत्यादी प्राणी व कोंबडी, बदके इत्यादी पक्षी यांनीही बराच मोठा भाग उचलला आहे. डॉक्टर हार्डनी यांनी अमेरिकेतील या पशूपक्षांच्या कत्तलीला उद्देशून लिहिताना म्हटले आहे की, ' मनुष्याला उपयुक्त अशा पशूपक्षांपैकी शेकडा ९५ पशूपक्षी अमेरिकेने आताच मारून ठेविले आहेत.'

विषुववृत्तीय प्रदेशात वावरणाऱ्या प्राण्यांत हत्तीइतका मार कोणीच खाल्ला नसेल ! निवळ हस्तिदंतासाठी म्हणून युरोपियन लोकांनी हत्तीची कत्तल केली आहे. युरोपियन व अमेरिकन व्यापारी एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर प्रथम येऊन उतरले. या वेळी हस्तिदंताचा व्यापार अरब लोकांच्या हाती होता. आफ्रिकेच्या उत्तर भागातून हस्तिदंत घेऊन हे अरब व्यापारी किनाऱ्यावर येत व युरोपियन व्यापारी रंगीबेरंगी मणी, कापडाचा तुकडा अगर अत्तराची एकादी कुपी देऊन त्याचे हस्तिदंत लाटीत. एवढ्या अल्पमोलात खरेदी केलेल्या हस्तिदंतास युरोपियन बाजारपेठेत सहज २० ते २५ पौंड किंमत येई. अरब व्यापाऱ्यांना आपल्या वस्तूच्या मौल्यवानपणाची फारशी कल्पना नसल्याने हा सौदा ते खुशीने करीत. हत्तीसारखा प्रचंड प्राणी तेवढ्यासाठी ठार मारण्याची त्यांना बुध्दी नसे. तशी जबरदस्त साधनेही पण त्यांच्यापाशी नसत; पण युरोपियन व्यापाऱ्यांची भूक अशी थांबणे शक्य नव्हते. त्यांनी अरबांना रायफली पुरविण्यास सुरुवात केली व हस्तिदंताला देण्यात येणारा मोबदलाही वाढविला. अरब प्रथम जे हस्तिदंत आणीत ते त्यांनी आफ्रिकेतील मूळच्या रानटी लोकांकडे संपादन केलेले असे. हे रानटी लोक स्वाभाविकरित्या मेलेल्या हत्तींची हाडे संग्रह करून ठेवीत व क्वचित प्रसंगी शिकारही करीत. अरब या रानटी लोकांना फसवून हस्तिदंत लाटीत तर युरोपियन व्यापारी अरबांना बनवीत. अरबांच्या हाती रायफलीसारखे प्रभावी साधन येताच त्यांनी रानटी लोकांनी जमा करून ठेविलेल्या हस्तिदंतावर राजरोस धाड घातली. त्यांना वेठीला धरून त्यांच्या डोक्यावर हस्तिदंत लादले व ते किनाऱ्यावर आणून युरोपियन व्यापाऱ्यांच्या हवाली केले. थोडयाच काळात शिरावर हस्तिदंत घेऊन झांझीबारकडे येणारे काळ्या गुलामांचे कळपच्या कळप दिसू लागले. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी हस्तिदंताचा व्यापार कळसाला पोहोचला. एका वर्षात सरासरी दीड लाख गुलाम हस्तिदंत वाहून नेण्याच्या कामी वेठीला धरले जात. त्यांपैकी सुमारे निम्मे किनाऱ्यापर्यंत पोचत व बाकीचे वाटेतील कष्टांनी व मारहाणीने मरून पडत.

हस्तिदंताच्या व्यापाराची चलती दृष्टोत्पत्तीला येताच हस्तिदंताचा व्यापार करणाऱ्या मोठमोठ्या मंडळ्या अस्तित्वात येऊ लागल्या. थोड्याच दिवसांत अरबाना या व्यापारातून गचांडी मिळाली. आधुनिक शिकार साधनांनी सुसज्ज अशा युरोपियन शिकाऱ्यांच्या टोळ्या आफ्रिकेत उतरू लागल्या. लिंगभेद, वय या साऱ्या गोष्टी बाजूस सारून त्यांनी सरसकट हत्तीचे कळप झोडपून काढण्यास सुरुवात केली. विसाव्या शतकाच्या आरंभीच्या ३० वर्षांतच आफ्रिकेतील हत्ती नष्टप्राय झाला. ज्यांचे दात

अजून बाहेरही पडले नाहीत असे कोवळे बच्चेही या शिकाऱ्यांच्या तावडीतून सुटले नाहीत. हस्तिदंताचा व्यापार प्रथम सुरू झाला त्यावेळी बाजारात येणाऱ्या हत्तीच्या दातांचे सरासरी वजन ८० ते ९० पौंड भरत असे. १९३० साली हे सरासरी वजन ५० पौंडावर आले. सध्या बेल्जम कांगो व युगांडा या दोन विभागांतील हत्तींची कत्तल चालू आहे. शिकाऱ्यांच्या भयाने हत्ती आता खोल जंगलाच्या अंतर्भागात शिरले आहेत. पण तेथील हवा त्यांना न मानवल्यामुळे त्यांची मृत्यूसंख्या झपाट्याने वाढत आहे. इतके खोल शिरूनही शिकारी त्यांचा पिच्छा पुरवीत आहेत ते निराळेच ! थोड्याच दिवसांत प्राचीन मेमॉथप्रमाणे हत्ती हाही पुस्तकांतील एक प्राणी होऊन बसणार आहे.

पक्षांमध्ये शहामृगाची हकीकत लक्षात ठेवण्याजोगी आहे. युरोपियन लोकांच्या सौदर्य प्रसाधनांत त्यांच्या पिसांचा उपयोग होत असल्याने आफ्रिकेच्या गवताळ प्रदेशात आढळणाऱ्या या पक्षाचाही वरीलप्रमाणेच संहार करण्यात आला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यालाच उत्तर आफ्रिकेत शहामृग पक्षी औषधालाही मिळेनासा झाला. शहामृगाप्रमाणेच करकोचे, फ्लेमिंगोज नावाचे तांबडे पक्षी, इग्रट, स्पूनबिल यांसारखे सुंदर पिसाऱ्याचे पक्षी लाखांनी ठार मारण्यात आले. युरोप अमेरिकेतील व्यापारी या पक्षांच्या पिसापासून तयार करण्यात आलेली सौंदर्यसाधने आपापल्या गिऱ्हाइकांना पुरवीत. पण याचा परिणाम असा झाला आहे की, आता हे पक्षी फक्त प्राणी-संग्रहालयात पाहावयास मिळतात. माणसाने आपण चालविलेल्या संहाराचे क्षेत्र जमिनीपुरतेच मर्यादित ठेविले आहे असे नाही. ध्रुवप्रदेशाकडील जमीन व समुद्र यांच्या आश्रयाने राहणारा सीलसारखा केसाळ प्राणीही त्याने खलास केला आहे. उत्तर ध्रुव प्रदेशाकडील सील संपुष्टात येताच, सीलची शिकार करणाऱ्या बोटींचे तोंड दक्षिण ध्रुवाकडे वळले. इंग्लंड, अमेरिका, जपान व रशिया या चार राष्ट्रांनी मिळून दक्षिण ध्रुवाकडील सीलही आता नाहीसा करून टाकला आहे. फॉकलंड बेट व ग्रीनलंडचा पूर्व किनारा या प्रदेशातील सीलवर नॉर्वेजियन खलाशांनी धाड घातली. या प्रकारामुळे नुसत्या सीलचाच नाश झाला असे नव्हे तर अन्नासाठी सीलवर विसंबून राहणाऱ्या तद्देशीय लोकांचाही नाश झाला ! सीलची सर्वांत मोठी वस्ती अलास्काला लागून असलेल्या अमेरिकेच्या ताब्यात असलेल्या 'प्रिबिलॉफ्' बेटाच्या आसपास होती. १९११ च्या सुमारास या बेटाच्या आसपास वावरणाऱ्या सील माशांची संख्या दरसाल सुमारे ३० लाखावर असे. पुढे एकाच वर्षात ती १.०५ लाखांवर आली. म्हणजे अंदाजे २९ लाख सील एका वर्षात मारले गेले. शेवटी अमेरिकन सरकारने सीलच्या शिकारीवर नियंत्रण घालण्याचे ठरवून त्यासाठी इतर राष्ट्रांना पाचारण केले, व त्यांनीही या कामी सहकार्य केले.

जगातील सीलच्या कातड्याच्या व्यापाराचा ७० टक्के भाग एकट्या अमेरिकेच्या हाती आहे. समुद्रातील दुसरा उपयुक्त व प्रचंड प्राणी म्हणजे देव मासा होय ! देव माशाची शिकार प्रथम सर्वस्वी एस्किमो लोकांच्या हाती होती. हारपून नावाने ओळखल्या जाणाऱ्या भाल्याची हाताने फेक करून व लहान लहान होड्यांतून त्याचा पाठलाग करून एस्किमो देव माशाची शिकार करीत. या प्रकाराने होणारी देव माशाची हत्या फारच मर्यादित स्वरूपाची असून तिचा फारसा गंभीर परिणाम या जातीवर होत नसे. यानंतर युरोपियन राष्ट्रांच्या डोळ्यात हा मासा भरला. चरबी व मांस याचा मूर्तिमंत साठा देव माशाच्या ठिकाणी असल्याने युरोपियन व्यापाऱ्यांच्या हातून तो सुटणे शक्य नव्हते. देव माशावर डागण्यासाठी 'हारपून गन्स' नावाच्या स्वतंत्र तोफा बनविण्यात आल्या व त्या वाफेने चालणाऱ्या गतिमान बोटींवर चढवून देण्यात आल्या. देवमाशांचे मांस व चरबी काढून घेऊन त्याच्या धुडाची संपूर्ण वासलात लावण्याची सर्व यंत्रसामग्री या बोटींवर बसविण्यात आली. अशा तऱ्हेने सुसज्ज असलेल्या या २०-२० हजार टनी बोटींसह देवमाशाच्या शिकारीसाठी उत्तर व दक्षिण ध्रुव प्रदेशाकडे युरोपियनांचा स्वैरसंचार चालू झाला. ब्रिटिश व नॉर्वेजियन खलाशी या कामी आघाडीवर होते. त्यांनी उत्तर ध्रुवाकडील देवमासा नष्ट करून दक्षिण ध्रुवाकडे आपला मोर्चा वळविला. दरसाल सरसकट २० हजार देव माशांची शिकार ते करीत असत. थोड्याच काळात दक्षिण ध्रुवाकडील देव मासाही नष्ट होत आला व मग या राष्ट्रांना नियंत्रणाची सुबुध्दी होऊ लागली. पण नुकतेच या धंद्यात

शिरलेले जपान हे राष्ट्र या गोष्टीस संमती देईना. यथास्थित लूटमार करून झाल्यानंतर युरोपियनांनी आता हा सोवळ्याचा आव आणला आहे, असे जपान्यांचे म्हणणे पडले. जपान नाही म्हटल्यानंतर स्वाभाविकच नियंत्रणाची भाषा मागे पडली व अधिकच उत्साहाने देवमाशाच्या शिकारीला प्रारंभ झाला. त्यामुळे देवमाशांची मृत्यूसंख्या चौपटीने वाढली. एका वर्षात युरोपियन राष्ट्रांनी देव माशाच्या चरबीचे उत्पादन २५ हजार टनांपर्यंत नेले. देव मासा समुद्रातून संपूर्ण नष्ट होण्यास फारसा अवधी नाही ही गोष्ट निर्विवाद होऊन बसली आहे.

समुद्र हा मानवाला अन्न पुरवठा करण्याच्या कामी जमिनीइतकाच उपयुक्त आहे. सामान्य अन्नाच्या बरोबरीने मासाही मानवाच्या खाण्यात असल्याने शेतीइतकाच मासेमारीचा धंदाही उपयुक्त व धनोत्पादक होऊन बसला आहे. दरसाल कोट्यवधी टन वजनाचे मासे समुद्रातून वर काढले जातात. उत्तर गोलार्धातील उथळ समुद्र या कामी विशेषत: उपयोगी ठरले आहेत. या गोलार्धात सापडणाऱ्या माशांपैकी कॉड व हेरींग या दोन जाती प्रमुख असून व्यापारात त्यांनी अग्रस्थान संपादन केले आहे. हे मासे विपुल असून अत्यंत उपयुक्त आहेत. उत्तर समुद्र, जपानच्या उत्तर भागच्या आसपासचा समुद्र व न्यू फाऊंडलंड हे तीन प्रदेश माशांच्या कत्तलीबद्दल विशेष प्रसिध्द आहेत. या माशापासून मिळणारे तेल मानवी शरीराला पोषक असल्याने अन्न व औषधी या दोनही दृष्टींनी ते उपयुक्त आहे. वर नमूद केलेल्या प्रदेशांच्या किनाऱ्याने या मृत माशांचे पर्वतप्राय ढीग दृष्टोत्पत्तीला येतात. याखेरीज रोजच्या खाण्यासाठी म्हणून माशांच्या अनेक जातींचा संहार होत आहे तो निराळाच! समुद्रात होणारी माशांची निर्मिती व माणसाकडून होणारा त्यांचा संहार याचा मेळ बसेनासा झाल्यामुळे अलीकडे पॅसिफिक महासागरातील बऱ्याच मच्छीमाऱ्यांना माशांची तीव्र उणीव भासू लागली आहे. एके काळी रशियाच्या, मध्यंतरी जपानच्या व फिरून आता रशियाच्या वर्चस्वाखाली असलेल्या जगप्रसिध्द कामश्चाटकाच्या मच्छीमारीलाही माशांची उणीव आता जाणवू लागली आहे. ब्रिटिश औद्योगिक क्षेत्रात प्राधान्य पावलेले ल्फेक व हेक या दोन जातींचे मासेही आता नाहीसे होत आले आहेत. जे थोडे फार सापडतात ते पूर्वीच्या मानाने फारच लहान असतात.

उत्तर गोलार्धातील थंड समुद्रविभाग मच्छीमारीबद्दल प्रसिध्द आहे. दक्षिण ध्रुवाकडील प्रदेशात या धंद्याचा जम अद्यापि नीटसा बसलेला नाही. उथळ समुद्र या धंद्याला विशेष उपयुक्त ठरतो. उत्तर अटलांटिकमध्ये हेरिंग जातीचा मासा विपुल सापडतो. उत्तर समुद्र व इंग्लिश खाडी यात कॉड व हेरिंग या दोन जाती सापडतात. नॉर्वे व आइसलंडचा किनारा या प्रदेशातही या दोन्ही जाती मोठ्या प्रमाणात मिळतात. उत्तर अमेरिकेत सालोमन व इतर नद्यांच्या मुखांत सालोमन मासा सापडतो. सालोमन माशाबद्दल बोलताना एक जण म्हणतो, 'They catch all they can and can all they catch.' हा मासा हवाबंद डब्यात भरून बाजारात रवाना होतो. या धंद्याला उद्देशूनच अर्थात हे म्हणण्यात आले आहे.

इंग्लंडमधील हजारो लोक निव्वळ मासेमारीवर उपजीविका करतात ! मासा निव्वळ खाण्यासच उपयोगी पडतो असे नाही. त्याच्यापासून उत्तम तऱ्हेचे खत तयार होते. 'फिडा मिल' या नावाने ओळखला जाणारा व माशापासून तयार होणारा पदार्थ गुरे, डुकरे, कोंबडी यांना चांगला मानवतो. माशाच्या हाडापासून गोंद तयार होतो.

कॉड मासा अत्यंत महत्वाचा आहे. याचा कोणताही भाग फुकट म्हणून जात नाही. या माशापासूनच 'कॉड लिव्हर ऑईल' हा उपयुक्त पदार्थ निघतो. युरोपात मासेमारीच्या धंद्यात इंग्लंड आघाडीवर आहे. त्याच्या खालोखाल नॉर्वे व फ्रान्स यांचा अनुक्रम येतो. अटलांटिकच्या दुसऱ्या किनाऱ्यावर कॅनडा, न्यूफाऊंडलंड व अमेरिका हे देश हा धंदा करतात. पॅसिफिकमध्ये जपान हे राष्ट्र या धंद्यात पुढारलेले आहे.

पॅसिफिक महासागराच्या अलस्का ते दक्षिण अमेरिकेपर्यंतच्या किनाऱ्यावर वस्ती फारशी दाट नसल्यामुळे तेथे असलेला माशांचा पुरवठा तेथील लोकवस्तीला पुरून उरेल इतपत मोठा होता. या भागातील सालोमन मासे सापडतात व ते चवीलाही चांगले असतात. अर्थात अशा माशांचा आस्वाद जगातील मांसाहारी लोकांना घेऊ देणे आपले कर्तव्य आहे याची जाणीव

अमेरिकन व्यापाऱ्यांना झाल्यामुळे त्यांनी या किनाऱ्यावर ठिकठिकाणी मासे हवाबंद डब्यात भरून देशोदेशी पाठविण्यासाठी केंद्रे उघडली. लाखो जाळी नद्यांच्या मुखांतून लावण्यात येऊन एक दोन वर्षांत सालोमन माशांची इतकी कत्तल उडविण्यात आली की सांगता सोय नाही. पाचच वर्षांत सालोमन माशांच्या हत्येचे प्रमाण एकदम ९० टक्क्यांनी खाली आले. ठिकठिकाणी उडण्यात आलेली ही केंद्रे बंद करण्यावाचून गत्यंतरच राहिले नाही. शंभराच्या ठिकाणी दहा मासे मिळण्याची मारामार पडू लागली. इतके असूनही मासे पकडण्याबाबत कोणतेही नियंत्रण स्वीकारण्याची मासे मारणाऱ्या लोकांची मनीषा नाही हे विशेष आहे. या धंद्यात मिळणारा नफा भूतदयेच्या नावाखाली सुखासुखी बुडविण्यास ते तयार नाहीत. न्यूयॉर्कच्या उत्तरेला समुद्रास मिळणाऱ्या सव्वीस नद्या एके काळी सालोमन माशांनी भरलेल्या होत्या. आता त्यापैकी एकाही नदीत सालोमन मासा औषधालासुध्दा मिळेनासा झाला आहे.

●●●

५

पृथ्वीपासून मिळणाऱ्या अनेकविध वस्तूंपैकी आतापर्यंत ज्या वस्तूंचा आपण विचार केला त्या सर्व अशाच स्वरूपाच्या आहेत की, त्यांच्या शोषणाप्रमाणेच उत्पादनावरही माणसाला थोडेफार नियंत्रण मिळविता येते. वनस्पती व प्राणी यांची वाढ कमी अधिक करू म्हटले तर मानवाला ही गोष्ट शक्य आहे. पण खनिज पदार्थासारख्या काही गोष्टी अशा आहेत की, पृथ्वीजवळील त्यांचा साठा मानवी उपयोगांनी संपुष्टात येताच फिरून ही खनिजे निर्माण होणे शक्य नसल्याने त्या खनिजांच्या गरजा मानवाला पुढे भागविताही येणार नाहीत. खनिजे पृथ्वीच्या पोटात खोलवर गाडली गेलेली असतात. तेथून ती महत्प्रयासाने उकरून काढून मानवाच्या अर्थव्यवहारात व इतर जीवनात उपयोगात आणली जातात. उद्‌भिज्जाप्रमाणे अगर प्राण्याप्रमाणे प्रदेश-वैशिष्ट्यानुरूप खनिजे सापडतात असे नाही; तर बहुतेक सर्व देशांमध्ये निरनिराळे खनिज पदार्थ कमी अधिक प्रमाणात आढळून येतात. या खनिज पदार्थांमध्ये चालू काळी लोखंड, दगडी कोळसा व पेट्रोलियम यांना प्राधान्य आहे. आधुनिक कारखानदारीच्या देशांतील हे प्राण आहेत. चालू भांडवलशाहीचा आत्मा या तीन पदार्थांचा बनलेला आहे. या तीन पदार्थांच्या अभावी यंत्रे निर्जीव होऊन पडणार आहेत. याखेरीच इतर अनेक धातू, रासायनिक मिश्रणे व खाण्याच्या मिठासारखे साधे पदार्थही खाणीतून निघू शकतात. परंतु काही विशिष्ट खनिजांचाच आपणास येथे विचार करावयाचा आहे. खनिज पदार्थांचा विचार करताना दगडी कोळशाला प्राधान्य देणे भाग आहे. यांत्रिक शक्तीच्या निर्मितीला, त्याचप्रमाणे घरगुती उपयोगाला कोळसा हा अत्यंत उपयुक्त आहे. वीज व पेट्रोलियम यांचा कारखानदारीत उपयोग होऊ लागला असूनही कोळशाने आपले महत्व अद्यापि शाबूत ठेवले आहे. बाष्प शक्तीवर चालणारी यंत्रे जोपर्यंत अस्तित्वात होती अगर आहेत, तोपर्यंत कोळशाचा साठा ही बाब महत्वाची समजली जाणारच. ज्या ज्या देशांच्या हाती हा बहुमोल खनिज पदार्थ आहे ते ते देश आपापसात स्पर्धा करून स्वत:च्या कारखानदारीचे बस्तान बसविण्यासाठी धडपडत आहेत. एके काळी ज्या देशाच्या हाती कोळसा नाही अशा देशांना कारखानदारी उभारणे अशक्य होई. कारण कोळसा असणारी राष्ट्रे आपल्या कारखानदारीला प्रतिस्पर्धा निर्माण होऊ नये म्हणून दुसऱ्या देशांना कोळसा देण्याचे नाकारीत. कोळसेवाल्यांच्या या अरेरावीमधूनच तेल व विद्युत ह्या दोन शक्तिसाधनांचा उदय होऊन कोळसा नसलेली राष्ट्रे आपली कारखानदारी विद्युत व तेल यांच्या शक्तीवर उभारू लागली. बाष्पशक्तीवर चालणारी कारखानदारी १८व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रथमत: इंग्लंडमध्ये अस्तित्वात

आली. इंग्लंडमध्ये दगडी कोळशाचा साठा भरपूर असल्याने, इंग्लिश कारखाने एक प्रकारे स्वयंपूर्ण होते. आपल्या कारखान्यांची संपूर्ण गरज भागल्यानंतर उरलेल्या कोळशाची निर्यात इंग्लंड इतर राष्ट्रांना करीत असे व त्यामुळे स्वाभाविकच इंग्लंडची कारखानदारी काही काळपर्यंत आघाडीवर होती. यानंतर जर्मन व अमेरिका या दोन देशांमध्ये लोखंड व दगडी कोळसा यांच्या खाणी उपलब्ध झाल्या व इंग्लंडची मिरासदारी धोक्यात आली. या दोन्ही राष्ट्रांचे उत्पादन इंग्लंडपेक्षाही सरस असल्याने इंग्लंडला या दोन राष्ट्रांची स्पर्धा चांगलीच जाणवली व पुढे कित्येक वर्षांनी या स्पर्धेचे रूपांतर महायुध्दात होऊन जर्मन कारखानदारीवर इंग्लिश कारखानदारीने विजय मिळविला. पण हा विजय इंग्लंडला फारसा स्वस्तात पडला नाही. कारण या काळामध्ये इतर लहान लहान राष्ट्रांची कारखानदारी तर उदयाला आलीच, पण अमेरिकन कारखानदारीने जगड्व्याळ स्वरूप धारण केले. पूर्वीचे जे देश इंग्लंडकडून कोळसा घेत त्यांनी स्वत:च्या कोळशाच्या खाणी तर उपलब्ध केल्याच; पण शिवाय इंग्लिश कोळशाला आपल्या देशात वाव मिळू नये म्हणून इंग्लिश कोळशाच्या आयातीवर जबरदस्त कर बसविले. या भानगडीत इंग्लंड व जर्मनी या दोन्ही देशांचाही वाढीला लागलेल्या कोळशाचा व्यापार बसला. बेल्जम, फ्रान्स, इटली, हंगेरिया या सर्व देशांनी कोळशाचे उत्पादन वाढवून इंग्लंड व जर्मनी या दोघांचाही कोळसा बहिष्कृत केला. दक्षिण युरोप आणि फ्रान्स येथील कोळशाच्या पेठा काबीज करण्यासाठी इंग्लंड व जर्मनी या दोन राष्ट्रांची रात्रंदिवस चुरस चालू होती. गेल्या महायुध्दानंतर जर्मनीच्या ताब्यातील कोळशाच्या खाणीचा प्रदेश शक्य तितका कमी करून इंग्लिश कोळसेवाल्यांनी आपला सूड उगवून घेतला व जर्मनीला इंग्लंडमध्ये कोळसा खरेदी करण्याची पाळी आणली. पुढे जर्मनीने स्वत:च्या ताब्यात राहिलेल्या प्रदेशाचे उत्पादन वाढवून इंग्लिश कोळशाच्या गुलामगिरीतून स्वत:ची मुक्तता करून घेतली. इंग्लंडने आपला कोळसा खपविण्यासाठी अनेक युक्त्या प्रयुक्त्या योजिल्या आहेत. नॉर्वे, स्वीडन यासारख्या देशांना वस्तुत: इंग्लिश कोळसा खरेदी करण्याची जरूरी नाही. पण ब्रिटिश साम्राज्यात या देशांना व्यापार करण्याची सवलत देण्यासाठी म्हणून इंग्लंड दरसाल ठराविक प्रमाणात या देशांच्या गळ्यात आपला कोळसा बांधीत असते. कोळशाची निर्यात करणारे आणखी काही देश आपापल्या अधिकारक्षेत्रात या स्वरूपाच्या सवलती देण्याच्या अटीवर काही देशांच्या गळ्यात कोळसा बांधीत असतात. कोळशाच्या बाजारात चाललेली ही स्पर्धा व कारखानदारीवरील कोळशाचे नाहीसे होत असलेले वर्चस्व यांनी कोळशाची निर्यात करणाऱ्या देशांना बरेचसे नुकसानीत आणले आहे. कोळशाच्या धंद्याचे हे बिघडलेले बस्तान सावरून धरण्यासाठी कामाचे तास वाढविणे, मजुरांची मजुरी कमी करणे असल्या गोष्टींचा ब्रिटिश व जर्मन भांडवलदार आश्रय करू लागले. परंतु या धंद्याचे बिघडलेले बस्तान कोणत्याही तऱ्हेने सावरण्याचे चिन्ह दिसेना. विद्युत व तेल यांनी कोळशाची जागा पटकावल्यामुळे कोळशाच्या राशीवर धनोत्पादन करणारी इंग्लंडसारखी राष्ट्रे नुकसानीत आली. तशात राष्ट्रीय आर्थिक स्वयंपूर्णता, स्पर्धा, उत्पादनातील अनिर्बंधपणा यांमुळे कोळशाच्या धंद्याला भलतीच अवकळा प्राप्त झाली. एके काळी इंग्लंडमध्ये कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या मजुरांची संख्या ११ लाख होती. ती ४.२ लाखांवर आली. अमेरिकेतील कोळशाच्या खाणीत कामावर असलेले ७.५ लाख लोक बेकार झाले व कामावर असलेल्या मजुरांच्या चवथा हिस्सा मजूर जादा म्हणून समजण्यात येऊ लागले. याशिवाय वर्षाच्या ३६५ दिवसांपैकी फक्त २०० दिवसच खाणी चालू राहतात ते निराळेच. इंग्लंडमधील कोळशाच्या धंद्याची स्थिती याहूनही चमत्कारिक झाली. सध्या खाणी असलेला प्रदेश पूर्वी जमिनी या सदरात, जमीनदारीच्या खाजगी मालकीचा होता. कोळसा त्यांच्या जमिनीत सापडल्यामुळे खाणवाल्यांना जमिनीच्या स्वामित्वाबद्दल म्हणून या लोकांना सुमारे ४० लक्ष पौंड द्यावे लागतात. कोळशाला तेजी अगर असो वा नसो हे पैसे भरावेच लागतात. ही जमिनदारांना मिळणारी रक्कम अनेक जमिनदारांत विभागली जात असून त्यांच्या स्वामित्वाखाली असलेल्या जमिनींमधील खाणीतून निघणाऱ्या कोळशाच्या प्रमाणात ती दिली जाते. या खाणीच्या आसपास ठिकठिकाणी हद्दी दाखविण्यासाठी बंधारे घातलेले असतात.

खाणीच्या लांबीरुंदीवर अशा तऱ्हेने बंधन आल्याने स्वाभाविकच त्यांची खोली वाढते व त्या प्रमाणात मजुरांचेही हाल वाढतात. १९२५ साली नेमण्यात आलेल्या कोळसा चौकशी समितीने आपल्या निवेदनात म्हटले, 'सध्याच्या कोळशाच्या खाणीच्या उत्पादकांत व मालकांत भिन्नत्व असल्याने खाणी चालविण्याच्या पध्दतीत अनेक दोष निर्माण झाले आहेत. त्यामुळे या धंद्याची व या धंद्यात काम करणाऱ्या मजुरांची कुचंबणा होत आहे.' अमेरिकेतही या धंद्याची हीच स्थिती आहे. कोळशाच्या खाणीच्या मालकीसंबंधाने अनेक भानगडी असल्याने धंद्याला एकसूत्रीपणा नाही. काही जमिनीची मालकी स्वत: कंपन्यांकडे आहे. तर काही खाजगी मालकीच्या आहेत. 'युनायटेड स्टेट स्टील कारपोरेशन' या नावाने ओळखली जाणारी कंपनी व तिच्या शाखोपशाखा यांच्या मालकीच्या कित्येक खाणी अमेरिकेच्या निरनिराळ्या संस्थानांतून आहेत. कोळशाच्या उत्पन्नाबाबत जी गुंतागुंत आहे तीच कोळशाच्या व्यापारातही आहे. कोळसा खाणीतून बाहेर पडल्यापासून गिऱ्हाइकाच्या हातात पडेपर्यंत अनेक मध्यस्थांच्या हातांतून जातो व त्यामुळे खाणीतून बाहेर पडलेल्या कोळशाची किंमत व खुद्द गिऱ्हाइकाला द्यावी लागणारी किंमत यात जमीन-अस्मानाचे अंतर पडते. कोळशाच्या उत्पादनामुळे भूपृष्ठावर झालेला परिणाम विशेष लक्षात ठेवण्याजोगा आहे. कोळसा, लोखंड व पोलाद या त्रयीचे परस्पर संबंध व त्याचे परस्पर पूरक उत्पादन यांमुळे भूपृष्ठाचा केवढा तरी मोठा भाग कायमचा नासधूस होऊन गेला आहे. इंग्लंडमध्ये काळा प्रदेश या नावाने ओळखला जाणारा प्रदेश व जर्मनीचा 'ऱ्हूर' प्रांत ही अशा रीतीने उजाड झालेल्या प्रदेशांची दोन उत्तम उदाहरणे आहेत. कोळशाचे ठिकठिकाणी पडलेले ढिगारे, खाणींतून निघालेली इतर घाणसाण यांचे ढिगारे, त्यांतून विखुरलेल्या कामगारांच्या झोपड्या व अधूनमधून दिसणारे रेल्वेचे फाटे असे या प्रदेशांचे भकास स्वरूप असते. या प्रदेशांचे दारिद्र्य व दीनावस्था ही आता अनेक पुस्तकांचे प्रतिपाद्य विषय होऊन बसली आहेत. इंग्लंडमधील यार्कशॉयर अगर स्कॉट्लंडमधील खाणीचा प्रदेश इंग्लंडमधील घाणीची व दारिद्र्याची मूर्तिमंत ठिकाणे आहेत. अमेरिकेतील कोळशांच्या खाणीचा प्रदेश इंग्लंडपेक्षाही निष्कृष्ठावस्थेत आहे. या प्रदेशातील कामगारांना मिळणाऱ्या झोपड्या तर पत्रे अगर फळ्या बडवूनच केलेल्या असतात. कोळसा चौकशी समितीने आपल्या निवेदनात म्हटले, 'कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या मजुरांची वस्ती असलेली ७०० खेडी आम्ही तपासली. त्यांपैकी फक्त दोनच खेड्यांत पाणी पुरवठा व आरोग्य यांची समाधानकारक योजना आढळली. पण बाकीच्या बहुतेक खेड्यांतील दु:स्थिती शब्दाने वर्णन करणेही शक्य नाही. छपरे उडालेली, भिंतीची पडझड झालेली, उकिरड्याचे ढीग व दुर्गंधी या सर्व गोष्टी प्रत्येक ठिकाणी भरपूर पाहावयास मिळाल्या.' मजुरांना देण्यात आलेली ही मोडकी तोडकी घरे, खाणी चालविणाऱ्या भांडवलदारांच्या मालकीची असतात. त्याचप्रमाणे या खेड्यांतील सर्व दुकानेही खाणीवाल्यांचीच असल्याने मजुरांना मजुरीच्या रूपाने दिलेला पैसा घरभाड्याच्या रूपाने व व्यापारातील नफ्याच्या रूपाने खाणीवाले परत खेचीत असतात.

सध्या जगातील कोळशापैकी ७५ टक्के कोळसा इंग्लंड, जर्मनी, अमेरिका व रशिया या फक्त चार राष्ट्रांमधूनच निर्माण होतो. फ्रान्स व जपान ही कारखानदारीत पुढारलेली असूनही त्यांचे कोळशाचे उत्पादन समाधानकारक नसल्याने औद्योगिक क्षेत्रात त्यांची चांगलीच कुचंबणा होत असे. कोळशाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर खरा ताबा आतापर्यंत इंग्लंडच ठेवून होते. भूमध्य समुद्रालगतच्या सर्व राष्ट्रांना कोळशाचा पुरवठा करण्याचे काम इंग्लंड करी. युध्दकालात नाहीशी झालेली ही पेठ काबीज करण्याची धडपड इंग्लंडने फिरून चालू केली आहे. जपानने कोळशासाठीच मांचूरियावर प्रथम धाड घातली. पण जपानी लोकांवर आता अमेरिकेचे दास्य पत्करण्याची पाळी आली आहे. जपानची यंत्रसामग्री आणि मजूरी व अमेरिकेचा कच्चा माल आणि व्यवस्था अशा स्वरूपात जपानी कारखानदारी यापुढे काम करणारसे दिसू लागले.

कोळशाचे जागतिक उत्पादन पुढीलप्रमाणे आहे.( सर्व आकडेवारी युध्दपूर्वकालीन आहे.)

| देश | टन |
|---|---|
| अमेरिका | ३८ कोटी |
| इंग्लंड | २३ कोटी |
| जर्मनी | १५ कोटी |
| रशिया | १० कोटी |
| फ्रान्स | ४।। कोटी |
| जपान | ३ कोटी |
| पोलंड | ३ कोटी |
| बेल्जम | २।। कोटी |
| हिंदुस्थान | २४२ कोटी |

याखेरीज उतरत्या भांजणीने कोळशाचे उत्पादन करणारे अनेक देश आहेत. पण त्यांचा निर्देष करण्याची फारशी आवश्यकता नाही.

यांत्रिक शक्तीच्या उत्पादनातील कोळशाचे महत्व कमी करून ती जागा अलीकडे खनिज तेलांनी घेतली आहे. मोटारी, विमाने यांना शक्तीचा पुरवठा खनिज तेलापासून निघणाऱ्या पेट्रोल नावाच्या शुध्द द्रव्यापासून केला जातो. पण त्याचबरोबर अशुध्द स्वरूपातील तेलही आधुनिक कारखानदारीची चक्रे फिरवण्यास उपयुक्त ठरली आहेत. यंत्रांना लागणारे वंगण, दिव्यांत जाळले जाणारे रॉकेल इत्यादी अनेक पदार्थही या खनिज तेलापासून मिळतात. मूळ स्वरूपात खनिज तेल पेट्रोलियम् या नावाने ओळखले जाते. भूगर्भात असलेल्या खडकांमधून या तेलाचे झरे आढळतात. जगातील अनेक प्रदेशांत ते सापडते. सध्या खनिज तेलाच्या उत्पादनात अमेरिका अग्रगण्य असून , जागतिक उत्पादनाचा दोन तृतीयांश भाग एकट्या अमेरिकेने उचलला आहे. प्रथम १८५९ साली, अपॅलेशियन पर्वताच्या प्रांतात गिरमिटाच्या साहाय्याने तेलाची पहिली विहीर खोदण्यात आली. यानंतर हां हां म्हणता शेकडो विहिरी खोदण्यात आल्या. कोळशाप्रमाणे तेलाच्या बाबतीत, स्वामित्वाच्या हक्काबद्दल पैसे द्यावे लागत नसल्याने लोक भराभर विहीर खणू लागले. आपल्या विहीरीतील तेलाचा झरा दुसऱ्या क्षेत्रांतील विहिरीकडे खेचला जाऊ नये म्हणून तेलाचा अधिकाधिक उपसा करणे व आपल्या क्षेत्रात अधिकाधिक विहिरी खोदणे याची एकच धडपड अमेरिकन तेलवाल्यांनी चालू केली. तेलाच्या विहिरी काढीत असताना, तेलाच्या आधी प्रथम ज्वलनाला उपयोगी असा एक वायुरूप पदार्थ बाहेर पडत असतो. खाणीवाल्यांची दृष्टी तेलावर असल्याने त्यांनी या वायुरूप उपयुक्त पदार्थाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे हा बहुमोल पदार्थ फुकट गेला. तेलाचे उत्पादन शक्य तितक्या कमी खर्चात व्हावे म्हणून विहिरी अत्यंत जवळ जवळ खोदण्यात आल्या. इकडे कॅलिफोर्नियाच्या प्रदेशातही तेलाच्या खाणी सापडून याच पध्दतीने तेथील तेलाच्या उत्पादनाचा व्हावयाचा तोच परिणाम होऊन तेलाच्या किंमती साफ पडल्या. व या धंद्याला अवकळा प्राप्त व्हावयास सुरुवात झाली. प्रथमत: तेलाच्या धंद्याची झालेली सर्व वाढ फक्त एकाच कंपनीच्या हाती होती. या कंपनीचे सर्व लक्ष तेल ताब्यात घेऊन जगभर त्याची विक्री कशी करता येईल इकडे होते. तेलाचे उत्पादन करण्याची जोखमीची कामगिरी तेल खाणीचा धंदा करण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांच्या स्वाधीन करून ही कंपनी बाहेर पडलेल्या तेलाचा कबजा मात्र तत्परतेने घेई. तेलाचे उत्पादन करणाऱ्या लोकांनी आपल्याखेरीज दुसऱ्या कोणालाही तेल देऊ नये याबद्दलची सर्व दक्षता कंपनीकडून घेण्यात येई. आगगाडीचे रस्ते टाकणे, नळ टाकणे, अशुध्द स्वरूपातील तेल शुध्द करून त्यापासून अनेक उपयुक्त पदार्थ तयार करणे, इत्यादी सर्व बाबी या कंपनीमार्फत करण्यात येत असत. १९०६ मध्ये या कंपनीच्या हाती खाणीतून निघणाऱ्या तेलाचा ८० टक्के भाग असे. खाणीवाल्यांना ते आपणास योग्य वाटेल तो मोबदला देत; आणि लोकांच्याकडून मात्र यथास्थित पैसा घेत. १९०६ नंतर या कंपनीचे अनेक तुकडे पडून अनेक छोट्या-मोठ्या कंपन्या तयार झाल्या. तरी अद्यापि या कंपनीच्या शाखोपशाखांच्या हाती जागतिक तेल व्यापाराचा निम्मा हिस्सा आहे. अलीकडे कॉन्सस् ते टेक्ससपर्यंतच्या प्रदेशात नवीन तेलाचा साठा उपलब्ध झाला आहे. जागतिक तेल क्षेत्रात हे क्षेत्र अव्वल दर्जाचे समजले जाते. या प्रदेशातील तेलाची वार्ता लागताच फिरून अनेक लहान मोठ्या कंपन्या अस्तित्वात आल्या. कित्येक तगल्या, कित्येक बुडाल्या. तेलाच्या विहिरी इतक्या झपाट्याने निघू लागल्या की, तेल शुध्द करणाऱ्या कारखान्यांना उसंत मिळेना. अशुध्द स्वरूपातील लाखो

गॅलन तेल, कारखान्यांत पडून राहू लागले. धंद्याला मंदी व बेकारी हे जादा उत्पादनाचे दोन दुष्परिणाम तत्काळ दिसून येऊ लागले. याशिवाय नैसर्गिक तेलसाठ्याची नासधूस झाली ती निराळीच. तेलाच्या धंद्यात ठराविक अंतराने या गोष्टी घडत आल्या आहेत. जगात तेलाचे शोषण वाढूनही कोट्यवधी गॅलन तेल तेलकंपन्यांकडे पडून आहे. तेलाचे उत्पादन नियंत्रित करण्याचे प्रयत्न झाले; नाही असे नाही. पण त्याचा उपयोग झाला नाही. आणि याचे कारण म्हणजे तेल कंपन्यांतील अंतस्थ स्पर्धा होय.

तेलाचा धंदा हळूहळू काही विशिष्ट गटांच्या हाती जाऊ लागला. तेलाचे उत्पादन, शुध्दीकरण, वाहतूक, विक्री या सर्व बाबींचे नियंत्रण या गटांकडून होते. बंदराबंदरांमधून त्यांच्या मालकीची तेलवाहू जहाजे पडलेली असतात. हजारो मैल लांबीचे तेल वाहून नेणारे नळही यांच्याच मालकीचे असतात. जगाच्या निरनिराळ्या विभागांत त्यांनी गुंतवलेले भांडवल कोट्यवधी रुपयांचे असून, त्याच्या सुरक्षिततेसाठी आपापल्या राष्ट्रांना युध्दांत खेचण्याइतके प्रभावी सामर्थ्य या भांडवलवाल्यांना आहे. रशिया सोडून दिला तर जगातील बहुतेक तेलाच्या सर्व खाणी इंग्लिश अगर अमेरिकन भांडवलवाल्या गटांच्या हाती आहेत. व्हेनन्जुला व मेक्सिको या दोन प्रदेशांतील तेलाच्या खाणींचे उत्पादन सर्वस्वी त्या देशातील तेल कंपन्यांच्या हाती असल्याने तेलोत्पादनाच्या बाबतीत या कंपन्या वाटेल तसा धुमाकूळ घालू शकतात. तेथील सरकारेही त्या बाबतीत ढवळाढवळ करू शकत नाहीत. खुद्द अमेरिका व अमेरिकेच्या दक्षिणेकडील वर नमूद केलेले हे दोन देश वजा केले तर बाकीच्या बहुतेक तेल क्षेत्रात ब्रिटिश भांडवलदारांचा हात आहे. गेल्या महायुध्दानंतर ब्रिटिश भांडवलदार गटाने पध्दतशीर प्रयत्न करून जागतिक तेल क्षेत्रात आपले बस्तान बसविले आहे. रशियन राज्यक्रांतीचा फायदा घेऊन इंग्लिश भांडवलदारांनी खुद्द रशियाच्या बाकू येथील तेल क्षेत्रावर धाड घालण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण तो यशस्वी झाला नाही. साम्राज्यातील खनिज पदार्थांवर ब्रिटिशेतरांना हात मारण्यास वाव मिळू नये अशी योजना करण्यात आली असल्याने साम्राज्यातील खनिज पदार्थांचा मक्ता इंग्लिश भांडवलदारांना मिळाल्यागत झाला आहे. शिवाय इराणसारख्या प्रदेशातील तेलाच्या खाणीही गेल्या लढाईच्या पर्वणीत ब्रिटिशांनी लाटून ठेवल्या आहेत. या तेल क्षेत्रांच्या स्वामित्वाबद्दल इराणच्या शहाला ब्रिटिश भांडवलदारांकडून थोडी फार रक्कम देण्यात येत असे. इंग्लंड व अमेरिका हे दोनच प्रभावी गट आज तेलाच्या व्यापारात शिल्लक राहिले असल्याने परस्परांत स्पर्धा न करिता एकोप्यानेच जगाची लुबाडणूक करण्याची त्यांची वाढती प्रवृत्ती आहे.

मोटारी, विमाने यांनी होणारी वाढती वाहतूक व लष्करी महत्व यामुळे युध्दोत्तर कालात खनिज तेलाचे महत्व अत्यंत वाढले आहे. २०व्या शतकाच्या सुरुवातीपासून तो तहत आतापर्यंत म्हणजे सरळ सरळ ५० वर्षे 'पेट्रोल' तेजीच्या मार्गावरच आहे. बाजारात सतत इतकी वर्षे चलती कोणत्याच खनिजाला मिळालेली नाही. जगातील खनिज पदार्थांच्या उत्पादनापैकी २० टक्के भाग एका पेट्रोलियमने उचलला आहे. पण हा सर्व धंदा व त्यावरील नफा काही ठराविक गटांच्याच हाती आहे.

'अमेरिकन स्टँडर्ड ऑईल ऑफ न्यूयार्क' आणि ' स्टँडर्ड ऑईल ऑफ न्यूजर्सी' अशा दोन मंडळ्या अस्तित्वात आल्या. जगाच्या सर्व तेल बाजारांचे नियंत्रण या दोन गटांच्या हाती आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. अमेरिकन कंपन्यांच्या हाती अमेरिकन तेलाच्या उत्पादनाचा दोन तृतियांश भाग आहे. मेक्सिको, कोलंबिया, पेरू, अर्जेंटिना येथील तेल विहिरींवर त्यांची मालकी आहे; तर रुमानिया, पोलंड, इराक, ईस्ट इंडिज बेटे, व्हेनन्जुला येथील तेल उत्पादनात त्यांनी कमीअधिक प्रमाणात भांडवल गुंतविले आहे.

१९१९ पासून अस्तित्वात असलेल्या रॉयल डच शेल कंपनीकडून इतर सर्व इंग्लिश तेल कंपन्यांचे नियंत्रण केले जाते. अँग्लो इरानियन ऑईल कंपनी, इराक पेट्रोलियम कंपनी, बरमा ऑईल कंपनी, या सर्व शेलच्या टोळक्यातील कंपन्या असून जगातील 'क्रूड ऑईल' ची मक्तेदारी त्यांच्या हाती आहे. इराण, इराक, ईस्ट इंडिज बेटे, सारावाक, युकेडॉर, ट्रिनीदाद, व्हेनन्जुला इत्यादी खनिज तेलाच्या उत्पादनात त्यांचा हिस्सा आहे. या शिवाय रुमानिया,

कोलंबिया, मेक्सिको येथील तेल कंपन्यांत त्यांनी भांडवल गुंतविले आहे ते निराळेच.

जगातील खनिज तेलाचे उत्पादन पुढीलप्रमाणे आहे.

| ***देश*** | ***मेट्रिक टन*** |
|---|---|
| अमेरिका | १४ कोटी |
| रशिया | २।। कोटी |
| व्हेनेनजुला | २ कोटी |

| ***देश*** | ***मेट्रिक टन*** |
|---|---|
| रुमानिया | ८० लक्ष |
| इराण | ७५ लक्ष |
| ईस्ट इंडीज | ६०लक्ष |
| इराक | ३५ लक्ष |

खनिज तेलाची उलाढाल करणाऱ्या राष्ट्रांनी आपली जागतिक परिषद १९३२ साली पॅरिसला भरविली. पण १९३७ पर्यंत जगाच्या बाजारात निरनिराळ्या तेल कंपन्याची चाललेली मारामारी थांबविण्यास उपाय सापडला नाही. आता सर्व राष्ट्रांच्या लष्करी गरजा, वाहतूक यांत वाढ झाल्याने तेलवाल्यांना फिरून दिवाळी आली आहे.

काही धातूंच्या उत्पादनाबाबतसुध्दा तेलाप्रमाणेच राष्ट्रीय स्वरूपाचे गट अस्तित्वात येऊ लागले आहेत. गेल्या महायुध्दापूर्वी अस्तित्वात असलेली 'ऑर्मर् प्लेट रिंग ' नावाची संस्था जागतिक लोखंड व पोलादी सामानाच्या व्यापाराचे नियंत्रण करीत असे. या संस्थेत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व अमेरिका या चारही राष्ट्रांतील लोखंड व पोलादी कारखान्यांचे सूत्रचालक असत. अलीकडे अशुध्द लोखंडाच्या उत्पादनातील खाजगी स्पर्धा राष्ट्रीय स्पर्धेच्या स्वरूपात प्रगट होऊ लागली आहे. अशुध्द स्वरूपातील लोखंड 'हेमटाइट' या नावाने ओळखले जाते. याच पदार्थापासून पुढे टाचणीपासून पुलापर्यंत सर्व वस्तू तयार केल्या जातात. अमेरिकेतील सुपीरियर सरोवराच्या आसपासच्या प्रदेशात जगातील अत्यंत उत्कृष्ट अशा लोखंडाच्या खाणी आहेत. लोखंडाचे उत्पादन अमेरिकेच्या बरोबरीने करणारे आणखीही काही देश आहेत; नाहीत असे नाही. परंतु अमेरिकन लोखंडाचा दर्जा त्या देशातील लोखंडाला येत नसल्याने या बाबतीतही अमेरिका अग्रेसर आहे. लोखंडाच्या धंद्यातील कित्येक भांडवलवाल्यांची या धंद्यावरील पकड अशी आहे की लोखंडाच्या खाणी, लोखंड शुध्द करणाऱ्या भट्ट्या, त्यापासून पोलाद बनविण्याचे कारखाने, आगगाड्या, आगबोटी बांधण्याचे कारखाने या साऱ्या गोष्टींवर एकसमयावच्छेदेकरून त्यांची मालकी असते. अमेरिकेच्या खालोखाल फ्रान्समधील लॉरेन् प्रांत लोखंडाच्या उत्पादनाबद्दल प्रसिध्द आहे. फ्रान्सच्या हातातून जर्मनीकडे व जर्मनीच्या हातातून फ्रान्सकडे अशी या प्रांताची अदलाबदल जर्मनी आणि फ्रान्स यांच्या लढ्यांत प्रत्येक वेळेला झाली आहे. याचे कारण येथील लोखंडाच्या खाणी हेच होय. व्हर्सायच्या तहाने आखण्यात आलेल्या योजनेनंतर लॉरेनमधील फ्रेंच लोखंडी व पोलादी कारखान्यांना चांगलाच हातभार लागला. औद्योगिक क्षेत्रात पुढे असूनही लोखंडाच्या बाबतीत समृध्द नसलेले राष्ट्र म्हणजे जपान होय. कोळसा व पाण्यापासून होणारा विद्युत पुरवठा या गोष्टी उपलब्ध असता लोखंडाचे दुर्भिक्ष्य असणे ही गोष्ट जपानची अत्यंत मोठी उणीव आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी म्हणूनच जपानला चीनवर धाड घालून लोखंड हस्तगत करण्याचा मोह झाला. यांगत्सी नदीच्या खोऱ्यामध्ये असलेल्या लोखंडाच्या खाणी चालू करण्यासाठी जपानने अतोनात पैसा खर्च केला. परंतु या बाबतीत यावे तसे यश आले नाही. मांच्युरियात मात्र जपान्यांना थोडा फार दगडी कोळसा व लोखंड मिळाले. सध्या जगात उपलब्ध असलेल्या लोखंडाच्या खाणी फारशा ओसाड झालेल्या नाहीत. त्यांच्याकडून होत असलेला लोखंडाचा पुरवठा अल्पावधीत संपण्याची भीती नाही. ही गोष्ट जरी खरी असली तरी इंग्लंडसारखे आज बराच काळ लोखंड काढणारे देश बेताबेताने आपला साठा संपुष्टात आणीत आहेत. हे साठे संपल्यानंतर नवीन साठे उपलब्ध करण्याची आवश्यकता भासल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकेने ही गोष्ट ध्यानात घेऊनच चिली व ब्राझील यांमध्ये लोखंडाच्या खाणीसाठी म्हणून आपले भांडवल आतापासूनच गुंतवून ठेवले आहे.

लोखंड स्वस्तात स्वस्त धातू असूनही चालू युगात मात्र त्यांच्याशिवाय पानही हलत नाही. चालू यांत्रिक युगात लोखंडाचे महत्व न सांगताही दिसणारे आहे.

बारशाला व बाराव्याला उपयोगी पडणारी ही धातू आहे. हिच्या जिवावर वाटेल त्या सुखसोयी निर्माण कराव्या, वाटेल तितकी युध्दे करावीत. चालू जगाचा आर्थिक पाया 'हेवी इंडस्ट्री' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या उद्योगधंद्यावर आधारला आहे. हा हेवी इंडस्ट्री म्हणजेच लोखंड व पोलाद यांची कारखानदारी! फ्रान्स, रशिया, अमेरिका, इंग्लंड, स्वीडन ही राष्ट्रे लोखंडाचे उत्पादन करण्यात विशेष पुढारलेली आहेत.

पोलादी कारखाने व जर्मनी यांचे मोठे सहकार्य सर्वश्रुत आहे. पण जर्मनीच्या कारखानदारीला लागणारे कच्चे लोखंड मात्र सर्वस्वी जर्मनीत उपलब्ध होऊ शकत नाही. हा पुरवठा जर्मनीला बाहेरून करून घ्यावा लागतो. जर्मनी, झेकोस्लाव्हाकिया फार काय इंग्लंडसुध्दा आपणास लागणारे कच्चे लोखंड फ्रान्स, स्वीडन, स्पेन यांच्याकडून पैदा करून घेतात.

जपानने लोखंड व पोलाद यांची कारखानदारी वाढविली. पण तिच्यासाठी जपानला चीनमध्ये जुगार खेळावा लागला. त्याचा परिणाम अंती काय झाला हे आता दिसतेच आहे.

या धंद्यांत अमेरिकेचे प्रस्थ वाढू लागताच १९४६ साली प्रमुख युरोपियन राष्ट्रांनी पोलादाचा आंतरराष्ट्रीय व्यापार करण्यासाठी एक संघटना निर्माण केली. या संघात फ्रान्स, जर्मनी, बेल्जम ही राष्ट्रे प्रथम होती. नंतर इंग्लंडही या संघाला येऊन मिळाले. १९३६ साली दक्षिण संयुक्त आफ्रिकेने या संघात प्रवेश केला. १९३७ साली झेकोस्लोव्हाकियाने आत पदार्पण केले. १९४५ मध्ये जर्मनीने सार प्रांत बळकावल्याने जर्मनीची उत्पादनशक्ती वाढली व अमेरिकेला जगाच्या पोलाद बाजारात मार देण्यासाठी युरोपने आपले संयुक्त बळ पणाला लावले. अमेरिकेत अस्तित्वात असलेल्या अमेरिकन स्टील ट्रस्ट, युनायटेड स्टेट स्टील कारपोरेशन व बेथेलेम स्टील कारपोरेशन या कंपन्यांना युरोपची संयुक्त आघाडी जागतिक बाजारात नाडू लागली. पण १९३९ सालच्या राजकीय उलाढालींनी त्यांचे भाग्य उदयाला आले. युरोपियन महायुध्दाने अमेरिकेचे लोखंडी उखळ अक्षरश: रुपेरी झाले.

जगातील लोखंडाचे उत्पादन पुढीलप्रमाणे आहे.

| **देश** | **मेट्रिक टन** |
|---|---|
| फ्रान्स | ४ कोटि |
| अमेरिका | ३ .५ कोटि |
| रशिया | ३ कोटि |
| इंग्लंड | १ .५ कोटि |
| स्वीडन | ०.८ कोटि |
| जर्मनी | ० . ४१ कोटि |
| हिंदुस्थान | ० . २ कोटि |

पोलादी सामानाचा अनुक्रम मात्र लोखंडाच्या अनुक्रमाशी सुसंगत आहे असे मुळीच नाही.

पोलादी सामानाचे उत्पादन पुढीलप्रमाणे आहे.

| **देश** | **मेट्रिक टन** |
|---|---|
| अमेरिका | ३.५ कोटि |
| जर्मनी | १. ७५ कोटि |
| रशिया | १. २५ कोटि |
| इंग्लंड | १ . ० कोटि |
| फ्रान्स | ०. ६३ कोटि |
| हिंदुस्थान | ० . ९ कोटि |

लोखंडानंतर दुसरा महत्वाचा खनिज पदार्थ म्हणजे तांबे होय. सध्या विजेचा धंदा सर्वस्वी या एकाच धातूच्या जिवावर अस्तित्वात आहे. एका पेट्रोलियमखेरीज इतक्या झपाट्याने प्रचारात आलेला दुसरा कोणताही पदार्थ नाही. अवघ्या १२ वर्षांत खाणींतून निघणाऱ्या तांब्याचे प्रमाण दुपटीच्या पुढे गेले आहे. जगातील तांब्याच्या उत्पादनापैकी किंवा ४०% तांबे अमेरिकेच्या 'ॲरिझोना' या विभागात निघते. अमेरिकेमध्ये प्रस्थापित झालेल्या एकाच कंपनीने जगातील तांब्याच्या उत्पादनाचा व व्यापाराचा ९० टक्के हिस्सा हाताळला आहे. जगातील तांब्याच्या व्यापाराची जिम्मेदारी या एकाच कंपनीच्या हाती असल्याने कित्येक वेळी तांब्याची किंमत तिने अशा रितीने चढवली आहे की, तिच्या तांब्यातील पडीक खाणी चालविणेसुध्दा कंपनीला फायदेशीर पडले आहे. या कंपनीने नफेबाजीसाठी तांब्याचा प्रचंड साठा साठविण्यास व आफ्रिकेत तांब्याच्या खाणी सापडण्यास एकच गाठ पडली. आफ्रिकेने तांब्याचे उत्पादन वाढवून बाजारात त्यांची सर्रास विक्री चालू

करताच अमेरिकन कंपनीची तेजी घसाऱ्याला लागली व तांब्याच्या व्यापाराची तिची जिम्मेदारीही संपुष्टात आली. तरी पण तांब्याच्या उत्पादनावरील अमेरिकन भांडवलाचे वर्चस्व संपुष्टात आले आहे असे मात्र नाही. चिलीमधील तांब्याच्या खाणीत अमेरिकन भांडवल सध्या ओतले जात असून जागतिक उत्पादनात चिली येथील अमेरिकन नियंत्रणाखालील खाणींचा दुसरा अनुक्रम लागण्यासारखा आहे. याशिवाय चिलीमध्ये असंशोधित असा बराच मोठा साठा पडून आहे ते निराळेच. आफ्रिकेपैकी बेल्जियन् व इंग्लिश भांडवलावर चालतात. या दोन भांडवलवाल्यांतील परस्पर स्पर्धा अमेरिकन भांडवलवाल्यांना थोडा फार वाव मिळण्यास उपयोगी पडते.

शिसे, कथील व जस्त यांच्या उत्पादनातसुध्दा अमेरिकेचा वरचष्मा दिसून येतो. या पदार्थांच्या जागतिक उत्पादनापैकी २५ ते ४० टक्के भाग अमेरिकेच्या नियंत्रणाखाली आहे. ब्रिटिशांनी मात्र जस्ताच्या धंद्यांत आपले भांडवल बऱ्याच मोठ्या प्रमाणात गुंतविले आहे. इतर धातूंपेक्षा जस्ताचे शोषण जरी कमी प्रमाणात होत असले तरी हरतऱ्हेच्या डब्यांना ही धातू लागत असल्याने पक्का माल तयार करणाऱ्या बऱ्याचशा कारखान्यांना ते आवश्यक होऊन बसले आहे. ब्रिटिश भांडवलाच्या नियंत्रणाखाली मलायात होत असलेले जस्ताचे उत्पादन जागतिक उत्पादनाच्या तिसऱ्या हिश्शाने आहे. मलायात निर्माण होणारे बहुतेक जस्त ब्रिटिश कारखानदारांकडूनच पक्क्या मालात रूपांतरित केले जाते. अमेरिकेत जस्ताच्या भट्ट्या निर्माण होताच ब्रिटिशांनी साम्राज्यातील जस्त ब्रिटिशांखेरीज जगातील इतर कोणत्याही भट्ट्यांत गाळले जाऊ नये म्हणून जस्ताच्या निर्यातीवर निर्बंध घातले. मलायाच्या खालोखाल दक्षिण अमेरिकेतील बोलेव्हियात जस्ताचे उत्पादन आहे व तेही ब्रिटिश भांडवलदारांच्या हाती आहे. याशिवाय ईस्ट इंडीज बेटांत सापडणारे जस्त डच भांडवलदारांच्या हाती आहे ते निराळेच. तांब्याप्रमाणेच जस्ताच्या बाबतही व्यापाराची जिम्मेदारी दिसून येते. प्रथम स्वतंत्रपणाने व नंतर 'डच' भांडवलवाल्यांशी सहकार करून ब्रिटिश भांडवलदारांनी जस्ताच्या किंमती आपल्या मनाप्रमाणे नियंत्रित केल्या. बोलेव्हिया व नायजेरिया येथील अत्यंत कमी दर्जाच्या खाणीसुध्दा ते मोठ्या फायद्याने चालवीत. अतिपूर्वेकडील देश सर्व जगाला जस्त पुरवू शकतील इतके समृध्द आहेत, व सध्या जस्ताला बाजारात असलेला भाव निम्मा करूनही या खाणी फायद्याने चालविणे शक्य आहे. पण इतके असूनही या व्यापारातील इंग्लिश मिरासदारीमुळे जस्ताच्या किंमती पडू शकत नाहीत.

चांदी : काही दिवसांपूर्वी चलनामध्ये सोन्याच्या बरोबरीने चांदीचा वापर असे. पण अलीकडे चलनाचा बराचसा बोजा एकट्या चांदीवरच पडतो. याचा अर्थ, यामुळे चांदीचा भाव वाढला आहे असा मात्र नाही. शिसे, तांबे, कथील यांच्या खाणींमधून चांदी हा दुय्यम पदार्थ म्हणून सर्रास मिळू लागल्यापासून चांदीचा भाव खूपच घटला. चांदीचे चलन यामुळे इतक्या हलक्या दर्जाचे म्हणून मानण्यात येऊ लागले. पण सुवर्ण चलनाचा सर्रास आश्रय करणे सर्वच राष्ट्रांना शक्य नसल्याने दरिद्री असे हे चलन बऱ्याच गरीब राष्ट्रांत चालू राहिले. चांदीच्या जागतिक उत्पादनाचा २७ टक्के भाग एका मेक्सिकोतील आहे. व हे उत्पादन अमेरिकन भांडवलवाल्यांच्या हाती आहे. पेरूचे व खुद्द अमेरिकेचे उत्पादनही याच भांडवलवाल्यांचे हाती आहे. १९३३ साली अमेरिकेच्या खटपटीने चांदी निर्माण करणाऱ्या अमेरिका, मेक्सिको, पेरू, कॅनडा व ऑस्ट्रेलिया या पाच राष्ट्रांनी मिळून चांदीची किंमत स्थिर करून तिला चलनातही भरपूर वाव मिळावा म्हणून खटपट केली. चीन, हिंदुस्थान व स्पेन या तीन राष्ट्रांकडे चांदीचा सुप्त साठा बराच असल्याने त्यांनीही या खटपटीत भाग घेतला. चांदीला स्थैर्य आणण्याच्या दृष्टीने १९३६ साली अमेरिकेने मेक्सिकोत निर्माण होणारी सर्व चांदी तर खरेदी केलीच; पण शिवाय चीनने विकावयास काढलेली चांदीही पण पदरात पाडून घेतली. चांदीच्या उत्पादनाचे आकडे पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| मेक्सिको | ७,६८ लाख औंस |
| अमेरिका | ५,७६ लाख औंस |
| पेरू | २,१२ लाख औंस |
| कॅनडा | २,१० लाख औंस |
| ऑस्ट्रेलिया | १,१२ लाख औंस |

यानंतर बोलेव्हिया,जपान, जर्मनी, हिंदुस्थान हे देश अनुक्रमाने येतात. चीनकडे चांदीचा साठा आहे; पण तो अद्यापि उपलब्ध करण्यात आलेला नाही.

सुवर्ण : आंतरराष्ट्रीय चलनाचा आधार म्हणून सुवर्णाला प्राप्त झालेले महत्व कोणासही नाकारता येणार नाही. त्यांची दुर्मीळता व रासायनिक क्रियेच्या आहारी न जाणारे त्याचे स्वरूप यांमुळे चलन व अलंकार यांमध्ये सुवर्णाला मिळालेले प्राधान्य आज हजारो वर्षे कायम आहे. ब्रिटिश साम्राज्यात समाविष्ट असलेला दक्षिण संयुक्त आफ्रिकेचा प्रदेश जगातील ५६ टक्के सुवर्णाच्या उत्पादनाला जबाबदार आहे. हा प्रदेश सुवर्ण निर्मितीत अव्वल दर्जाचा आहे. यानंतर रशिया व अमेरिकेचा अनुक्रम लागतो. ऑस्ट्रेलियातही सुवर्णाच्या खाणी आहेत, जपान बऱ्या प्रमाणात सुवर्णोत्पादन करू शकते. सुवर्णोत्पादनाचे आकडे व अनुक्रम पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| दक्षिण संयुक्त आफ्रिका | १,०७,२० हजार औंस |
| रशिया | ५४,४० हजार औंस |
| कॅनडा | ३२,६४ हजार औंस |
| अमेरिका | ३२,०० हजार औंस |
| ऑस्ट्रेलिया | ९,६० हजार औंस |

यानंतर ऱ्होडेशिया, मेक्सिको, जपान, फिलिपाईन्स, बेल्जियन कांगो, कोरिया इत्यादी प्रदेश येतात. हिंदुस्थानचे उत्पादन अगदीच कनिष्ट दर्जाचे असून ते सुमारे ३,२० हजार औंस आहे.

खनिज पदार्थांमध्ये धातूखेरीज जमा होणारे इतर पदार्थ म्हणजे काही 'क्षार' होत. हे क्षार जमिनीमधून काढल्यानंतर विशिष्ट पध्दतीने शुध्द करून नेहमीच्या वापरण्यात येतात. आपण नेहमी वापरत असलेले साधे मीठ हा एक असाच क्षार आहे. हे मीठ समुद्राच्या पाण्यापासून जसे तयार होऊ शकते तसे खाणीतूनही सापडू शकते. मानवी अन्नातील तो एक महत्वाचा घटक असून विशेषसे संस्कार न करिता आहारामध्ये तो सहजासहजी वापरण्यात येतो. पाश्चात्य राष्ट्रांच्या स्वामित्वाखाली असलेल्या देशांमधून या सामान्य वस्तूवरही कर येतो व अशा तऱ्हेने पैसा मिळविण्यात येतो. अशा नसत्या जाचक कराला बळी पडलेला देश म्हणून ब्रिटिश अमदानीतील हिंदुस्थानाचे उदाहरण लक्षात ठेवण्याजोगे आहे. हिंदुस्थानातील किनाऱ्यालगत असलेली मिठागरे सरकारनियंत्रित असून राजपुतान्यात खाऱ्या सरोवरापासून होणारे क्षारोत्पादनही सरकारच्या हाती असे. हिंदी जनतेला अगर संस्थानांना मिठाचे उत्पादन करण्याची बंदी होती. एवढेच काय, पण समुद्रकाठी निसर्गत: सापडणारे मीठ गोळा करण्यासही बंदी असे. उत्तर हिंदुस्थानात व वायव्य सरहद्द प्रांतात मात्र हे निर्बंध नाहीत. पंजाबात खनिज क्षार मिळतात. परंतु हिंदुस्थानात ते इतरत्र कोठेही पाठवून दिले जात नसत व अशा तऱ्हेने हिंदी लोकांना फुकट मिळणारे मीठ न देण्याचा कडेकोट बंदोबस्त सरकारने केला होता. मिठागरातून काम करणारे हजारो लोक बेकार करून ब्रिटिश सरकार आफ्रिकेतील एडन बंदरात तयार झालेले मीठ मोठ्या खर्चाने हिंदुस्थानात आणून विकी. जगातील मिठाचे उत्पादन करणाऱ्या देशांत हिंदुस्थान देश महत्वाचा असूनही सुमारे ७ लाख टन मीठ हिंदुस्थानला बाहेरून आणावे लागे. हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीचा मासला म्हणून ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे.

शेतीमध्ये खत म्हणून अत्यंत उपयुक्त होणारे असेही कित्येक क्षार खाणींमधून सापडतात. वनस्पती-जीवनाला व वाढीला ते अत्यंत उपयुक्त असल्याने सुधारलेल्या शेतीपध्दतीमध्ये त्यांचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. पण या भांडवलशाही युगाचा न्यायच असा आहे की, ज्या ठिकाणी हे क्षार मिळणे अत्यंत आवश्यक आहे ते त्या ठिकाणी हटकून मिळत नाहीत. हिंदुस्थान अगर चीन यांच्यामधला दरिद्री शेतकरी व त्याची दरिद्री जमीन या पदार्थाच्या किंमतीमुळे त्यांचा वापर करू शकत नाहीत. आणि ज्या देशांत जादा धान्योत्पादनाची गरज नाही त्या देशांत मात्र त्यांची लयलूट होत आहे. खते म्हणून उपयोगी पडणाऱ्या क्षारांमध्ये तीनच क्षार महत्वाचे आहेत. फॉस्फेट या सदरांमध्ये पडणारे क्षार अमेरिकेत विपुल प्रमाणात सापडत असून फ्लॉरिडा हे त्यांच्या खाणीचे केंद्र आहे. उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच वसाहतीमध्येही फॉस्फेटचे उत्पादन होत असून लवकरच फ्रान्स या क्षारांच्या उत्पादनात पहिला अनुक्रम मिळवील अशी चिन्हे दिसत आहेत. पोटॅश या सदरात पडणारे क्षार स्टॉस्फर्ट या जर्मनीतील विभागामध्ये मोठ्या प्रमाणात सापडतात. जागतिक उत्पादनाचा ९०%

भाग स्टॉस्फुर्ट येथील खाणी व फ्रान्सच्या मालकीच्या ऑल्सेस् येथील खाणी यांमधून निघतो. नायट्रेट या नावाने ओळखले जाणारे क्षार वरील दोन क्षारांपेक्षा भिन्न असून त्यामधील नत्राच्या प्रमाणामुळे वनस्पतीला अत्यंत पोषक असे ते ठरतात. या क्षाराचा जागतिक मक्ता फक्त एकाच राष्ट्राला मिळाल्याप्रमाणे झाले आहे. उत्तर चिलीच्या ओसाड प्रदेशात सुमारे ४५० मैल लांबीचा या क्षाराचा पट्टा आढळून आला आहे. या क्षारांचे उत्पादन करण्याचे काम सर्वस्वी अमेरिकन भांडवलदारांच्या उत्पादनावर जबरदस्त कर बसवून चिली सरकारने आपली तुंबडी भरून घेतली आहे. चिली सरकारच्या व अमेरिकन भांडवलशाहीच्या आहारी गेलेला हा उपयुक्त पदार्थ जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन शेतकऱ्यांना अल्प मोलात मिळेल अशी व्यवस्था ज्या दिवशी होईल तो दिवस सुदिनच म्हणावयास हरकत नाही.

वरील क्षारांच्या उत्पादनात आतापर्यंत चर्चिलेल्या अनेक वस्तूंप्रमाणेच निष्काळजीपणा दाखविण्यात आला. १९१०पर्यंत उत्पादन सतत चढत्या प्रमाणात करण्यात आले. पुढे लवकरच हे क्षार संपूर्ण नष्ट होण्याची भीती निर्माण झाली. जर्मनी आणि अमेरिका यांनी कृत्रिमरित्या नायट्रोजनयुक्त खते तयार करण्याची युक्ती काढल्याने वरील क्षारांची या दोन देशांची मागणी बरीचशी कमी झाली. नंतर ही कृत्रिम खते व नैसर्गिक क्षार यांच्यामध्ये स्पर्धा चालू होऊन किंमतीत फार झपाट्याने फेरबदल होऊ लागले. खनिज क्षारांची मागणी कमी होऊ लागल्याने या खाणींमधून काम करणारे मजूर व त्यांची वाहतूक करणारी रेल्वेसारखी साधने यांच्यावरही परिणाम होऊ लागला. या धंद्यात गुंतलेल्या सुमारे ४४हजार कामगारांना बेकार व्हावे लागून त्यांच्या कुटुंबावर फार मोठी आपत्ती ओढवली.

आयोडाइन हा महत्वाचा पदार्थ औषधात अत्यंत उपयुक्त असून याच्या सर्व व्यापाराचे नियंत्रण विशिष्ट लोकांच्या हाती गेले आहे. हा पदार्थ मूळ स्वरूपात खाणीत सापडत नाही. परंतु खनिज द्रव्यांपासून दुय्यम पदार्थ म्हणून निघणारा हा जिन्नस जगाला भरपूर व स्वस्त प्रमाणात मिळणे शक्य असूनही त्याचा बराचसा भाग किंमती पडू नयेत म्हणून बुध्दिपुरस्सर नष्ट करण्यात येतो. अशा तऱ्हेने स्वस्त मिळू शकणारा हा पदार्थ जाणून बुजून महाग केला जातो. दुसरा महत्वाचा खत-पदार्थ म्हणजे ग्युआनो हा होय. वस्तुत: हा खनिज पदार्थ नाही. विशिष्ट तऱ्हेच्या समुद्रपक्षांच्या नासक्या शीटेपासून हा मिळतो. म्हणून त्याला खनिजाच्या वर्गात घातला आहे. चिलियन नायट्रेटप्रमाणे या पदार्थातही नायट्रोजनचे प्रमाण भरपूर असून शेणखतासारख्या सामान्य खताच्या मानाने हे खत ३० पट अधिक उपयुक्त असते. चिंचा आणि लोबोस या पेरूच्या किनाऱ्याच्या बाजूस असलेल्या दोन बेटांमध्ये हे खत भरपूर प्रमाणात मिळते. पांढऱ्या छातीच्या समुद्रपक्षांपासून व इतर अनेक जातीच्या पक्षांपासून हे खत तयार होते. अशा पक्षांच्या प्रचंड वसाहती या दोन बेटांवर आढळतात. या वसाहतीची शीट काही कारणाने मातीत गाडली गेल्याने हे खत आरंभी मिळाले. पण आता या पक्षांच्या वधापासून मनुष्यप्राणी तो तयार करून घेऊ शकतो. या खताची उपयुक्तता पटल्यानंतर ब्रिटिश भांडवलदार वर्गाने या बेटावर बस्तान ठेवले व अत्यंत स्वस्तात पडणाऱ्या या खताचा व्यापार सुरू केला. ब्रिटिशांचा हा धंदा पाहून इतर राष्ट्रांतील लोकांचीही धावपळ सुरू झाली. गयुआनो बेटावर त्यांनी आपले बस्तान ठेवले व स्पर्धेला सुरुवात झाली. २० वर्षांच्या अवधीत एका लहानशा बेटातून हे खत सुमारे १ कोटि टन काढण्यात आले. या पक्षांच्या विणीच्या दिवसांमध्ये पक्ष्यांची हकालपट्टी करून त्यांची अंडी खाण्यासाठी वापरण्यात येतात व त्यांनाही बेदरकारपणे ठार मारण्यात येते. पक्षांच्या विष्ठेचे थर जमिनीवर बसूनही तिथे उत्तम खत तयार होते. हे खत शेतीला उपयोगी पडत असल्याने चिनी मजूर मोठ्या प्रमाणात या बेटांवर आणून आज कित्येक वर्षे पडत आलेले या पक्ष्यांच्या विष्ठेचे थर त्यांच्याकडून खोदून घेण्यात आले. या थराची जाडी कित्येक ठिकाणी १०० फुटाहूनही अधिक दिसून आली आहे. या चिनी मजुरांवर देखरेख करण्यासाठी निग्रो मुकादम नेमण्यात आले असून त्यांच्या हाती प्रचंड आसूड देण्यात आलेले असतात. या मुकादमांच्या आसूडाच्या फटक्याखाली चिनी मजुरांना काम करावे लागत असल्यामुळे कित्येक वेळा त्यांनी आत्महत्या केल्याचे आढळून येते. या बेटावर जाऊन आलेल्या कित्येक

प्रवाशांनी तेथील चिनी मजुरांना सहन कराव्या लागणाऱ्या यातनांची हृदयद्रावक वर्णन केलेली वाचावयास मिळतात.

या खतांचा पुरवठा. अशा तऱ्हेने इंग्लिश भांडवलवाल्यांनी लुबाडण्यास सुरुवात केल्यानंतर दक्षिण अमेरिकेतील पेरूव्हियन सरकारला अशी भीती पडली की हे लोक आपल्याजवळच्या बेटांवरील खत आपल्याच शेतीला महाग करून ठेवणार. इंग्लिश कंपन्यांचा हा व्यापार वेळेवारीच आटोक्यात न आणल्यास आपले आतोनात नुकसान होईल. हे जाणून पेरूव्हियन सरकारने क्रमाक्रमाने या कंपन्या विकत घ्यावयास सुरुवात केली व थोड्याच दिवसांपूर्वी दोन बेटे कंपन्यांच्या हातातून काढून आपल्या हाती घेतली. आता येथील खताचा पुरवठा पेरूव्हियन सरकारच्या हाती असल्याने खतांच्या उत्पादनात नासाडी न होईल अशा बेताने सर्व दक्षता घेण्यात येते व खतांचा प्रमाणबध्द पुरवठा जगाला होऊ शकतो. तरी पण आतापर्यंत कंपन्यांनी केलेली लुबाडणूक इतक्या मोठ्या प्रमाणात झाली आहे की, झालेले नुकसान भरून काढण्यास आणखी कित्येक वर्षे जावे लागतील. दक्षिण आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यालगत असलेल्या बेटांतून ग्युआनोचा पुरवठा होऊ शकतो. सुमारे ६०० यार्ड लांब व २०० यार्ड रुंद अशा इचाबू बेटावरील एका पट्ट्यात सुमारे २ हजार लोक त्या खतासाठी झगडत होते. निरनिराळ्या कंपन्यांच्या नोकरीतील ही माणसे या जमिनीच्या लंगोटीत धुमाकूळ घालीत असता तेथे काय शिल्लक राहिले असेल याची वाचकांनीच कल्पना केलेली बरी. या बेटावर ब्रिटिशांची मालकी होताच इतर राष्ट्रांतील कंपन्यांना बेटावरील 'ग्युआनो' खत मिळण्याची बंदी करण्यात आली. या बेटावरील उत्पादन जोरात चालू असता ग्युआनोने भरलेली ३०० जहाजे किनाऱ्यावर पडून असत. थोड्याच अवधीत इचाबू व त्याच्या आसपासची इतर बेटे निव्वळ खडक बनून गेली. दिवसेदिवस ग्युआनो बेटाची मालकी ती ज्या राष्ट्रांच्या शेजारी असतील त्या राष्ट्राकडे देण्याची पध्दत निघाल्याने दक्षिण अमेरिकेच्या आसपासची बेटे त्या खंडातील राष्ट्रांकडे गेली व आफ्रिकेच्या आसपासची बेटे दक्षिण संयुक्त आफ्रिकेकडे आली. या बेटांचे उत्पादन आता एकंदरीत कमी होत आले आहे; आणि त्याचप्रमाणे, मालक राष्ट्रांना या पदार्थाची उपयुक्तता कळून आल्याने ते त्याची फारशी निर्यातही करीत नाहीत.

●●●

## ६

जगात निर्माण होणाऱ्या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करून लोकोपयोगासाठी त्याची बाजारात रवानगी करण्याचे काम निरनिराळी औद्योगिक केंद्रे करीत असतात. जगातील कच्चा माल व त्यांचे रूपांतर करणारे कारखाने हे एकाच ठिकाणी आहेत असे मात्र नाही. मजुरांचा पुरवठा, कारखान्याला आवश्यक अशी लागणारी यांत्रिक शक्ती, तयार माल खपविण्यास आवश्यक अशा बाजारपेठा आणि काही विशिष्ट कारखान्यांच्या बाबतीत आवश्यक असणारे हवामान या गोष्टींच्या अनुकूलतेवर कारखान्यांची उभारणी अवलंबून असते. उत्तर अटलांटिकाच्या दोन्ही बाजूंवरील राष्ट्रे प्रथम औद्योगिक क्षेत्रात पुढे आली होती. पश्चिम युरोप आणि अमेरिका यांच्याकडे असलेली कारखानदारीची मिरासदारी हळूहळू कमी होऊन जगाच्या अनेक विभागांमध्ये नव्याने निर्माण झालेले कारखाने जुन्या कारखानदारीशी स्पर्धा करू लागले व त्यांनी १०० टक्के या जुन्या राष्ट्रांच्या हाती असलेली बाजारपेठ अंशत: का होईना पण काबीज केली. जुन्या व नव्या राष्ट्रांमध्ये बाजारपेठा काबीज करण्याबाबत सुरू झालेली स्पर्धा युध्दाच्या रूपाने जगाच्या प्रत्ययाला आली. ही स्पर्धा करणारी सर्व राष्ट्रे भांडवलशाही पध्दतीचा स्वीकार करून असल्याने बाजारपेठ काबीज करताना गिऱ्हाइकाला स्वस्त माल देण्याची त्यांची कसोशी त्यांच्या नफ्यावर परिणाम न करिता त्यांच्या कारखानदारीत गुंतलेल्या मजुरांच्या जीवनावर परिणाम करी. कामाचे तास

वाढविणे, मजुरीचे दर कमी करणे, अशा गोष्टी करून आपले उत्पादन शक्यतो ते कमी खर्चात करीत. काही देशांनी स्वत:ची कारखानदारी तगविण्यासाठी जगातील इतर कारखानदारीला आपल्या स्वामित्वाखाली असलेल्या देशांचे दरवाजे बंद केले. त्यामुळे जागतिक बाजारपेठेवर एके काळी प्रभुत्व गाजविणाऱ्या कित्येक राष्ट्रांना चांगलीच ठोकर बसली.

कारखानदारीबाबत एके काळी इंग्लंडचा पहिला नंबर होता. जगातील कोणतेही राष्ट्र कारखानदारीला आव्हान देऊ शकत नव्हते. प्रत्येक राष्ट्राच्या बाजारात इंग्लिश बनावटीचा माल हटकून दृष्टीस पडे. पण आज स्थिती याच्या उलट आहे. इंग्लिश कारखानदारीइतकी ठोकर आज जगातील कोणत्याच कारखानदारीने खाल्ली नसेल. आणि विशेषत: लँकेशायरच्या कापडाच्या धंद्याने खाल्लेला मार तर लक्षात ठेवण्याजोगा आहे. लँकेशायरची हवा, इंग्लंडमधील या शहराचे स्थान, मजुरीचा व यंत्राचा पुरवठा यांमुळे जागतिक कापड व्यापारापैकी ७० टक्के व्यापार लँकेशायरच्या हाती होता. गेल्या महायुध्दानंतर ७०० कोटि यार्ड कापड लँकेशायरमधून निर्यात होत असे, यापैकी निम्मे कापड एकटचा हिंदुस्थानात जाई. म्हणजे लँकेशायरमध्ये एकूण तयार होणाऱ्या कापडाचा ८०% हिस्सा तत्काळ निर्यात केला जाई. १९१२ मध्ये लँकेशायरने मिळविलेला नफा १९२० साली लँकेशायरने मिळविलेल्या नफ्याच्या तिसांश होता. यावरून महायुध्दानंतरच्या १-२ वर्षात लँकेशायरने किती प्रचंड प्रमाणात नफा मिळविला असेल याची कल्पना येते. परंतु पुढे हळूहळू पौर्वात्य राष्ट्रांत कापडाचे उत्पादन वाढू लागले व बाजारांमधून इंग्लिश कापडाची उचलबांगडी होऊ लागली. हिंदुस्थानसारख्या देशातून झालेल्या राष्ट्रीय चळवळीचा परिणाम या धंद्यावर होऊ लागला व १९२८ साली लँकेशायरच्या निर्यातीच्या ४०% हिश्शाने ठोकर खाल्ली. १९३० मधील जागतिक मंदीने तर परिस्थिती भलतीच बिकट झाली. हिंदुस्थानचा व्यापार तर घटलाच; पण चीनचे दुसरे बडे गिऱ्हाईकही बेताबेताने लँकेशायरचा माल घेईनासे झाले. खुद्द इंग्लिश बाजारपेठसुध्दा लँकेशायरच्या सर्वस्वी हाती राहिली नाही. अमेरिकन कापसापासून सामान्य विणकरीचे जाडे भरडे कापड काढणारे कारखाने विशेषकरून नुकसानीत आले. इजिप्शियन कापसापासून तलम व सुंदर कापड काढणाऱ्या कारखान्यांना फारशी झळ लागली नाही. पण पूर्वेकडील कारखान्यांची चढती कमान लँकेशायरचा हा धंदाही संपुष्टात आणल्याशिवाय राहणार नाही असे दिसू लागले. कापड बाजार काबीज करण्याची धडपड चालू असता, लँकेशायरमधील काही कारखानदारांनी उत्पादन नियंत्रित करून व कपड्याची किंमत कमीत कमी ठेवून जागतिक बाजारातील आपले स्थान कायम ठेवण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण या योजनेच्या बाहेर असलेल्या कारखानदारांनी जादा उत्पादन करून व तोटा सोसूनही कापड विकून वरील कारखान्यांचा बेत हाणून पाडला. अशा तऱ्हेने काही काळ नुकसानीत व्यापार करूनही जागतिक बाजारात स्थान मिळण्याची आशा न राहिल्याने, लँकेशायरमधील कित्येक कारखाने गुंडाळले गेले. १।। लाख माग जागच्या जागी थंड झाले व ५ लाख लोकांच्या नशिबी बेकारी आली. लँकेशायरची ही दुर्दशा करण्यास खरे जर कोण कारणीभूत झाले असेल तर ते लँकेशायरचे पूर्वीचे आवडते गिऱ्हाईक हिंदुस्थान हेच होय. हिंदुस्थानने कापसाच्या उत्पादनाबरोबरच कापडाचे उत्पादनही आपल्या हाती घेतले. पहिल्या पंधरा वर्षांतच हिंदुस्थानने आपले उत्पादन चौपटीवर नेले. १९२७ साली हिंदी कापडाचे उत्पादन जवळ जवळ ३०० कोटि यार्डांपर्यंत जाऊन पोहोचले. हिंदुस्थानातील मजुरांचे दर लँकेशायरच्या मानाने अत्यंत कमी असल्याने हिंदी कापड धंदा लँकेशायरला खाऊन टाकणार ही गोष्ट स्पष्ट दिसून येऊ लागली. व्हाइट्ले चौकशी समितीने हिंदी कापडधंद्यात वावरणाऱ्या मजुरांच्या हलाखीचे वर्णन करताना म्हटले, 'हिंदी मजूर जिव्हाळ्याने काम करणे शक्य नाही. त्याला राहण्यास स्वच्छ जागा नाही आणि मिळणारे वेतनही भरपूर नाही. अर्धपोटी राहून काम करणाऱ्या या कामगारांच्या हातून जास्त अपेक्षा करण्यात अर्थ नाही.' हिंदी कारखान्यांना ही स्थिती भूषणावह नाही हे जरी खरे असले तरी लँकेशायर येथील कामगाराचे भवितव्य यापेक्षा फार निराळे होते असे मात्र कोणी मानण्याचे फारसे कारण नाही.

नुकत्याच संपलेल्या या महायुध्दापूर्वी हिंदुस्थानात थोडे फार आयात होणारे कापड जपानमधून आणले जात असे. जपानमधून हिंदुस्थानात येणारे कापड काही हजार वार इतकेच असे. जपानी कारखानदार जादा कापड निर्मिती करीत असून लँकेशायरला मारण्याची त्यांची धडपड चालू होती. दुसरे महायुध्द चालू होण्यापूर्वी जपानने लाखो नवीन माग घातले होते. उत्पादनाचे वाढते प्रमाण व जपानमधील मजुरीचे स्वस्त दर यामुळे जपानी कापडधंदा लँकेशायरचे पुरे वाटोळे करणार हे स्पष्ट दिसू लागले होते. जपानच्या पराभवामुळे जपानी कारखानदारीचा नाशच झाल्यास लँकेशायरला काही आशा आहे. जपानी मजूर १६/१७ तास काम तर करू शकतोच. पण शिवाय त्याचे वेतनही इतके कमी असते की, बाजारात जपानी कापड लँकेशायरच्या मानाने पुष्कळच स्वस्त पडू शकते. जपानी शेतकरी शेतीवर बायकामुले पोसण्यास असमर्थ असल्याने त्याच्या बायकामुली अल्प वेतनात कापड कारखान्यात राबून प्रपंचाला हातभार लावीत असतात. हिंदुस्थानातील मुंबई व अहमदाबाद येथील गिरण्यांतून राबणाऱ्या कामगारांच्या दु:स्थितीचे तर वर्णनच करावयास नको. चीनच्या कापड धंद्याचीही हीच स्थिती आहे. चिनी बाजारपेठही जपान्यांनी बरीचशी हस्तगत करून ठेवली होती व या सर्व भानगडीमुळे लँकेशायरचा कापडधंदा ही एक ऐतिहासिक बाब होऊन बसण्याचा प्रसंग आला आहे.

लँकेशायरच्या बाबतीत जो प्रकार घडला तोच प्रकार अमेरिकन कापड धंद्यातही घडला. अमेरिकन कापडधंदा हा सर्वस्वी अमेरिकेची कापडाची गरज भागविण्यापुरताच मर्यादित आहे. जागतिक बाजारपेठ काबीज करण्याची महत्वाकांक्षा अमेरिकन कापड कारखानदारांनी कधीच बाळगली नव्हती. पण इतके असूनही लँकेशायरपेक्षाही अमेरिकन कापड कारखान्यात कापडाचे शोषण अधिक केले जाते. न्यूइंग्लंड ह्या विभागात अमेरिकन कापडाचे कारखाने असून ८० टक्के उत्पादन फक्त या एका विभागात होते. बाकीचे उत्पादन अमेरिकेच्या दक्षिण विभागातील संस्थानांत होते. पण सध्या ही परिस्थिती बदलली आहे. आता अमेरिकेच्या दक्षिण भागातील मागांची संख्या उत्तर भागातील मागांच्या संख्येपेक्षा अधिक आहे. १९२४ ते ३२च्या दरम्यान हा बदल इतक्या झपाट्याने झाला की, कापडाच्या उत्पादनाचा निम्म्याच्यावर भाग दक्षिण संस्थानांनी काबीज केला व न्यूइंग्लंड नावालाच कापड धंद्याचे केंद्र राहिले. पण एका बाबीत मात्र न्यूइंग्लंडने आपली कीर्ती अद्यापि शाबूत ठेवली आहे. आणि ती म्हणजे उच्च दर्जाच्या तलम कापडाचे उत्पादन ही होय. दक्षिण संस्थानांनी जाड्या भरड्या कापडाचा सर्व व्यापार काबीज केला आहे. पण उंची कापडाचा व्यापार मात्र अद्यापि उत्तर संस्थानांच्या हाती आहे. प्रथम अमेरिकेच्या दक्षिण पूर्व किनाऱ्यावरील संस्थाने कापसाच्या प्रदेशाला जवळ असल्याने कापड धंद्याला अनुकूल ठरतील असे वाटले. पण कापसाच्या प्रदेशाच्या पश्चिम भागातून जॉर्जियाला रेल्वेने कापूस आणणे व बोटीने तो न्यूइंग्लंडला नेणे या दोनही गोष्टी खर्चाच्या दृष्टीने सारख्याच पडत असल्याने त्यातल्या त्यात अनुकूल हवामानाचे न्यूइंग्लंड हे ठिकाण कापड धंद्यासाठी पसंत करण्यात आले. व कापडाचे उत्पादन न्यूइंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. काही दिवसांनी ही लाट परत फिरली. दक्षिणेकडील संस्थानांत शेती खूप असल्याने थोडक्या मजुरीत अधिक काम करणारे मजूर या विभागात जास्त मिळू लागले व कापडाच्या कारखान्यांचा ओघ फिरून दक्षिणेकडे वळला. उत्तरेच्या मानाने दक्षिणेकडील मजुरांची मजुरी जवळ जवळ निम्याने आहे. परंतु जपानच्या मानाने ती चौपटीने आहे. मात्र यावरून या धंद्यातील जपानी मजुरांची स्थिती किती हीन दर्जाची असेल याची कल्पना यावयास हरकत नाही.

हिंदुस्थानमध्ये बंगाल प्रांतात मोठ्या प्रमाणात ज्यूटची लागवड होते. धागा देणाऱ्या वनस्पतींमध्ये कापसाच्या खालोखाल ज्यूटचा अनुक्रम येतो. ज्यूटच्या धाग्यापासून तयार होणाऱ्या जाड्याभरड्या किंतानाचा पोती करण्याकडे व पाठविण्यांत येणाऱ्या वस्तूंवर अस्तर घालण्याकडे (Packing) उपयोग होतो. मुंबईला कापड धंदा जे बस्तान मांडून बसला आहे तेच बस्तान ज्यूटने बंगालमध्ये मांडले आहे. ज्यूटच्या निर्यातीपैकी ६० टक्के निर्यात एकट्या बंगालच्या हाती आहे. अनेक दिवसांपूर्वी बंगालचा ज्यूट इंग्लंडमधील डंडी अगर इतर केंद्रांकडे पाठविला जात असे. एका ज्यूटच्या धंद्यावर इंग्लंडमधील गिरणीवाले लाखो पौंड

मिळवून जात. पण हळूहळू बंगालमध्ये निर्माण होऊ लागलेल्या ज्यूटच्या गिरण्यांनी इंग्लिश गिरण्यांच्या पोटावर पाय आणण्यास सुरुवात केली. कच्च्या मालाच्या ठिकाणीच पक्का माल तयार करून घेण्याच्या नव्या तत्वाप्रमाणे ज्यूटच्या कित्येक गिरण्या खुद्द कलकत्याला चालू करण्यात आल्या. गेल्या महायुध्दानंतर त्यांनी भांडवलाच्या बरोबरीने नफा उचलला आहे. कामगारांना ताशी सुमारे १० आणे हजेरी मिळे व ५४ तासांचा आठवडा धरण्यात येई. स्त्रिया व मुले यांचे वेतन अर्थातच कमी असे. हिंदुस्थानात जास्तीत जास्त मजुरी देणारा हा एकच धंदा आहे असे म्हटले असता हरकत नाही. कलकत्याच्या या धंद्याने डंडीचा धंदा साफ बसविला. व तेथील यंत्रसामग्री फुकट पडून राहिली. जनता बेकार झाली. पण कलकत्याचे भांडवल इंग्लिशच असल्याने नफा तिकडेच जाई. मजुरी फक्त येथे राही.

रेशीम, कृत्रिम रेशीम, लोकर इत्यादी कापड निर्माण करणाऱ्या अनेक धंद्यांत कापसापासून कापड करणाऱ्या धंद्याची जी स्थिती दिसून येते तीच या धंद्यात दिसून येते. शेकडो वर्षे बाजारात मिळणारे कच्चे रेशीम रेशमी किड्यापासून मिळणाऱ्या कोशापासून काढलेले असते. हा धंदा चीन व जपान या दोन राष्ट्रांच्या हाती होता. ओसाका व मुंबई येथील कापूस कापडाच्या गिरणीत काम करणाऱ्या मजुरांची जी दु:स्थिती दिसून येते तीच रेशमाचा धागा काढण्यात गुंतविण्यात आलेल्या चिनी व जपानी मजुरांचे बाबतीतही दिसून येते. रेशमाचा धागा काढणाऱ्या जपानी मुलींना पोटापुरता तुकडा मिळतो पण काम मात्र घाम गाळून करावे लागते. रेशमाचा धागा निर्माण करणारे लोक भांडवलवाले असून धागा काढणे, कापड विणणे, बँक चालविणे, वाहतुकीसाठी मालकीची जहाजे बाळगणे अशा सर्व बाजू एकसमयावच्छेदेकरून हाताळण्याची कुवत या भांडवलदारांमध्ये असते. राजकीय क्षेत्रांतही त्यांची सत्ता जबर असल्याने त्यांनी चालविलेली पिळणूक कोणी थांबवू शकत नाही. चीनमधील रेशमाच्या कारखान्यांतही कामाचा रगाडा व मजुरीची काटकसर या गोष्टी सर्रास दिसून येतात. चीनमधील हा धंदा बऱ्याच अंशाने इंग्लिश व जपान यांनी हाताळला आहे. काही थोडा भाग चिन्यांच्या हाती आहे.

अलीकडे रेशमी कापडाचा बराचसा व्यापार रेयॉन् या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कृत्रिम रेशमाने मारला आहे. रेयॉनचा धागा लाकडावर रासायनिक क्रिया करून काढण्यात येतो. कागद तयार करण्यासाठी लाकडाचा तयार करण्यात येणारा पल्प अर्थात लगदा रेयॉनच्या उत्पादनासाठी उपयोगी पडतो. कृत्रिम रेशमाच्या उत्पादनात अमेरिकेने आघाडी मारली आहे. अमेरिकेतील न्यूइंग्लंड व न्यूयॉर्क ही रेयॉन्च्या उत्पादनाची मुख्य केंद्रे आहेत. अमेरिकेच्या दक्षिण संस्थानांतही रेयॉनचे उत्पादन वाढलेले असून उत्तर व दक्षिण यांमधील स्पर्धेमुळे या धंद्यामधील कामगारांची हळूहळू उपासमार होऊ लागली आहे. स्वस्त मजुरीच्या जोरावर जपान व इटली हे दोन देशही या धंद्यात पुढे सरकले होते. रेयॉनच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल या देशांपाशी नसूनही हे देश अमेरिकेशी स्पर्धा करू शकतात. यावरून येथील मजुरीचे दर किती कनिष्ट प्रकारचे असले पाहिजेत याची कल्पना येण्यास हरकत नाही. इटली-जपानमधील सर्व धंदे आता अमेरिकन व इंग्लिश भांडवलदारांकडून हाताळले जाण्याची प्रत्येक शक्यता आहे.

कापूस कापडाच्या उत्पादनाशी लॅंकेशायरचे नाव जसे निगडीत झाले आहे तसेच लोकरीच्या कापडाच्या निर्मितीशी यॉर्कशायरचे नाव निगडीत झाले आहे. सेव्हर्न व ट्वीड् या दोन नद्यांच्या खोऱ्यांमधील या परगण्यामध्ये लोकरीच्या कापडाच्या जितक्या गिरण्या आहेत तितक्या जगाच्या कोठल्याही एका भागात नाहीत. अलीकडे यॉर्कशायरचा लोकरीच्या कापडाचा व्यापार घसरू लागला; याचे मुख्य कारण म्हणजे बाहेरीलच काय पण खुद्द ब्रिटिश साम्राज्यातील काही देशांनीही संरक्षण जकाती बसवून यॉर्कशायरच्या कापडाला आपल्या देशाच्या बाजारपेठा बंद करीत आणल्या आहेत हे होय. अमेरिका, फ्रान्स आणि जर्मनी यांनी आपापल्या देशांतून लोकरीच्या कापडाचे उत्पादन चालू केल्याने इंग्लिश गिरण्या बेताबेताने थंड पडत आल्या. लोकरीप्रमाणेच कातड्याबाबतही अमेरिकेने दक्षता घेतली. इंग्लंडपासून अमेरिका बराचसा कातडी माल खरेदी करत असे. पण स्वत:च्या देशाचे

उत्पादन वाढवून अमेरिकेने या मालाची आयात कमी केली. जर्मनी आणि फ्रान्स कातडी मालाच्या उत्पादनात पुढारलेले देश आहेत. बहुतेक सर्व तऱ्हेचा कातडी माल या दोन देशांकडून जगाला पुरवला जातो. पण गंमत अशी आहे की, या मालाच्या उत्पादनासाठी लागणारे कातडे मात्र या देशांना बाहेरून आणावे लागते. ब्रिटिश साम्राज्यातील हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड अशासारख्या प्रदेशांतून त्यांना कातडी खरेदी करून आणावी लागतात. कातडी कमावण्यासाठी लागणाऱ्या वनस्पतीजन्य पदार्थांवर इंग्लंडचे बरेच मोठे नियंत्रण आहे. कित्येक झाडाच्या सालीपासून ही द्रव्ये मिळतात. टॅनिन या नावाने ओळखले जाणारे द्रव्य बाभूळ अगर हिरडा यांच्या सालीपासून काढण्यात येते. अर्जेंटिनातील जंगलांमधून टॅनिनचे उत्पादन होते. हे उत्पादन ब्रिटिश लोकांच्या हाती आहे. नाताळ व ऑस्ट्रेलिया या दोन देशांतील टॅनिनचे उत्पादनही ब्रिटिशांच्या हाती आहे. कच्ची कातडी व ती कमावण्यासाठी लागणारे वनस्पतीजन्य टॅनिन यांचा भरपूर साठा ब्रिटिश साम्राज्यात आहे. याचमुळे एके काळी कातडी वस्तूंच्या उत्पादनावर ब्रिटिशांचे वर्चस्व होते. कातडी कमावण्यासाठी उपलब्ध झालेल्या नवीन रासायनिक क्रियेमुळे वनस्पतीजन्य टॅनिन मागे पडले. व 'क्रूमियन' या खनिज पदार्थाने त्याची जागा घेतली. याचा प्रत्यक्ष परिणाम ब्रिटनच्या टॅनिनच्या धंद्यावर झाल्याशिवाय राहिला नाही. आम्ले, खटे (ॲसिडस् आणि आल्कलीज्) यांचे संशोधन जसजसे पूर्णावस्थेस जाऊ लागले तसतसे भिन्न गुणधर्मीय असे अनेक जिन्नस बाजारात येऊन पडू लागले. रसायनशास्त्राच्या उदयाने खते, रंग, औषधे, स्फोटके असे एक ना अनेकविध जिन्नस जगाच्या बाजारात वावरताना दिसू लागले. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी या राष्ट्रांनी रासायनिक धंद्याबाबत आघाडी मारली असून या प्रत्येक देशातील रासायनिक धंदे विशिष्ट भांडवलदार वर्गाकडून नियंत्रित केले गेले आहेत. आपापल्या राष्ट्राचे या धंद्यातील वर्चस्व शाबूत राखण्यासाठी त्यांचे जीवापाड परिश्रम चालले असून, आघाडीवर येण्यासाठी रोज नवे संशोधन करण्याचा चंग या प्रत्येक राष्ट्राने बांधला आहे. मनुष्याला चिरजीवन प्राप्त करून देणाऱ्या औषधापासून तो क्षणात प्राण घेणाऱ्या विषापर्यंत संशोधनातील सर्व बाबी हाताळण्याचे काम सुरू आहे. या धडपडीतून साबणे, नेपथ्यसाहित्य यासारखे निरुपद्रवी पदार्थही बाहेर पडत आहेत. तसेच 'टीएन्टी'सारखे भयंकर स्फोटक पदार्थही बाहेर पडत आहेत.

रासायनिक द्रव्याचे उत्पादन वाढविण्याची खटपट अमेरिका, फ्रान्स, इटली आणि जपान यांनी विशेष कसोशीने केली आहे. रासायनिक द्रव्ये बाहेरून आणावी न लागता ती शक्यतो आपल्याच देशात तयार व्हावीत या दृष्टीने जेवढी खटपट करणे शक्य आहे तेवढी त्या राष्ट्रांच्याकडून करण्यात आली आहे. ब्रिटिश साम्राज्यातून येणाऱ्या रासायनिक द्रव्यांना त्यांनी आपले दरवाजे केव्हाच बंद केले होते, व याचा वचपा ब्रिटनने साम्राज्यातील मालाला पहिला मान देण्याचे तत्व अंगिकारून काढला होता. साम्राज्यात तयार होणारा असाच माल त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यात येऊ शके. इतर मालाला संरक्षण जकातीच्या दडपणाखाली वावरावे लागे. जगाची रासायनिक द्रव्याच्या उत्पादनाची शक्ती वस्तुत: त्यांच्या शोषणाच्या दुप्पट आहे. परंतु राष्ट्रीय अर्थवादाच्या घातुक कल्पनेमुळे रासायनिक द्रव्यापासून निर्माण होणाऱ्या अनेक उपयुक्त पदार्थांना बहुजनसमाज मुकत आहे.

लोखंड आणि पोलाद यांच्या उद्योगधंद्यांतही अमेरिका, जर्मनी, इंग्लंड आणि फ्रान्स ही राष्ट्रे पुढारलेली आहेत. एक रशिया सोडून दिला तर या धंद्यातील जादा उत्पादनाचे दुष्परिणाम प्रत्येक देशाला भोगावे लागले आहेत. अमेरिकेचे लोखंड व पोलाद यांचे उत्पादन जर्मनीच्या दुप्पट होते. या धंद्यात युनायटेड स्टेट स्टील कॉरपोरेशन या कंपनीचे वर्चस्व असून बाकी किरकोळ कारखानदार अगदीच मामुली स्वरूपाचे आहेत. खाणीतून निघणाऱ्या कच्च्या लोखंडापासून तो तहत त्याचे प्रचंड यंत्रापर्यंत होणाऱ्या रूपांतरापर्यंत बहुतेक सर्व संस्कार या कंपनीच्या नेतृत्वाखाली होतात. सुपीरियर सरोवराच्या आसपास असलेल्या लोखंडाच्या खाणी या कंपनीच्या स्वामित्वाखाली आहेत.

लोखंड, दगडी कोळसा व चुनखडी या तीन पदार्थांची आवश्यकता लोखंडी सामानाच्या कारखान्यास लागते.

बर्मिंगहॅमपाशी या तिन्ही खाणी असल्याने लोखंडी मालाचा पुरवठा करणारे बर्मिंगहॅम हे मोठे केंद्रच होऊन बसले आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेतील अल्बामा हेही एक मोठे केंद्र आहे. उत्तरेकडील खाणी व लोखंडी कारखाने ज्याप्रमाणे युनायटेड स्टेट स्टील कॉरपोरेशनच्या ताब्यात आहेत त्याचप्रमाणे दक्षिणेकडील भागाच्या उत्पादनावरही तिचेच नियंत्रण आहे. पिट्बर्ग आणि शिकॅगो येथील लोखंडाचे बरेचसे कारखाने मध्यंतरीच्या काळात बंद ठेवावे लागले व बर्मिंगहॅमला तर नुसते कच्चे लोखंडच काढण्याचे काम चालू ठेवावे लागले. याला कारण लोखंडी व पोलादी मालाचे उत्पादन जगातील बहुतेक सर्व देशांत होऊ लागले हेच होय. अमेरिकेत या उद्योगधंद्यांना अवकळा येण्यास राष्ट्रीय आर्थिक स्वायत्ततेची कल्पना कारणीभूत झाली. हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, स्पेन यांसारख्या या धंद्यात मागासलेल्या राष्ट्रांनीही स्वत:चे उत्पादन चालू केले, एवढेच नव्हे तर तेथील सरकारांनी त्यांस संरक्षणही दिले. शिवाय कारखानदारांना प्रत्यक्ष मदतही दिली. इंग्लंडनेही पोलादी सामानावर संरक्षण जकाती बसविल्या व साम्राज्यातील देशांना व्यापारात प्रथम वाव देण्याची कल्पना काढून अमेरिकेचे कॅनडाचे गिऱ्हाईकही बुडविले. कॅनडाला आपला माल इंग्लंडमधून आणावा लागला. या साऱ्याचा परिणाम म्हणून या धंद्यातील शेकडा ३३ लोक अमेरिकेत सतत बेकार राहू लागले. १९३३ साली अमेरिकेचे उत्पादन ८६ टक्क्यांनी घटले व ६० टक्के लोक बेकार झाले. अमेरिकेतील या धंद्याची झालेली दुर्दशा फारच विलक्षण होती.

अमेरिकेपेक्षा युरोपातील उत्पादक तर परराष्ट्रीय व्यापारावर विशेषच अवलंबून असत. १९२६ साली इंग्लंडखेरीज युरोपातील प्रमुख चार उत्पादक राष्ट्रांनी एक आंतरराष्ट्रीय पोलादसंघटना निर्माण केली. आपापले उत्पादन योग्य प्रमाणात नियंत्रित करून चौघांचे मिळून एकूण उत्पादन बाजारातील इतर राष्ट्रांच्या उत्पादनाशी स्पर्धा करून विकावयाचे असा या संघटनेचा उद्देश होता. जर्मनीकडून फ्रान्सच्या ताब्यात गेलेल्या लॉरेनच्या खाणी या संघटनातील सर्व सभासद राष्ट्रांना उपयोगात आणता येणार होत्या. उत्तर फ्रान्स, बेल्जम व ऱ्हूर येथील लोखंड व पोलाद यांच्या उत्पादनात अत्यंत उपयुक्त ठरलेला कोळसा सर्वांना मिळणार होता. ही संघटना अशीच काही दिवस टिकून राहती तर ती बरीच प्रभावी झाली असती. पण मध्यंतरी जर्मनीने आपल्या हिश्यापेक्षा जादा उत्पादन करूनही ते आणखी वाढविण्याची परवानगी मागितली. स्वाभाविकच या चारही राष्ट्रांत उत्पादनाबाबत चुरस होऊन ही संघटना बारगळली. मध्यंतरीच्या काळात इंग्लंड क्रमाक्रमाने आपला व्यापार घालवून बसले होते. चार राष्ट्रांच्या संयुक्त स्पर्धेला तोंड देणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. तशातच वाढते फ्रेंच कारखानेही इंग्लंडला चांगलेच मारक होऊ लागले होते. इंग्लंडने आयातीवर जकाती बसविण्याचे धोरण आखून शेवटी कसाबसा आपला तोल सावरला. लोखंड आणि पोलाद या दोन वस्तू अनेक तऱ्हेच्या कारखान्यांना जन्म देणाऱ्या आहेत. जमीन व समुद्र यांवरून चालणारी वाहतुकीची सर्व साधने या दोन वस्तूंच्या जोरावर निर्माण होत असल्याने, आंतरराष्ट्रीय वाहतुकीमध्ये या दोन पदार्थांवर पडलेला बोजा फार मोठा आहे. जहाजे बांधणे व रेल्वेला लागणारे सर्व सामान तयार करणे यांबाबत राष्ट्राराष्ट्रांत असलेली स्पर्धा फार विलक्षण आहे. इंग्लंड, अमेरिका आणि जपान यांची जहाजे बांधण्याची स्पर्धा आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक महत्वाची बाब होऊन बसली होती. जहाजे बांधण्याच्या चढाओढीत मध्यंतरी इटलीनेही भाग घेतला होता. शांतताकालीन वाहतुकीला आवश्यक अशी कितीतरी जहाजे देशोदेशीच्या बंदरात पडून होती. इंग्लंड जगातील वाहतुकीत असणाऱ्या जहाजांपैकी निम्मी जहाजे स्वत: निर्माण करीत असे. उत्तर इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावरील गोद्यांमधून रात्रंदिवस जहाजे बांधण्याचे काम चाले. पण अलीकडे जपान, जर्मनी, इटली, फ्रान्स इत्यादी सर्व राष्ट्रांनी सरसकट आपल्या गोद्या चालू केल्याने इंग्लिश गोद्या हळूहळू ओसाड पडू लागल्या. वाहतुकीच्या साधनांची जादा निर्मिती ही एक निरुपद्रवी बाब मात्र नि:संशय नव्हती. निरनिराळ्या राष्ट्रांतील भांडवलदारांनी जागतिक पेठा काबीज करण्यासाठी चालविलेल्या गुप्त तयारीचा तो एक भाग होता. इंग्लंडमधील क्लाइड हा विभाग जहाजे बांधण्याच्या दृष्टीने अत्यंत सोयिस्कर असा आहे व त्यामुळे

जहाजे बांधण्याचे जगातील सर्वोकृष्ट केंद्र एके काळी येथे होते. पण आता या केंद्राचा निम्मा भाग ओसाड झाला आहे. चालू महायुध्दाने निरनिराळ्या राष्ट्रांच्या नौकांचा जो नाश झाला आहे तो वजा केल्यास आज शिल्लक राहिलेली जहाजे जगाचा व्यापारी व्यवहार चालू ठेवण्यास खास पुरेशी पडतील. मग असे असताना बुडालेली जहाजे अविश्रांत परिश्रम करून अस्तित्वात का आणली गेली असतील याचे उत्तर सहज मिळण्यासारखे आहे.

यानंतर जमिनीवरील वाहतुकीला उपयोगी पडणारी मोटारी व आगगाड्या यांसारखी साधने विचारात घेणे आवश्यक आहे. जहाजाच्या खालोखाल वाहतुकीच्या बाबतीत रेल्वे फारच उपयुक्त ठरल्या. पण रेल्वेला मागे सारून जमिनीवरील वाहतुकीत मोटारींनी आता आपले अग्रस्थान प्रस्थापित केले आहे. जगाला लागणाऱ्या मोटारीपैकी ८० टक्के मोटारी एकटी अमेरिका पुरवीत असल्याने या धंद्याचा अमेरिकेपुरताच विचार पुरेसा होणार आहे. राष्ट्रीय भरभराटीत एकाच धंद्याचे महत्व जगात दुसरीकडे कोठेही नाही. पण अमेरिकेत मात्र अशी परिस्थिती आहे की अमेरिकेचा एकच मोटारीचा धंदा अमेरिकेच्या आर्थिक भरभराटीचे मूळ होऊन बसला आहे. कापूस, लोकर, कातडी इत्यादी सर्व कच्च्या मालाचे शोषण हा एक धंदा तर करतोच; पण शिवाय अमेरिकेने निर्माण केलेल्या रबराचा ८०% भाग एकटा हा धंदा गिळंकृत करतो. लोखंडी पत्र्यापैकी निम्मा पत्रा व निर्माण होणाऱ्या काचेच्या तावदानांपैकी निम्मी तावदाने या एकाच धंद्यात गडप होतात. शिशाच्या निर्मितीचा तिसरा भाग या धंद्यांत खपतो, तर इतर किरकोळ जिन्नस व खनिज तेले यांचा केवढा तरी साठा या धंद्यात गडप होतो. अमेरिकेतील असंख्य उद्योग-धंद्यांचे मोटारीचा धंदा हा मायपोट नाही असे कोणीही म्हणणार नाही. वाहतुकीस अत्यंत उपयुक्त व टिकाऊ अशा मोटारगाड्या प्रचंड प्रमाणात अमेरिका निर्माण करू शकते. या धंद्यातील फोर्ड्चे नियंत्रण मशहूर आहे. पण अलीकडे फोर्ड्च्या जोडीला जगाच्या इतर भागांतील नावे येऊन बसू लागली आहेत. शेवरोलेट, फियाट्, मर्सीडस् ही नावे आता सर्वश्रुत झाली आहेत. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली या सर्व राष्ट्रांनी मोटारींचे उत्पादन विस्तृत प्रमाणात चालू केले असल्याने फोर्डची मातबरी आता जागतिक बाजारात फारशी राहिली नाही. अमेरिकेतील मोटारीचे कारखाने मिशीगन सरोवराच्या आसपास आहेत. डेट्राइट आणि फ्लिंट ही दोन महत्वाची केंद्रे या विभागात आहेत. काही काळपर्यंत अमेरिकन मोटार कंपन्यांनी १०० टक्के नफा मिळविला आहे; तर मध्यंतरी नफ्याचे प्रमाण शेकडा ३७८ पर्यंत चढले होते. या सर्व नफ्याचे धनी फक्त दोन - हेनरी फोर्ड आणि त्यांचे चिरंजीव. स्पर्धाशील युरोपियन राष्ट्रांचा महायुध्दाने संपूर्ण काटा काढला असल्याने जगाच्या बाजारात आज अमेरिकन कारखानदार व सट्टेवाले मोकाट सुटले आहेत. संपत्ती आणि विजय यांचा दुहेरी संगम झाला असल्याने अमेरिकेने जगावर आर्थिक अधिराज्य गाजविण्याची महत्वाकांक्षा बाळगली असल्यास नवल काय?

लोखंड व पोलाद यांच्या कारखानदारीत युध्दोपयोगी यंत्रसामग्रीचे उत्पादन ही एक मोठीच नफ्याची बाब आहे. 'Profits out of War' हा शब्दप्रयोग या युद्धसाहित्य निर्मितीने व तिच्या व्यापराने अस्तित्वात आणला आहे. युद्ध चेतविणे व युध्दमान राष्ट्रांना युध्दसामग्री विकून फायदा मिळविणे हा पध्दतशीर व्यापार या युरोपियन कारखानदारांनी बेगुमानपणे केला आहे. हिंद-हैद्राबाद तेढीचा फायदा घेणारा हेन्री कॉटन हैद्राबादहून संपत्ती घेऊन गेलाच; पण हिंद-हैद्राबाद संबंधात जादा बिघाड निर्माण करण्यास कारणीभूत झाला. शत्रूराष्ट्राला युध्द अगर यंत्रसामग्री विकून आपल्याच सैनिकांच्या कत्तली उडविण्यापर्यंत काही कारखानदारांची मजल गेली आहे. युध्दसामुग्री निर्माण करणाऱ्या कारखानदारांच्या हालचाली या दृष्टीने कशा चालतात याची कल्पना येण्यास पुढील माहिती खास उपयोगी पडेल.

गेल्या महायुध्दाने एक मोठी गोष्ट युरोपियन समाजाच्या नजरेला आली आणि ती म्हणजे युध्दोपयोगी साहित्य निर्माण करणारे कारखानदार देशाच्या राजकीय उलाढालीत तर लक्ष घालतातच, पण आपले धंदे भरभराटीला आणून नफा मिळविण्यासाठी आंतरराष्ट्रीय तेढ वाढती कशी राहील व राष्ट्राराष्ट्रांकडून युध्दसाहित्याची मागणी कशी येईल या विचारात ते नेहमी गर्क असतात, ही होय. आंतरराष्ट्रीय

व्यापारवृध्दीसाठी त्यांचे गुप्त हेर व प्रतिनिधी सर्व देशांतून असतात. ब्लेसिल् झारापचे नाव आज प्रत्येकाला माहीत आहे. ह्या व्यक्तीचे रहस्यमय जीवन, युध्दसाहित्य निर्माण करणाऱ्या कारखानदारांशी असलेले तिचे सूत आंतरराष्ट्रीय कारभारामध्ये तिने केलेल्या कारवाया, निरनिराळ्या देशांना युध्दसाहित्य पुरविण्याचे घेतलेले मक्ते व मिळविलेली अमर्याद संपत्ती, युरोपियन मुत्सद्यांशी तिचे असलेले खाजगी संबंध ह्या साऱ्या गोष्टी आता जगजाहीर झाल्या आहेत. १९२४ साली ज्यांचे भांडवल सुमारे दहा लाख पौन्डांच्या पुढे आहे असे किती तरी कारखाने इंग्लंडमध्ये होते. ह्या सर्व कारखान्यांमध्ये विकर, आर्मस्ट्रॉंग, कामले लेअर्ड आणि जॉन ब्राउन् ह्या प्रमुख कारखानदारांचे हितसंबंध असत.

ह्या चार कारखानदारांची गट्टी त्या वेळच्या राजकीय गोटात 'आर्मर प्लेट रिंग' या नावाने प्रख्यात होती. ह्याच वेळी फ्रान्समध्येही लष्करी व नाविक सामर्थ्याला उपयुक्त असे साहित्य निर्माण करणारे कारखानदार आपल्या फायद्यासाठी फ्रान्सच्या राजकारणात प्रामुख्याने हालचाल करीत होते. 'शेनीडर', 'ला सो सिते दजा मरे', 'सेंट नाझेर' 'कॅत्तिलान', 'कामेती' इत्यादी कारखानदारांचे पित्ते फ्रान्सच्या राजकारणात लुडबूड करून आपल्या कारखान्यांना धंदा मिळवून देण्याच्या उद्योगात होते. इटली, रशिया आणि जपान यांना लष्करी व नाविक दृष्ट्या सुसज्ज करण्याचे काम इंग्लिश आणि फ्रेंच कारखानदारांनी पत्करले होते, तर इकडे जर्मन क्रप व लोवे कारखान्यांनी इटली व रशियामध्ये इंग्लिश फ्रेन्च कारखानदारांशी टक्कर तर दिलीच; पण शिवाय तुर्कस्थान, बेल्जम व बाल्कन्समध्ये आपले बस्तान बसविले. ह्या कारखानदारांना आपला माल कोणासही विकण्याची मुभा असल्याने प्रत्येक राष्ट्राची लष्करी रहस्ये व प्रत्येकाने खास संशोधन करून काढलेली विशिष्ट शस्त्रास्त्रे यांचा प्रचार सर्वच ठिकाणी होई व त्यांत गुप्तता अशी काहीच राहात नसे. ब्रेन आणि लुई गन् या दोन यांत्रिक बंदुकांबाबत झालेल्या घडामोडी, ब्लेसिल् झाराफने यासाठी स्वीकारलेली आंतरराष्ट्रीय मागणी ह्या याच्याच द्योतक आहेत.

वर्तमानपत्रे व मुत्सद्दी यांना लाचलुचपत देणे, एका राष्ट्राची शस्त्रास्त्रांची मागणी दुसऱ्या राष्ट्राच्या कानावर घालून त्यांच्याकडून मागणीची अपेक्षा करणे इत्यादी अनेक भानगडी हे कारखानदार करीत. एवढेच काय, पण पुढेमागे शत्रूराष्ट्रांत जमा होऊ पाहणाऱ्या कित्येक राष्ट्रांनाही आपला माल विकण्यास हे कारखानदार कमी करीत नसत. १८८४ मध्ये स्थापन झालेल्या 'हावे आंतरराष्ट्रीय पोलाद' मंडळीमध्ये प्रत्येक राष्ट्रांतील कारखानदारांचे प्रतिनिधी होते. आणि त्यांच्याच उपद्व्यापामुळे युरोपातील सर्व राष्ट्रे लष्करी दृष्ट्या एकमेकांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी झगडत होती व हावे कंपनीतील व्यापारी बच्चे आपली 'इरसाल' पोलादी युध्दसामग्री सर्वच राष्ट्रांना पुरविण्याचा स्तुत्य उपक्रम अगदी कसोशीने करीत होते. १८८६ साली लंडनमध्ये स्थापन झालेल्या व महायुध्दाच्या आरंभानंतर थोडक्याच कालात नष्ट झालेल्या 'नोबेल ट्रस्ट' मध्येही जर्मन, इटालियन, फ्रेंच इत्यादी राष्ट्रांचे भांडवल गुंतले होते. या ट्रस्टमार्फत निर्माण होणाऱ्या स्फोटकांची बित्तंबातमी या राष्ट्रांमधून असे आणि तद्देशीय सरकारने युध्दासाठी लागणारे स्फोटक पदार्थ या ट्रस्टमार्फत खरेदी करावेत अशी खटपटही या ट्रस्टमध्ये हितसंबंध असलेल्या लोकांकडून करण्यात येई. गेले महायुध्द सुरू होण्यापूर्वी युध्दसाहित्य निर्माण करणारे चार प्रख्यात कारखाने युरोपमध्ये होते. इंग्लंडमध्ये 'विकर आणि आर्मस्ट्रांग' फ्रान्समध्ये 'शेनीडर' जर्मनीमध्ये 'क्रप आणि स्टम' व रशियामध्ये 'पुटीलाव्हा' या चारही कारखान्यांची आंतरराष्ट्रीय सुताडीगोताडी होती. सर्वसाधारण माणसाची अशी कल्पना असते की युध्दकालात तरी निदान आपापली रहस्ये शत्रूराष्ट्रांना कळू न देण्याची खबरदारी हे कारखानदार घेत असतील, आणि शत्रूराष्ट्राला माल पुरवीत नसतील. आपण तयार केलेल्या विशेष शस्त्रास्त्रांची बातमी शत्रूराष्ट्राला लागू नये म्हणून फार जपत असतील. पण गेल्या महायुध्दाने या नफेबाजांच्या हीन कृत्यांवर चांगलाच विदारक प्रकाश पडला आहे. युध्दाचा वणवा भडकताच अगर भडकण्याचा रंग दिसताच शत्रू मित्र असे क्षुद्र विचार मनातही न आणता, शस्त्रास्त्रांच्या मागण्या स्वीकारण्यासाठी या कारखानदारांचे पित्ते धावलेच म्हणून समजावे! 'गुप्त आंतरराष्ट्रीय करार' या नावाखाली प्रसिध्द झालेली एक पत्रिका म्हणते, दक्षिण

अमेरिकेतील युध्दात बोअर लोकांनी ब्रिटिश शिपायांचा फडशा पाडताना वापरलेल्या रायफली ब्रिटिश कारखान्यांत तयार झालेल्या होत्या. महायुध्दात डार्डनेल्समध्ये ब्रिटिश आणि ऑस्ट्रेलियन सैनिकांची झालेली कत्तल ब्रिटिश तोफांचा उपयोग करूनच करण्यात आली होती; आणि जपानशी निकराने सामना देणाऱ्या चिनी शिपायांची बरीचशी युध्दसामग्री खुद्द जपानच्या कारखानदारांनीच तयार केलेली आहे.

गेल्या महायुध्दात या नमुन्यांची काही रहस्ये बाहेर आल्याने राष्ट्रसंघाने १९२१ साली एक समिती स्थापून तिच्याकडे या प्रश्नाची कसून चौकशी करण्याचे काम सोपविले. या समितीने शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांच्या भानगडीची सर्व घाण बाहेर काढून निकाल दिला- 'युध्दाची प्रवृत्ती वाढीला लागण्यासाठी शस्त्रास्त्राच्या कारखानदारांनी खटपटी केल्या आहेत. एवढेच नव्हे, तर आपापल्या सरकारला युध्दप्रवण करून शस्त्रांची वाढ करण्यास त्यांनी उत्तेजित केले आहे. यांची आंतरराष्ट्रीय संघटना असून राष्ट्राराष्ट्रांतील वैर वाढीला लागून आपणाला धंदा कसा मिळेल याबद्दल ते सदैव जागरूक असल्याचे आढळून आले आहे.' राष्ट्रसंघाच्या समितीनेच हा निर्णय घेतल्याने प्रत्येक राष्ट्रातील सरकारला या प्रश्नाचा विचार करण्याची आवश्यकता भासू लागली व त्या तऱ्हेने काही प्रयत्नही करण्यात आले. राष्ट्रांच्या नि:शस्त्रीकरणाने जागतिक शांततेचा प्रश्न सुटू शकेल अशी राष्ट्रसंघाची कल्पना असल्याने १९३२-३३-३४ या तीन सालांमध्ये जिनेवाला शस्त्रसंन्यास परिषदेची अधिवेशने भरविली जात असत. राष्ट्रसंघाच्या उद्देशपत्रिकेतील पहिलाच मुद्दा असा आहे की, ''राष्ट्रसंघाच्या प्रत्येक सभासदाला राष्ट्रीय युध्दसामग्री जास्तीत जास्त कमी करणे हा एक जागतिक शांतता रक्षणाचा मार्ग आहे ही गोष्ट पूर्णपणे मान्य आहे. राष्ट्रसंघाच्या समितीने प्रत्येक राष्ट्राची भौगोलिक व राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन त्याने कमीत कमी किती युध्दसामग्री बाळगावी याचा निवाडा द्यावा.' खुद्द व्हर्सायच्या तहानेही जर्मनीचे नि:शस्त्रीकरण करताना हाच मुद्दा आपल्या डोळ्यापुढे असल्याचे युरोपियन मुत्सद्यांकडून सांगण्यात आले होते.

सभेमध्ये सांगताना ही गोष्ट जरी सोपी दिसली तरी ती प्रत्यक्ष कृतीत उतरविणे तितकीच कठीण आहे हे राष्ट्रसंघाला लवकरच कळून आले. प्रथम आरमारी सामर्थ्याचा विचार करण्याचे घाटू लागताच जगातील प्रमुख अशा तीन राष्ट्रांची १९२१-२२ मध्ये वॉशिंग्टन येथे परिषद भरली. या परिषदेत अमेरिका, इंग्लंड व जपान या तिन्ही राष्ट्रांनी ठरलेल्या प्रमाणात आपापल्यामधील एकंदर मिळून सत्तर युध्दनौकांचा नाश करण्यास व फिरून दहा वर्षे एकही नवी न बांधण्यास संमती दिली. यानंतर दुसरी नाविक परिषद १९२७ मध्ये जिनेवाला भरली. या परिषदेने क्रूझरांचा प्रश्न विचारात घेण्याचे ठरविले, पण आपल्या क्रूझरांच्या संख्येत काहीही कमी करण्यास ब्रिटनने स्पष्ट नकार दिला. ब्रिटनतर्फे असे सांगण्यात आले की, सुमारे ८० हजार मैल लांबीच्या समुद्रमार्गावर आपले हितसंबंध पसरले असल्याने त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी आपणाला ही संख्या अवश्य आहे; युध्दाशी तिचा संबंध नाही. यानंतर तीन वर्षांनी तिसरी परिषद भरली. मोठ्या घासाघासीने असे ठरविण्यात आले की, अमेरिका व ब्रिटन यांची क्रूझरांची संख्या सारखी असावी. याचा अर्थ हाच की अमेरिकेने फार तर आणखी नवी बांधवावीत. युध्दाची स्मृती जशी मागे पडू लागली तशी शस्त्रसंन्यासाची भाषाही मागे पडू लागली याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. राष्ट्रसंघाने सतत बारा वर्षे शस्त्रसंन्यासाची ओरड चालविली होती आणि इकडे त्याच कालांत सर्व राष्ट्रे आपापला शस्त्रसंभार वाढविण्यासाठी रात्रंदिवस झटत होती. पुढील तुलनात्मक आकडे पाहून कोणासही याची खात्री पटेल. १९३० साली इंग्लंडने ५३ कोटी ५० लक्ष डॉलर शस्त्रसामग्रीसाठी खर्च केले. फ्रान्सने ४५ कोटी ५० लक्ष डॉलर्स खर्च केले, अमेरिकेने ७२ कोटी ८० लक्ष डॉलर्स खर्च केले. १९१३ च्या मानाने या खर्चीत अनुक्रमे शेकडा ३० टक्के , ५० टक्के व २०० टक्के वाढ झालेली आहे.

याचा अर्थ हाच की गेल्या महायुध्दानंतर करण्यात आलेल्या नि:शस्त्रीकरणाच्या वल्गनांचे उगमस्थान अंत:करण नसून जीभ होती. दुसऱ्या महायुध्दाची संभाव्यता कल्पून फिरून युरोपियन राष्ट्रे शस्त्रास्त्राच्या वाढीची शर्यत खेळू लागली होती. १९२० साली राष्ट्रसंघाने

नि:शस्त्रीकरणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सल्लागार समिती नेमली. १९२५ साली सर्व राष्ट्रांची एक शस्त्रसंन्यास परिषद भरविण्याबद्दल वाटाघाटी चालू झाल्या आणि नंतर सात वर्षांनी या कल्पनेला मूर्तस्वरूप आले. या परिषदेला जमलेल्या प्रतिनिधींची राष्ट्रांना शांतता व सुरक्षितता पाहिजे या मुद्यावर संपूर्ण एकवाक्यता होती. त्यांच्यापुढे महत्वाचा प्रश्न होता तो हाच की शांतता आणि सुरक्षितता यांचा लाभ होण्यास अवश्य असलेली नि:शस्त्रीकरणाची योजना प्रत्यक्ष अंमलात कशी आणावयाची? आणि प्रत्येक राष्ट्राची शस्त्रास्त्रांची किमान गरज कशी ठरवावयाची? रशियन प्रतिनिधीचे म्हणणे पडले की प्रत्येक राष्ट्राने तात्काळ सध्या आपल्यापाशी असलेल्या युध्दसामग्रीपैकी ५० टक्के युध्दसामग्री नष्ट करून टाकावी. अमेरिकेचे प्रेसिडेंट हूवर यांनी सुचविले की, शेकडा ३३.३३ म्हणजे तिसरा हिस्सा युध्दसामग्री नष्ट करावी. परंतु ब्रिटनचे म्हणणे पडले की, आपणापाशी असलेले प्रत्येक जहाज आपणाला अत्यंत आवश्यक आहे, त्यात काही कमी अधिक करणे शक्य नाही. कारण लष्करी दृष्ट्या नाही, तरी पोलिस शिपाई म्हणून त्यांची आवश्यकता आहे. ब्रिटनने काढलेली ही सबब म्हणजे जहाजे बांधणाऱ्या कारखानदारांवर निर्बंध घालण्याच्या कामी आपल्यास आलेल्या अपयशाबद्दल प्रदर्शित केलेली कबुलीच होय! शस्त्रास्त्रांचे कारखाने खाजगी मालकीतून काढून ते सरकारने आपल्या मालकीचे तरी करावे अगर प्रत्यक्ष या कारखान्यांच्या व्यवहारावर आपली खास देखरेख तरी ठेवावी असा शस्त्रसंन्यास परिषदेचा अभिप्राय पडला होता. परंतु सरकारने हे कारखाने ताब्यात घेणे म्हणजे या कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या मालाच्या विनियोगाला जबाबदार राहाणे असा प्रकार असल्याने, कोणतेच सरकार ही उसाभर करण्यास तयार नव्हते. शस्त्रास्त्रांचा व्यापार हा राष्ट्रीय व्यापाराचा एक भाग असल्याने तो संपुष्टात आणण्यास कोणते भांडवलशाही सरकार तयार होणार? आपल्या देशातील कारखानदारांनी चालविलेल्या नफेबाजीस हे कारखाने ताब्यात घेऊन आळा घालण्यास कोणतेच सरकार तयार नव्हते असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. खुद्द राष्ट्रीय धोरणाशी विसंगत असे वर्तन या भांडवलदारांकडून होऊनही सरकारने त्याकडे डोळेझाक केली तर काही ठिकाणी त्यांच्या कृत्यांना मूक संमती देऊन सामान्य जनतेची दिशाभूल केली. पुढील काही महितीवरून ही गोष्ट अगदी स्पष्ट होणार आहे.

१९२५ मध्ये आफ्रिकन मोरोक्कोत अबदुल करीमने फ्रेंच सरकारविरुद्ध रीफांना हाताशी धरून लढा चालू केला व आश्चर्याची गोष्ट ही की, त्याने इकडे तिकडे करून गोळा केलेला पैसा घेऊन फ्रेंच कारखानदारांनी त्याला यांत्रिक बंदुका, काडतुसे, विमाने, स्फोटक पदार्थ इत्यादी युद्धसामग्री पुरविली.

जपानने चीनवर हल्ला केला त्यावेळी सर्वच युरोपियन राष्ट्रांनी जपानच्या अघोर कृत्यावर टीकेचा भडिमार केला व चीनलाच फक्त साहाय्य देण्याचे ठरविले. पण इकडे ही युरोपियन मुत्सद्यांची वाचाळता चालू असतानाच तिकडे या राष्ट्रांचे कारखानदार जपानला युद्धसामग्री पुरवून चीनच्या ठिकऱ्या उडविण्याच्या त्याच्या कार्याला हातभार लावीत होते! चीन-जपान युद्धात अमेरिकेइतकी तर चीनच्या वतीने कोणीच तोंडपाटीलकी केली नाही. पण या अमेरिकेतील पेढीवाल्यांनी व कारखानदारांनी जपानच्या पदरात अठरा कोटि डॉलर्सची युद्धसामग्री युद्धाच्या आरंभ कालातच टाकण्यास कमी केले नाही. याच काळात फ्रान्सने यांत्रिक बंदुका व क्रीसाट रणगाडे जपानला पुरविले. इंग्लंडने(सरकार नव्हे) जपानच्या सर्वसाधारण गरजा पुरविल्या. एका इंग्लिश कारखान्यात घडलेला हा प्रकार पहा. या सत्य घटनेला आलेले खेदकारक विनोदी स्वरूप कोणाही सहृदय माणसाला व्यथितच करील.

या ब्रिटिश शस्त्रास्त्रांच्या कारखान्यात चीन व जपानचे प्रतिनिधी एकदमच आपल्या मागण्या नोंदविण्यासाठी गेले. एकमेकांचे अस्तित्व एकमेकांना कळून येताच ते जरा बावरले. पण हळूहळू त्यांच्यात संभाषणाला सुरुवात झाली. कारखान्याच्या व्यवस्थापकांची अशी कल्पना, की चीन-जपानची छोटीशी लढाई पाहण्याचा प्रसंग आपल्यावर येणार, हे प्रकरण लवकरच मुद्द्यांवरून गुद्द्यांवर येणार! पण तसा काहीच प्रकार घडला नाही. दोघांनीही आपापल्या राष्ट्रांमध्ये चाललेली गुद्दागुद्दी विसरून प्रकरण मुद्दयांवर आणले आणि व्यवस्थापकांना युद्धसाहित्याच्या किंमती

फारच चढ असल्याचा आपला निर्णय एकमुखाने सांगितला. दोन राष्ट्रांचे बडे गिऱ्हाईक सोडण्याची कारखान्याची तयारी नसल्याने व्यवस्थापकांनी किंमतीवर चाळीस टक्के सूट देण्याचे कबूल केले आणि दोघेही बहाद्दर आपापल्या मागण्या नोंदवून इसारा पावत्या करून चालते झाले. हैद्राबाद-पाकला पुरवठा करणारे हरीचे लाल येथे निघालेच ना!

याचवेळी जर्मनीही सर्व रासायनिक द्रव्ये जपानला पुरवीत होता. राष्ट्रांना युद्धसामग्री खरेदी करण्यास उत्तेजित करून आंतरराष्ट्रीय स्पर्धा निर्माण करण्यात आपला फायदा आहे हे युद्धसामग्री तयार करणारे कारखानदार ओळखून असल्याने त्यांचा आंतरराष्ट्रीय संघ निर्माण करून परस्परांत स्पर्धा न करता जास्तीतजास्त नफा मिळविण्याचा डाव असतो व त्या तऱ्हेने ते आपले गट निर्माण करीत असतात. गेल्या महायुद्धाप्रमाणेच चालू महायुद्धापूर्वीही असे गट असल्याचे आढळून आले आहे. जर्मनीच्या अमर्याद शस्त्रवाढीमुळे गेल्या महायुद्धाचा दारूण प्रसंग ओढवला याची स्पष्ट कल्पना विजयी राष्ट्रांना युद्धोत्तर कालात आल्याने व्हर्साय तहाने जर्मनीचे संपूर्ण नि:शस्त्रीकरण करण्यात आले व निदान आता शंभर वर्षे तरी फिरून जर्मनी जगाला आपल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर संकटात लोटू शकणार नाही अशी आशा प्रदर्शित करण्यात आली. पण दुर्दैवाची गोष्ट ही की अवघ्या पंचवीस वर्षातच पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने सामर्थ्यवान बनलेला जर्मनी उभ्या जगाला युद्धाच्या खाईत लोटून, कित्येकांचे स्वातंत्र्य छिनाऊन घेऊन, लाखो लोकांचे बळी घेऊन, जगावर स्वामित्व गाजविण्याचा चंग बांधून उभा राहिला व फिरून पतन पावला. याला जबाबदार कोण? याला जबाबदार ''नि:शस्त्र जर्मनी समाजसत्तावादाचे विष पसरेल'' असा बहाणा करून जर्मनीच्या शस्त्रीकरणाला प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने हातभार लावणारे युरोपीयन कारखानदार आणि कारखानदारांच्या या बतावणीला मान्यता देणारे युरोपीयन मुत्सद्दी! युद्धोत्तर कालात लॉरेन प्रांतातील कच्चे लोखंड फ्रान्सने जर्मनीला पुरविल्याचे पुरावे आहेत. ''जर्मनीच्या शस्त्रीकरणाला विकर कंपनी मदत करीत आहे काय?'' या प्रश्नाला उत्तर देताना कंपनीचे चेअरमन हर्बर्ट लॉरेन्स गुळमुळीतपणे म्हणाले, ''यासंबंधी निश्चित शब्दांत जरी मला काही खुलासा करता आला नाही तरी मी एवढे म्हणू शकतो की, आम्ही करीत असलेली गोष्ट सरकारच्या संमतीशिवाय करीत नाही.'' याच कालात लॉर्ड लोदियन उमरावांच्या सभेत म्हणाले, ''जर्मनीला युरोपातील प्रबळ राष्ट्र म्हणून ठेवणे आवश्यक आहे.'' ता.१ जून १९३५ ला इंग्लंड-जर्मनीचा नाविक करार होऊन ब्रिटिश आरमारच्या ३०% आरमारा बांधण्याची हिटलरला मुभा देण्यात आली. त्याचप्रमाणे पाणबुड्यांची संख्याही ब्रिटनइतकीच ठेवण्यास हरकत नसल्याचे सांगण्यात आले. यानंतर जर्मनीची रीश बँक व बँक ऑफ इंग्लंड यांमध्ये कर्जासंबंधी बोलणी सुरू झाली आणि लवकरच त्यांना मूर्त स्वरूप येऊन ७ लक्ष ५० हजार पौंडाचे कर्ज जर्मनीला देण्यात आले. या कर्जाचा विनियोग कशासाठी झाला असेल याची कल्पना मार्च १९३६ मध्ये मि.चर्चिल यांनी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये केलेल्या एका खुलाशावरून येते. ते म्हणाले, ''१९३५ साली हिटलरने ८० कोट पौंड युद्ध सामग्रीवर खर्च केले आहेत. गेल्या तीन वर्षांतील त्याचा या कामी झालेला खर्च दोन अब्ज पौंड आहे.'' याच कालात इंग्लंडच्या शस्त्रास्त्रांच्या व्यापारातही वाढ झाल्याचे आढळून येते. १९३२ व ३३ सालामध्ये मिळून सुमारे अकरा लक्ष टन लोखंड व निकेल जर्मनीमध्ये रवाना करण्यात आले. जर्मनीला नि:शस्त्र करण्याच्या खटपटीत असलेली राष्ट्रे फिरून तो सशस्त्र कसा होईल ही चिंता करीत होती आणि याचे कारण काय? तर समाजसत्तावादी रशियाचे वाढते सामर्थ्य!

युद्धसामग्रीची पैदास करणाऱ्या कारखानदारांची ही कुटिल कारस्थाने अनेक कारणांनी उजेडात आल्याने लाजेकाजेस्तव का होईना, पण काहीतरी देखावा करणे भाग आहे म्हणून इंग्लंड-अमेरिकेने या कारखानदारांच्या व्यवहारांची चौकशी करण्यासाठी चौकशी मंडळे नेमली. जिनेवाला झालेल्या उघड चर्चेमुळे जी लोकजागृती झाली तीमुळे ही उसाभर करणे या दोन्ही राष्ट्रांना भाग पडले असे म्हणण्यास हरकत नाही. ता.१९ जून १९३६ रोजी अमेरिकन व ता.३१ ऑक्टोबर १९३६ रोजी इंग्लिश चौकशी मंडळाने आपले निवेदन सादर केले. अमेरिकन चौकशी मंडळाच्या पुराव्यात वारंवार ब्रिटिश कारखानदारांची नावे

येऊ लागल्यामुळे इंग्लंडलाही हा फार्स करणे भाग पडले. पण तो करीत असताना अमेरिकेइतके आपल्याही चौकशी मंडळाचे पाऊल पुढे पडू नये म्हणून त्यांनी शक्य ती खबरदारी घेण्यास कमी केले नाही. या चौकशी मंडळाच्या सभासदांना कारखानदारांच्या खाजगी व्यवहारात फार खोल जाता येऊ नये इतपतच अधिकार देण्यात आले होते. सभासदांची योजनाही पण अशा रीतीने करण्यात आली होती की सहसा ते जास्त खोलात शिरण्याचा प्रयत्न न करता फक्त वरच्यावर चाळवाचाळव करूनच वेळ मारून नेतील. ही मंडळे नेमण्याचा उद्देश मात्र असा होता की, यांच्या चौकशी-निवेदनावरून हे उद्योगधंदे खाजगी मालकीत ठेवावयाचे की सरकारने आपल्या ताब्यात घ्यावयाचे याचा निर्णय घेण्यात येणार होता. ब्रिटिश मंडळापेक्षा अमेरिकन मंडळाचे अधिकार अधिक विस्तृत होते आणि त्यातील सभासदही नव्या दमाचे आणि चौकस बुद्धीचे होते. या अमेरिकन मंडळाने केलेल्या चौकशीचे जरा अधिक परीक्षण करू.

अमेरिकन चौकशी मंडळाने कारखान्यांचे खाजगी पत्रव्यवहार व इतर कागदपत्र, त्यांचा आरमारी, लष्करी व व्यापारी खात्यांशी असलेला संबंध या साऱ्यांचा मारे झाडून छडा लावून, अनेक साक्षीदारांच्या जाहीर वा खाजगी रीतीने साक्षी घेऊन आपले जवळजवळ १४०० छापील पानांचे निवेदन सादर केले. या मंडळाचे अध्यक्ष सीनेटर 'ने' यांनी त्याला शक्य तितकी प्रसिद्धी देण्याचे सर्व उपाय योजले. ''युद्धातील नफेबाजी नष्ट केल्यास युद्धे होणार नाहीत'' असा स्पष्ट अभिप्राय त्यांनी जाहीर केला. १९१४ सालपासून तो तहत निवेदनाच्या तारखेपर्यंत गोळा करण्यात आलेल्या पुराव्यांवरून असे स्पष्ट दिसून आले की दारूगोळा व शस्त्रे तयार करणाऱ्या कारखानदारांनी देशादेशांतील वैराग्नीत तेल ओतून अमर्याद संपत्ती मिळविली आहे. एवढेच नव्हे, तर या नफेबाजीवर नियंत्रण घालण्यासाठी करण्यात येणारा कोणताही सरकारी प्रयत्न यशस्वी न होण्याची खटपट त्यांनी केली आहे. या कारखानदारांनी व्हर्साय तहाला धाब्यावर बसवून जर्मनीला तर माल पुरविला होताच; पण १९१९ च्या व १९३४ च्या अनुक्रमे चीन व चाको शस्त्रनिर्बंध करारांनाही झुगारून देण्यास कमी केले नव्हते. या कारखानदारांचा आंतरराष्ट्रीय कारखानदार गटाशी संबंध असल्याचेही आढळून आले. जर्मनीसुद्धा इतर सर्व राष्ट्रांतील कारखानदारांशी व्यापार पेठांची वाटणी, किंमती इत्यादीबाबत त्यांचे करामदार झाल्याचे दिसून आले. परस्परांतील स्पर्धा टाळून सामुदायिक नफेबाजी करण्याचे त्यांचे धोरणच जागतिक शांतता व राष्ट्रीय स्थैर्य यांना धोका आणते असा या चौकशी मंडळाचा स्पष्ट अभिप्राय पडला. यावर इलाज म्हणून मंडळाकडून पुढील गोष्टी सुचविण्यात आल्या. (१)युद्धसाहित्य परदेशी पाठविण्यासाठी द्यावे लागणारे परवाने ज्या देशात तो माल जात असेल त्या देशाने तो तेथे येऊ देण्याबद्दल परवाना दिल्याशिवाय देण्यात येऊ नयेत. (२)मालाचे खोटे वर्णन देणाऱ्या चिठ्ठ्या लावून खोट्या पत्त्यावर माल पाठवून केल्या जाणाऱ्या धंद्यावर कडक नजर ठेवण्यात येऊन त्याबद्दल शासनही कडक करण्यात यावे. (दारूगोळा असलेल्या एका बंद खोक्यावर 'पियानोज' अशी चिठ्ठी डकवून फसविल्याची उदाहरणे उघडकीला आली आहेत.) (३)१९३५च्या कायद्यान्वये तयार करण्यात आलेल्या युद्धसामग्री नियंत्रण मंडळाला कारखानदारांकडे येणाऱ्या या मालाच्या मागणीसंबंधीचा वगैरे पत्रव्यवहार पाहण्याचा अधिकार देण्यात यावा. (४)ज्या देशात युद्धसामग्री पाठविण्यात येईल त्या देशाकडून त्या सामग्रीचा विनियोग कोणत्या कारणासाठी होणार आहे याचा खुलासा घेण्यात यावा. (५)मान्यता दिल्या गेलेल्या सरकारलाच फक्त युद्धसामग्री देण्यात यावी व युद्धसामग्रीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण घालण्याच्या दृष्टीने शक्यतो लवकर एखादी निश्चित योजना आखण्यात यावी.

सदर मंडळातील बहुमताच्या सभासदांचे असे म्हणणे पडले की, सरकारने हे कारखाने आपल्या ताब्यात घ्यावेत व इतर राष्ट्रांच्या शांतताकालीन गरजांना पुरेल एवढाच माल त्यांना पुरविण्यात यावा. सदर मंडळाने व त्याच्या नेत्याने कित्येक बाबतीत आपल्या संशोधनाची आघाडी इतकी पुढे ढकलली की अमेरिकन भांडवलदार वर्गात त्यामुळे एकच काहूर उठले. ''जगाला खुनाचे साहित्य पुरविण्याचा अपराध अमेरिकन कारखानदारांनी केला आहे.'' असा खडखडीत आरोप करण्यास या मंडळाने

कमी केले नाही. प्रे.विल्सनपासून त्याने सर्वांची खूपच हजेरी घेतली व त्यामुळे अमेरिकन सीनेटच्या कित्येक सभासदांनीही आपल्या अधिकाराचे अतिक्रमण करून ''मृत व्यक्तींची बदनामी करणारे टोळके'' म्हणून त्यांचा व त्यांच्या या मंडळाचा धिक्कार केला.

काही असो, या चौकशी मंडळाने शस्त्रास्त्रांच्या कारखानदारांच्या आसुरी लालसेवर झगझगीत प्रकाश टाकून बहुजन समाजाच्या या प्रवृत्तींचा उगम कशात आहे याची स्पष्ट कल्पना आणून दिली यात शंका नाही. अमेरिकन चौकशी मंडळाच्या निवेदनाने खुद्द इंग्लंडमध्येही एवढी मोठी गडबड उडवून दिली की कँटरबरी, यार्क, डब्लिन आणि वेल्स येथील चर्चेसनी व इतर कित्येक शांतताप्रिय संस्थांनी शस्त्रास्त्रांच्या कारखानदारांवर व त्यांच्या आंतरराष्ट्रीय हालचालींवर काहीतरी निर्बंध जरूर घाला म्हणून आपल्या विधिमंडळाकडे अर्ज केले. ''राष्ट्राराष्ट्रांतील वैरावर व रक्तपातावर नफेबाजी करणारी माणसे असावीत हे ख्रिश्चन समाजाला व नीतिकल्पनांना घातक आहे. लज्जास्पद तर आहेच आहे.'' असा अभिप्राय त्यांनी आपल्या अर्जात प्रकट केला होता. एखाद्या लोकनियुक्त मंडळाकडे शस्त्रास्त्रांच्या उत्पादनाचे व खरेदीविक्रीचे कार्य सोपविण्यात यावे असेही त्यांचे म्हणणे पडले. परंतु ही सर्व वादळे काही कालानंतर आपोआप शांत झाली व युरोप-अमेरिकेतील कारखानदारांचे अव्यापारेषु व्यापार पुन्हा पूर्ववत चालू झाले. ''युद्धांतून निर्माण होणारा नफा नष्ट झाल्यास जागतिक शांतता नांदेल.'' या उद्देशाने या साऱ्या चौकशी आणि पंचायती झाल्या, पण त्या दृष्टीने प्रत्यक्ष भरीव असे कार्य कोणाकडूनच झाले नाही. फक्त रशिया मात्र धीमेपणाने आपले कार्य करीत होता. सर्वच कारखानदारी रशियन सरकारने आपल्या हाती घेतल्याने चीन तर चीनलाच त्याची मदत मिळे. सरकारी घोषणा ''चीनला मदत'' तर माल जपानच्या पदरात असा प्रकार रशियात घडत नव्हता. शस्त्रसंन्यासाची कल्पना गेल्या महायुद्धात जन्माला आली आणि विसाव्या वर्षी अल्पवयातच मरण पावली अगर मृतवत् झाली म्हणा!

१९१४ ते १९३९ च्या पंचवीस वर्षांच्या कालात वावरणाऱ्या पिढीला आधुनिक कालातील सुसंस्कृत म्हणवणाऱ्या मानव समाजांनी केलेल्या अमानुष कत्तलीचे वैचित्र्यपूर्ण अनेक अनुभव अनुभविण्यास मिळाले. संहाराला जबाबदार कोणाला धरावे हा मोठा प्रश्न आहे. लोकशाही, धर्म, मानव्य यांच्या संरक्षणासाठी रक्तपात करावा लागतो, शांततेसाठी लढाया कराव्या लागतात अशा एक ना अनेक समजुती बहुजनसमाजात रूढ झाल्या; पण १९१४ साली झालेल्या संग्रामापासून तो तहत ३९ साली सुरू झालेल्या संग्रामापर्यंतच्या पंचवीस वर्षांचा इतिहास बारकाईने पाहणाऱ्या व्यक्तीला या अमानुष संहारातील प्रेरक शक्ती ''अर्थ'' आहे हे कळून आल्याशिवाय राहात नाही. अनेक तरुणांची कत्तल उडविण्यास कारणीभूत झालेले दुसरे महायुद्ध या कारखानदारांनी दुहेरी नफ्याच्या आशेने घडवून आणले आहे. लोकशाही त्यात कोठेच नाही.

●●●

७.

जगात उत्पन्न होणाऱ्या अनेकविध वस्तूंचे प्रादेशिक स्वरूप आतापर्यंत चर्चिण्यात आले. वस्तूंचे उत्पादन आणि शोषण यांमध्ये राहाणारे अंतर नष्ट करण्याचे काम वाहतुकीची साधने करीत असतात. इंग्लंडातील मालाचे उत्पादन भारतातील जनतेकडून शोषिले जात असल्यास हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्ये अनिर्बंध वाहतूक निर्माण होणे आवश्यक असते. याचसाठी मध्य कटिबंधातील कारखानदारीत पुढारलेल्या बहुतेक राष्ट्रांनी जगातील सर्व भागांशी दळणवळण प्रस्थापित करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत. ही दळणवळणाची साधने युरोपियन

कारखान्यांप्रमाणेच खाजगी मालकीची असल्याने त्यातही भांडवलशाहीची नफेबाज वृत्ती व स्पर्धा या दोन गोष्टी दिसून येतात. समुद्र, जमीन आणि हवा या तिन्ही मार्गांनी सध्या जगाची वाहतूक चालू आहे. या तिन्ही मार्गांत एकवाक्यता व सहकार्य यांचा संपूर्ण अभाव असून स्पर्धा मात्र भरपूर आहे. नफ्याच्या प्रवृत्तीमुळे वाहतुकीचा अधिक भाग उचलण्यासाठी या तीन क्षेत्रांतील साधनांची परस्पर स्पर्धा जागतिक हिताला बाधक व परस्परांना घातक अशीच झाली आहे. युद्धोत्तर कालात विमान वाहतुकीसंबंधी होऊ घातलेली इंग्लंड-अमेरिकेची स्पर्धा आजच डोळ्यापुढे येऊ लागली आहे. निरनिराळ्या राष्ट्रांच्या आगबोट कंपन्या स्वत:च्या राष्ट्राच्या सरकारी संरक्षणाखाली एकमेकींशी स्पर्धा करीत असतात. नद्या, कालवे यावरून चालणारी वाहतूक व सडकांवरून मोटारीच्या साह्याने होणारी वाहतूक ही रेल्वेशी स्पर्धा करते; आणि विमाने, आगबोटी रेल्वे व मोटारी या सर्वांशीच स्पर्धा करतात.

राष्ट्राराष्ट्रांमध्ये मालाची मोठ्या प्रमाणात ने-आण करण्यात अद्यापि आगबोटीचा मान पहिला आहे. सर्व खंडांच्या भूमीवरून दळणवळण पूर्णपणे प्रस्थापित होणे शक्य नसल्याने व ते होण्याच्या मार्गात अनेक अडथळे असल्याने आंतरराष्ट्रीय वाहतुकीत आगबोटींनी उचललेला भाग अत्यंत मोठा आहे. देशोदेशींच्या बंदरात येऊन पडलेला माल देशाच्या आंतरभागात नेऊन टाकण्याची कामगिरी रेल्वे, मोटारी इत्यादी साधनांना करावी लागते. जमिनीवरील वाहतुकीच्या साधनांना प्रादेशिक महत्व आहे, तर हवा व पाणी यांमध्ये संचार करणाऱ्या साधनांना आंतरराष्ट्रीय महत्व आहे.

आज सातही समुद्रांवर बोटींच्या मार्गाचे जाळे पसरलेले आहे. परंतु या दळणवळणाचे नियंत्रण करणारी एकही आंतरराष्ट्रीय संस्था नाही. जगातील वाहतुकीला पुरून उरणाऱ्या असंख्य बोटी देशोदेशीच्या बंदरात पडून आहेत. आणि त्या त्या देशांची सरकारे या पडीक जहाजांचे नुकसान डोळे मिटून सहन करण्यास तयार आहेत. या पडीक बोटींच्या निर्मितीचा खर्च अप्रत्यक्षपणे राष्ट्रातील बहुजनसमाजाकडून घेतला जात आहे. हे पडीक सामर्थ्य युद्धाच्या निमित्ताने उपयोगी पडेल अशी त्यांची खात्री असते. नवीन जहाजांची बांधणी करणे व त्यांना वाहतुकीत आणणे यासाठी फ्रेंच सरकारने कोट्यवधी फ्रांक्स खर्च केले आहेत. फ्रेन्च सरकारने मल्लीनाथी करताना असा युक्तीवाद अंमलात आणला की, या जहाजांच्या निर्मितीमुळे फ्रान्सचे नाविक सामर्थ्य वाढलेच; पण शिवाय फ्रान्समधील सर्वांत महत्वाचा जो उद्योगधंदा - लोखंड व पोलाद यांचे उत्पादन, त्यालाही उत्तेजन मिळाले. फ्रान्सच्या आरमारवाढीचा उपयोग करून इंग्लंड व जर्मनीतील कारखानदारांनीही आपापल्या सरकारकडून याच स्वरूपाच्या योजना आखून आपले खिसे भरून घेतले. गेल्या महायुद्धापूर्वी अस्तित्वात असलेल्या आरमर प्लेटमधील कारखानदारांच्या लबाड्या तर लक्षात ठेवण्याजोग्या आहेत. जर्मनी आरमाराची वाढ करीत आहे म्हणून इंग्लिश सरकारकडून आरमार वाढीवर पैसा मंजूर करून घ्यावा. लगेच फ्रान्समधील कारखानदारांनी जर्मनी व इंग्लंड यांचे अनुकरण करावे. अशा तऱ्हेने राष्ट्रीय आरमाराची वाढ करण्यासाठी म्हणून बहुजन समाजाच्या खिशातून काढलेला पैसा तिन्ही राष्ट्रांतील कारखानदारांनी आपल्या खिशात घालावा असा राजरोस व्यवहार चालत असे. सामान्य वाहतुकीला अनावश्यक अशा अनेक बोटींची भर बंदराबंदरातून पडत असे. या राष्ट्रांतील सरकारांनी बहुजन समाजाची पिळवणूक करून भांडवलदारांना या जहाजांच्या निर्मितीच्या रूपाने देणग्या दिल्या, यापलीकडे याला अर्थच नाही. जहाजकंपन्यांना सरकारकडून देण्यात येणारा पैसा अनेक मार्गांने देण्यात येतो. फ्रान्सने आपल्या वसाहतींपैकी, मादागास्कर, सोमाली लँड, इंडोचायना वगैरे प्रदेशांशी टपालाचे दळणवळण ठेवणाऱ्या बोटींना भाड्याच्या रूपाने अमर्याद पैसा दिला. टपालबोट हे जहाजकंपन्यांना द्यावयाच्या मदतीचे एक उत्तम साधनच होय. कंपन्यांच्या खजिन्यात देणगीच्या रूपाने ओतला गेलेला पैसा लोकांच्या नजरेस येतो तसा हा अप्रत्यक्ष दिलेला पैसा येत नाही.

भौगोलिक दृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या विचार करावयाचा झाल्यास प्रचंड आरमार बाळगण्याची फ्रान्सला वस्तुत: गरज नाही. अन्नाच्या बाबतीत फ्रान्स जवळ जवळ स्वयंपूर्ण आहे. फ्रान्सला बाहेरून कच्चा मालही फारच अल्प प्रमाणात

आणावा लागतो व ते काम थोड्याफार जहाजांनी भागण्याजोगे आहे. अर्थात फ्रान्सने निर्माण केलेले जादा आरमार हे स्पर्धेसाठी व त्या स्पर्धेतून निर्माण होणाऱ्या युद्धासाठीच आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. इटलीने आरमार वाढविण्याचा असाच आटापिटा केला. भूमध्य समुद्राच्या सान्निध्यामुळे व अनुकूल बंदरांमुळे इटलीला आरमार बांधण्याला बरीच अनुकूलता आहे. इटालियन भांडवलदारांनी आरमार निर्माण केले. मुसोलिनीने त्या आरमाराला काम देऊन साम्राज्यवर्धन केले. जगातील इतर राष्ट्रांशी व्यापारी दळणवळण वाढविले. इटलीने काही काळपर्यंत केलेला आरमारावरील खर्च एका अमेरिकेखेरीज जगातील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राने केला नाही. अबिसीनियासारखा निरपराध देश घशाखाली घालण्यासाठी इटलीने याच आरमाराचा उपयोग केला. अलीकडच्या काळात वाहतुकीसाठी म्हणून इंग्लिश व इटॅलियन नौ-कंपन्यांत चांगलीच स्पर्धा सुरू झाली होती. चालू महायुद्धात या स्पर्धेचा इंग्लिश आरमाराने निकाल लावून टाकला आहे.

पॅसिफिक महासागरात जपाननेही आरमाराच्या वाढीसाठी १८व्या शतकापासून धडपड चालू ठेवली होती. १८९६ ते १८९९ या तीन वर्षांच्या काळात जपानने आरमारावर नेहमीच्या सहा पट खर्च केला आहे. २०व्या शतकात जपानने व्यापारी नौकांची संख्या वाढवून भाड्याचे व वाहतुकीचे दर इतके कमी करून ठेवले की, इतर राष्ट्रांना जपानबरोबर स्पर्धा करणे जवळजवळ अशक्य होऊन बसले. या भानगडीत जपानी कंपन्यांनी तर ठोकर खाल्लीच पण इतर राष्ट्रांनाही झळ लागल्याशिवाय राहिली नाही. जपानमध्ये नौका बांधण्याच्या धंद्याला सरकारकडून प्रत्यक्ष मिळणारी मदत यामुळे कमी करण्यात आली. परंतु अप्रत्यक्षरित्या या धंद्याला हातभार लावण्याचे काम जपानी सरकारने चालू ठेविलेच होते. जगातील इतर राष्ट्रांच्या व्यापारी जहाजांशी वाहतुकीच्या बाबतीत जपानने केलेली स्पर्धा इंग्लंड अमेरिकेच्या डोळ्यात रात्रंदिवस सलत होती. व्यापारी नौकांच्या बाबतीत जपानने अलीकडे तिसरा नंबर मारला होता. पहिले दोन नंबर इंग्लंड व अमेरिका यांचे आहेत. या दोघांच्याही पंक्तीला बसण्याची जपानची धडपड लक्षात घेऊन तिला पायबंद घालण्याची पद्धतशीर खटपट इंग्लंड-अमेरिकेने आरमारी परिषदांच्या रूपाने करून पाहिली आहे. जपानशी पॅसिफिक महासागरात खरीखुरी स्पर्धा करणारे राष्ट्र म्हणजे अमेरिका होय. जपानशी स्पर्धा करीत असताना अमेरिकेचा डोळा ब्रिटिश आरमारावरही असतो हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. चालू युद्ध सुरू होण्यापूर्वी अमेरिकेने आपले आरमार ब्रिटिश आरमाराच्या दोन तृतीयांशावर आणून ठेवले होते. या युद्धातून बाहेर पडणारी अमेरिका इंग्लंडला मागे टाकल्याशिवाय खास राहणार नाही असे म्हणण्यास पुष्कळ जागा आहे. सध्याचे अमेरिकन आरमार जपान आणि जर्मनी या राष्ट्रांच्या तिपटीने असावे. अमेरिका हे जगातील सर्वांत मोठे व्यापारी राष्ट्र असल्याने तिचे व्यापारी आरमारही प्रचंड असावे यात नवल नाही. गेल्या थोड्याच वर्षांत ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांच्या दरम्यान वाहतूक करणाऱ्या अनेक सुंदर व वैभवशाली नौका अमेरिकेने बांधल्या आहेत; व त्यासाठी खर्च झालेला पैसा कोट्यावधी डॉलर्सनी सार्वजनिक पैशातून  उचलला आहे. जुनी जहाजे अडगळीत टाकून नवीन जहाजे वाहतुकीत ठेवण्यासाठी अमेरिकन सरकारने अपरिमित पैसा खर्च केला आहे. अमेरिकेच्या बंदरांतून चालणारी सर्व व्यापारी वाहतूक सर्वस्वी अमेरिकन सरकारच्या हातात दिली असून परकीय व्यापारी नौकांना हा धंदा बंद करण्यात आला आहे. आतापर्यंत या दंडकाचे स्वरूप अमेरिकेपुरतेच मर्यादित होते. पण आता अमेरिकेच्या ताब्यातील सर्व वसाहतींनाच तो लागू करण्यात आला आहे. पॅसिफिक महासागरातील अमेरिकेच्या ताब्यातील अलास्का, हवाई, सामोवा इत्यादी प्रदेशांशी चालणारी सर्व देवघेव अमेरिकन जहाजांतूनच केली जाते. या प्रदेशांत कोणत्याही परकीय राष्ट्राच्या जहाजाला भाडे करता येत नाही.

इंग्लंड हे जगातील सर्वांत मोठे आरमारी राष्ट्र आहे व या राष्ट्राची सारी भरभराटही त्याच्या आरमारावर अवलंबून आहे. इंग्लंड म्हणजे आरमार आणि आरमार म्हणजेच इंग्लंड. देह आणि आत्म्यासारखे या दोहोंचे संबंध निगडीत आहेत. आज शेकडो वर्षे जगातील कोणत्याही राष्ट्रापेक्षा अधिक जागतिक व्यापाराची उलाढाल इंग्लिश

नाविक कंपन्यांनी चालविली आहे. भौगोलिक दृष्ट्या इंग्लंडची परिस्थिति नौकानयनाला सर्वस्वी अनुकूल आहे. कोळसा व लोखंड यांच्या खाणी, दंतूर किनारा, यांमुळे जहाजे बांधण्याच्या धंद्याला लागणारी हरएक प्रकारची अनुकूलता तेथे आहे. इंग्लंडमधील खाड्या वाऱ्याच्या उपद्रवापासून अलिप्त असल्याने जहाजे बांधण्याच्या दृष्टीने पुष्कळच उपयुक्त आहेत. ॲटलांटिक महासागरातील इंग्लंडचे स्थानच असे आहे की, जागतिक व्यापाराला सर्वस्वी अनुकूल असे केंद्र दुसरे नाहीच असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. प्रथम इंग्लंडमध्ये जहाजे बांधणाऱ्या अनेक लहान लहान कंपन्या अस्तित्वात होत्या. जहाजे बांधण्यात व वाहतूक मिळविण्यात त्यांची आपापसात स्पर्धा चाले. पुढे यांपैकी बऱ्याचशा कंपन्या एकत्रित येऊन धंदा करू लागल्या व राष्ट्रीय स्वरूपाच्या मोठ-मोठ्या कंपन्या अस्तित्वात येऊ लागल्या. या प्रचंड कंपन्यांनी इंग्लिश सरकारच्या पाठिंब्याच्या जोरावर इतर राष्ट्रांशी मोठ्या प्रमाणावर स्पर्धा चालू केली; व अल्पावधीतच इंग्लिश कंपन्यांचे साती समुद्रांवर वर्चस्व प्रस्थापित केले. भरभराटीच्या काळात इंग्लिश कंपन्यांनी बांधलेली कित्येक जहाजे मंदीच्या काळात पडून असत. युद्धकाळात या पडीक जहाजांना भाव येई. व कंपन्यांना हे पडीक भांडवल लोकांच्या खिशातून सव्याज वसूल करता येई. चालू काळातील राष्ट्रीय अर्थवादामुळे या पडीक इंग्लिश जहाजांतून केली जाणारी वाहतूक स्वस्त पडण्याची शक्यता असूनही इतर राष्ट्रे स्वत:ची स्वतंत्र अशी जहाजे बांधीत. यामुळे प्रत्येक राष्ट्राकडून सार्वजनिक पैशाचा निरर्थक व्यय होई. या सर्व भानगडीमुळे व्यापारी वाहतूक करणाऱ्या इंग्लिश जहाजांना पुष्कळसे नुकसान पोहोचले व एकेकाळी नाविक वाहतुकीत भरमसाट पैसा मिळविणाऱ्या इंग्लिश कंपन्या क्रमाक्रमाने नुकसानीत येऊ लागल्या. इंग्लिश जहाज कंपन्यांना प्राप्त झालेली ही दुर्दशा नाहीशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने दरसाल वीस लाख पौंड या भांडवलदारांच्या खिशात घालण्याचे ठरविले. साती समुद्रांवर महत्वाची वाहतूक करणाऱ्या कंपन्यांच्या मालकांना अप्रत्यक्षरित्या देण्यात आलेला पैसा याशिवाय निराळाच. गेले महायुद्ध सुरू होण्यापूर्वी थोडेच दिवस सरकारने टपालाची वाहतूक करण्यासाठी जहाजकंपन्यांना खूप पैसा दिलाच; पण शिवाय गतीत जर्मन जहाजांशी स्पर्धा करणारी दोन प्रचंड जहाजे बांधण्यासाठी अत्यंत कमी व्याजात मोठमोठ्या रकमा कंपन्यांच्या पदरात टाकल्या. अशा तऱ्हेची कर्जे ब्रिटिश सरकारने जहाज कंपन्यांना आजपर्यंत अनेकवेळा दिली. हेच उदाहरण डोळ्यापुढे ठेवून पॅसिफिकमध्ये स्वतंत्र आरमार ठेवण्यासाठी म्हणून अमेरिकेने अमेरिकन कंपन्यांनाही भरपूर पैसा दिला. काही समुद्र मार्गांवर ब्रिटिशांचे संपूर्ण स्वामित्व राहावे असे इंग्लिश साम्राज्यवादी लोकांचे धोरण आहे. या समुद्रमार्गांपैकी हिंदुस्थानचा समुद्रमार्ग लक्षात ठेवण्याजोगा आहे. या मार्गावरील जिब्राल्टर, माल्टा, सायप्रस, एडन हे प्रत्येक महत्वाचे ठाणे ब्रिटनच्या ताब्यात आहे. सुवेज कालव्यावरही तिने आपले नियंत्रण प्रस्थापित केले आहे.


जागतिक समुद्रमार्गात सुवेज कालव्याचे महत्व विशेष आहे. पूर्व पश्चिम यांना जोडणारा तो दुवा आहे. इजिप्तवर राजकीय वर्चस्व प्रस्थापित करून मूलत: फ्रेंच कंपनीने तयार केलेल्या या कालव्यावर ब्रिटिशांनी आपले नियंत्रण प्रस्थापित केले आहे. या कंपनीचे फार मोठे शेअर्स इजिप्तच्या खेदिवाकडून डिझरेलीने लाटले ही गोष्ट सर्वश्रुत आहे. जागतिक महत्वाचा कालवा म्हणजे पनामाचा होय. हा कालवा सर्वस्वी अमेरिकेच्या नियंत्रणाखाली आहे. अटलांटिकमधून पॅसिफिकमध्ये जाण्यासाठी सोयीस्कर मार्ग म्हणून 'पनामा' कालवा अत्यंत उपयुक्त आहे. राष्ट्रीय संरक्षणाच्या सबबीवर अमेरिकेने या कालव्याचा संपूर्ण लष्करी बंदोबस्त केला आहे. पण सुवेजप्रमाणेच या कालव्याबाबतही आंतरराष्ट्रीय जहाज वाहतुकीला संपूर्ण मुभा देण्यात आली आहे. पनामा कालव्याच्या विभागात अमेरिकेने गोऱ्या लोकांची वसाहत करविली आहे. ही करत असताना हिवतापाविरुद्ध मोठी मोहीम अमेरिकन सरकारला करावी लागली. तत्पूर्वी निग्रो व तद्देशीय इंडियन लोक यांचा भरणा या प्रदेशात होता. या विभागातील कामधंद्यात युरोपियन लोकांशी ते स्पर्धा करीत असत. कालवा विभागातील उद्योगधंदे गोऱ्या लोकांच्याखेरीज इतरांना मिळू नयेत म्हणून सरकारने कालवा विभाग गोऱ्या लोकांच्या वसाहतीला प्रथम अनुकूल करून घेतला व आता

तेथून काळ्या लोकांचे उच्चाटन केले आहे. आता पनामा कालवा ही सर्वस्वी अमेरिकन बाब होऊन बसली आहे. कालव्याच्या प्रत्येक विभागात आता गोऱ्या माणसाशिवाय माणूस दिसत नाही.

जगातील इतर कोणत्याही उद्योगधंद्याप्रमाणे जहाजांतून होणारी वाहतूक हीसुद्धा एक आंतरराष्ट्रीय बाब व्हावयास पाहिजे. राष्ट्राराष्ट्रांनी स्वतंत्र नौसामर्थ्य अस्तित्वात आणल्याने जागतिक स्वास्थ्याला आवश्यक असणारी वाहतूक दूर राहते व स्पर्धा आणि युद्ध या गोष्टींनाच जास्त महत्व दिले जाते. जहाज कंपन्या इतर वाहतुकीच्या साधनांशी स्पर्धा करतात ते निराळेच. ही स्पर्धा विशेषत: समुद्र किनाऱ्याच्या ठिकाणी रेल्वेशी चांगलीच जाणवते. समुद्रावरील वाहतूक ही थोडीफार स्वस्त पडत असल्याने जमिनीवरील वाहतुकीत रेल्वेचे स्थान बरेच महत्वाचे आहे. रेल्वेना जहाजांपेक्षा राष्ट्रीय स्वरूप अधिक आहे. कारण देश समुद्राने अलग अलग पडल्याने जहाजे आंतरराष्ट्रीय वाहतुकीत जितकी कामगिरी करू शकतात तितकी रेल्वेच्या हातून होऊ शकत नाही. रेल्वेची वाहतूकसुद्धा आतापर्यंत बहुतेक सर्व देशांतून खासगी कंपन्यांच्या मालकीची बाब होती; पण अलीकडे अलीकडे रेल्वे सरकारी नियंत्रणाखाली जाऊ लागल्या आहेत. अमेरिकेतील सुमारे २॥ लाख मैल लांबीची रेल्वे खासगी कंपन्यांच्या ताब्यात आहे. अमेरिकेतील निरनिराळ्या सुमारे १५५ कंपन्यांचा हा व्यवहार असून त्यात मिळणाऱ्या सुमारे १० लाख डॉलर नफ्याचे धनी या कंपन्या आहेत. जगातील कोणत्याही सुधारलेल्या देशापेक्षा अमेरिकेतील रेल्वे अधिक व्यापक आहेत. इंग्लंडमध्येही रेल्वेची भरपूर वाढ झालेली आहे. परंतु या रेल्वेही खासगी मालकीच्या असल्याने त्यासंबंधी लिहिताना डॅड्ले स्टँप म्हणतो, ''इंग्लंडमधील रेल्वेना व्यवस्था व दर्जा असावा तसा नाही.'' राष्ट्रीय उपयोगाची बाब म्हणून तिची वाढ झालेली नाही. याचे कारण म्हणजे रेल्वेवरील खाजगी मालकी हेच होय. १८४४ ते ४७च्या दरम्यान म्हणजे रेल्वेच्या सुरुवातीलाच इंग्लंडमध्ये ६३७ रेल्वे कंपन्या निर्माण झाल्या होत्या व आपापसात निकराने स्पर्धा करीत होत्या. रेल्वे कंपन्यांची ही वाढ व त्यांची परस्परांतील स्पर्धा विचारात घेता वाहतूक ही एक राष्ट्रीय बाब आहे व राष्ट्रीय स्वास्थ्याशी तिचा संबंध आहे या समजुतीने ती घडत असेल असे वाटत नाही. इंग्लंडमधील रेल्वे कंपन्यांची संख्या अलीकडे घटत आली असली तरी वाहतुकीच्या साधनांवरील खाजगी मालकी नष्ट झालेली नाही. गेल्या महायुद्धापूर्वीच रेल्वे कंपन्यांची खाजगी मालकी नष्ट करावी अशी मागणी इंग्लंडमध्ये काही लोकांनी केली होती. युद्धानंतर सर वुइल्यम ऑक्वर्थ म्हणाले, ''रेल्वे कंपन्यांचे एकत्रीकरण करून त्यांची परस्पर स्पर्धा थांबविण्याने लोकांचे समाधान होणार नाही. त्यांचे राष्ट्रीयीकरणच झाले पाहिजे.'' अखेर १९२१मध्ये इंग्लंडमधील चार महत्वाच्या रेल्वे कंपन्यांच्या हाती सर्व रेल्वे वाहतूक गेली व त्यांनी जमिनीवर रेल्वेशी स्पर्धा करणाऱ्या वाहतुकीच्या इतर साधनांना यशस्वीपणे तोंड दिले. इंग्लंड किंवा अमेरिका यांच्याइतके औद्योगिकीकरणात जे देश पुढारलेले नाहीत त्या देशातही खासगी भांडवलदार कंपन्यांचे हाती रेल्वे वाहतूक असून त्यांनी परस्परांतील स्पर्धेने दळणवळणाचा सबंध विचका करून ठेवला आहे. चीनमध्ये तीन स्वतंत्र रेल्वे काम करीत आहेत. दक्षिण मँचूरिया रेल्वे ही ट्रान्ससैबेरियन रेल्वेचा मोठा फाटा आहे. याशिवाय पूर्व चीन रेल्वे ही एक दुसरी रेल्वे कंपनी असून तिच्या व दक्षिण मँचूरियन रेल्वेच्या दोन रुळातील अंतर कमी-अधिक असल्याने दोन्ही रेल्वे एकत्र येऊ शकत नाहीत. तिसरी रेल्वे खुद्द चीन सरकारच्या मालकीची आहे. तिच्यात परकीय भांडवलदारांचा हात आहे. जपान, अमेरिका, इंग्लंड, रशिया यांसारखी अनेक राष्ट्रे धडपडत असल्याने व प्रत्येकाचे हेतू भिन्न असल्याने रेल्वे वाहतुकीच्या बाबतीत चीनइतकी कुचंबणा दुसऱ्या कोणाचीच होत नसेल. १८९४/९५च्या दरम्यान झालेल्या चीन-जपानी लढाईत चीनचा पराभव झाला व चीनचे अवसान परकीय राष्ट्रांना कळून चुकले. तत्काळ दुबळ्या चीनवर अनेक राष्ट्रांची धाड पडली. उत्तर मँचूरियात रशियन रेल्वे कंपनीने बस्तान ठेवले. पोर्ट आर्थरला न्यावयाची रेल्वे जर्मन कंपनीने तयार करून देण्याचे ठरविले. यांगत्सीच्या खोऱ्यातील रेल्वे वाहतुकीचा मक्ता ब्रिटिश कंपन्यांनी घेतला. पेकिंग-हँको रेल्वे तयार करण्यासाठी अमेरिकन कंपनी पुढे आली. याशिवाय १९२० साली फ्रान्स, इंग्लंड,

अमेरिका, जपान या राष्ट्रांनी यापुढे चीनमध्ये होणारी रेल्वे रस्त्याची वाढ करण्यासाठी भांडवल गुंतविण्याची सवलत मिळविली ती निराळीच. चीनप्रमाणेच दक्षिण अमेरिकेचीही स्थिती आहे. दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिनात रेल्वेचे बरेच जाळे आहे. या रेल्वेत इंग्लंड आणि फ्रान्स यांनी आपले भांडवल गुंतविले आहे. ब्रिटिशांच्या ताब्यातील रेल्वेची लांबी १५,००० मैल असून एकूण रेल्वेचा दोन तृतीयांश भाग त्यांच्या हाती आहे. दक्षिण अमेरिकेतील महत्वाची बंदरे रेल्वेने जोडण्यात आलेली आहेत. परंतु येथील रेल्वे कंपन्यांनी केलेली महत्वाची गोष्ट म्हणजे दोन रुळांमधील अंतर सर्व ठिकाणी सारखे ठेवलेले नाही; रुंद, निरुंद आणि मध्यम अशा तीन पद्धतीने रुळांची आखणी करण्यात आली असल्याने तिन्ही पद्धतींतील वाहतुकीची साधने एकमेकांच्या मार्गावर निरुपयोगी ठरतात व एकमुखी राष्ट्रीय स्वरूपाची वाहतुकीची योजना आखणे अशक्य होऊन बसते.

रेल्वे वाहतुकीची सरकारी मालकी आहे अशा काही देशांतूनही रेल्वे वाहतुकीबाबत गोंधळ व अव्यवस्था दृष्टोत्पत्तीला येते. पण त्याला कारण सरकारची मर्यादित स्वरूपाची दृष्टी हेच होय. जगातील रेल्वेच्या लांबीत हिंदुस्थान हे दुसऱ्या नंबरचे राष्ट्र आहे. येथील रेल्वे कंपन्यांची खासगी मालकी आता बऱ्याच प्रमाणात नष्ट झाली असून ती सरकारकडे गेली आहे. पण एके काळी हिंदी सरकार हे प्रातिनिधिक सरकार नसून सर्वस्वी परकीय असल्याने हिंदी रेल्वेची व वाहतुकीची दैन्यावस्था असे. लष्करी हालचाली व इंग्लंडला होणारा कच्चा मालाचा पुरवठा हे हिंदुस्थानातील रेल्वेचे धोरण असल्याने बहुजन हिंदी समाजाला या रेल्वेचे सौख्य फारसे नाही. हिंदुस्थानात रेल्वेवर खासगी व सरकारी अशी संयुक्त मालकीही आहे. त्यामुळे दुहेरी राज्यव्यवस्थेखालील बंगालसारखी हिंदी रेल्वेची स्थिती झाली असल्यास आश्चर्य नाही. यापुढे ही स्थिती राहू नये. ऑस्ट्रेलियात २०हजार मैल लांबीची रेल्वे असून, संस्थानागणिक तिच्यावरील मालकी भिन्न आहे. आपापल्या संस्थानापुरती मर्यादित दृष्टी ठेवून ऑस्ट्रेलियातील रेल्वे बांधण्यात आली असल्याने सामुदायिक राष्ट्रीय स्वरूपात दिसून येणारी एकवाक्यता तेथेही नाही. दिवसेंदिवस संस्थाना-संस्थानांतील परस्पर संबंध व वाहतूक जशी वाढत जाईल तशी ही उणीव अधिक भासल्याशिवाय राहणार नाही. वाहतुकीच्या साधनांतील परस्पर स्पर्धा ही ऑस्ट्रेलियाला चांगलीच जाणवते. जहाज कंपन्या रेल्वे कंपन्यांशी स्पर्धा करतात, व विमा कंपन्या या दोहोंशी स्पर्धा करतात. वाहतुकीचे दर शक्यतो कमी करून गिऱ्हाईक मिळविण्यासाठी या तीन साधनांनी चालविलेली स्पर्धा ऑस्ट्रेलियातील भांडवलदारांना चांगलीच जाणवली. जहाज कंपन्या, रेल्वे कंपन्या, मोटार वाहतूक कंपन्या या सर्वांनी चांगलीच ठोकर खाल्ली व विमान कंपन्यांना तर सरकारला प्रत्यक्ष मदत करून सावरून धरावे लागले. ऑस्ट्रेलियातील वाहतुकीचा धंदा या स्पर्धेमुळे कित्येक वेळी नुकसानीतही चालविला गेला आहे. जमिनीवरील वाहतुकीत मोटारी व रेल्वे यांमधील स्पर्धा ही एक जागतिक महत्वाची बाब होऊन बसली आहे. या स्पर्धेने प्रत्येक देशाला पछाडले आहे. औद्योगिकीकरणात पुढारलेल्या देशांत तर ही स्पर्धा कळसाला पोचली आहे. अमेरिकेमध्ये एकूण रस्त्यांची लांबी ३० लाख मैल आहे. सर्व जगात असलेल्या लांबीच्या मानाने ही लांबी तिसऱ्या हिश्श्याने आहे. आणि या रस्त्यांवरून चालणारी मोटार वाहतूकही जगातील कोणत्याही राष्ट्रापेक्षा जास्त आहे. अगदी अलीकडच्या १५ वर्षात रेल्वेच्या उत्पन्नात ६६ टक्क्यांनी आलेली तूट निव्वळ या मोटारींच्या धुमाकुळाने आलेली आहे. २७० लक्ष लोकांच्या खासगी मालकीच्या मोटारी असून रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या यामुळे झपाट्याने घटत आहे. २५० हजार लोक ट्रक्स बाळगून सामानाची वाहतूक करणाऱ्या धंद्यात गुंतलेले आहेत. यामुळे स्वाभाविकच अमेरिकेतील रेल्वे कंपन्यांचा धंदा आतबट्ट्याचा होऊन बसला आहे. इंग्लंडमध्येही हीच स्थिती दिसून येते. तेथील मोटारींनी रेल्वे कंपन्यांना दरसाल १६० लक्ष पौंड याप्रमाणे ठोकर दिली आहे. जगात उत्कृष्ट प्रकारची रेल्वेपद्धती फक्त जर्मनीत अस्तित्वात होती. ती सरकारी मालकीखाली असल्याने मोटारच्या धंद्याचा फारसा उपद्रव तिला झाला नाही. सुव्यवस्थित रेल्वे वाहतुकीला मोटारच्या स्पर्धेपासून भिण्याचे कारण नाही, हे जर्मनीतील रेल्वेने दाखवून दिले आहे. थोडक्या अंतरावर




न्यावयाच्या मालाची वाहतूक रेल्वेपेक्षा मोटारने करणे फायदेशीर पडते ही गोष्ट काही खोटी नाही. पण निव्वळ या एकाच गोष्टीमुळे रेल्वेचा धंदा सपशेल बुडण्याचे कारण नाही.

काही मागासलेल्या देशांत रेल्वे कंपन्यांनी आपली मक्तेदारी अद्यापि शाबूत ठेवली आहे. अशा देशांतून साध्या रस्त्यांची वाढ होऊ नये म्हणून, रेल्वे कंपन्यांनी पद्धतशीर खटपटी केल्या आहेत. अर्जेंटिना याचे उत्तम उदाहरण आहे. अर्जेंटिनात असलेल्या गवताळ प्रदेशातून जोपर्यंत फक्त जनावरांचीच पैदास होई, तोपर्यंत सडकांची फारशी गरज अर्जेंटिनात भासली नाही. गुराखी ही जनावरे कशीही वळवून शहरांत नेऊन सोडीत. पण अर्जेंटिनात जसजशी शेतीची वाढ होऊ लागली, तसतशी अधिकाधिक सडकांची गरज भासू लागली. 'ब्यूनॉस ऐअरस्' या शहरी मिळणाऱ्या अनेक सडकांचे जाळे अर्जेंटिनात निर्माण होणे आवश्यक होऊन बसले. जुन्या रेल्वे स्टेशनांशी जोडणारे लहान लहान रस्ते वाईट हवेच्या दिवसांत निरुपयोगी होऊन जात. अर्जेंटिनातील रेल्वे कंपन्या बहुतेक परदेशी असल्याने स्टेशनमध्ये येऊन पडणारा माल किती कष्टाने येऊन पडतो याची पर्वा करण्यास त्या तयार नव्हत्या. देशभर चांगल्या सडका बांधून माल वाहतुकीची सोय करण्याचे अर्जेंटिना सरकारने ठरविताच रेल्वे रस्त्याला समांतर दुसऱ्या सडका बांधू न देण्यासाठी अर्जेंटिनातील रेल्वे कंपन्यांनी जंग जंग पछाडले.

मोटारींबरोबरच रेल्वेची स्पर्धा चालते असे नाही, तर देशातील इतरही किरकोळ वाहतुकीची साधने रेल्वेला जाचक होत असतात. नद्या, कालवे, सरोवरे, यांतून चालणारी लहान लहान होड्यांची व जहाजांची वाहतूकही रेल्वेला थोडी बहुत नडतेच. अशा वाहतुकीला जर्मनीची परिस्थिती विशेष अनुकूल आहे. त्यामुळे स्वाभाविकच जर्मन रेल्वेला या वाहतुकीला तोंड द्यावे लागते. ऱ्हाईन नदीतून चालणारी वाहतूक फ्रान्स, स्वित्झरलँड, हॉलंड व जर्मनी इतक्या देशांना उपयोगी पडते व त्यामुळे जागतिक व्यापारात या नदीला प्राप्त झालेले महत्व दुसऱ्या कोणत्याही नदीला नाही असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. जर्मन आणि डच रेल्वे कंपन्यांकडून भाडे मिळविणाऱ्या

बेल्जियम रेल्वेने ऱ्हाईनमधून चालणाऱ्या वाहतुकीला हाणून पाडण्याची खटपट केली. व तिला फ्रेंच रेल्वे कंपन्यांनी बराचसा हातभार लावला. सारमधून येणारा दगडी कोळसा अल्सेस् लॉरेनमधून येणारे लोखंड, दगडी कोळसा, कापड व धान्ये यांची सर्रास वाहतूक पूर्वी बोटींमधून चाले. पण आता ती रेल्वे कंपन्यांनी काबीज केली आहे. रेल्वे कंपन्यांनी आपले दर कमालीचे उतरवून, फ्रेंच आणि बेल्जियम रेल्वेशी सहकार्य केले. ऱ्हूरमधून हंगेरी व युगोस्लाव्हियाकडे होणारी कोळशाची वाहतूक ताब्यात घेतली. ऱ्हाईनच्या खालोखाल पूर्वी डान्यूब मधून वाहतूक चाले. झेकोस्लाव्हियामध्ये होणारी बीटची साखर स्वित्सरलँडमध्ये पूर्वी डान्यूब मार्गाने जाई. पण आता ती रेल्वे कंपन्यांनी ताब्यात घेतली आहे. मध्य युरोपातील डान्यूब व ऱ्हाईन यांखेरीज आणखीही काही नद्या वाहतुकीला बऱ्याचशा देशांना उपयोगी पडतात. पूर्वी ऑस्ट्रो-हंगेरीयन साम्राज्यातील व्हिएन्ना हे राजधानीचे शहर रेल्वेचे मोठे केंद्र समजले जाई. पण या केंद्राची सारी भरभराट एल्ब आणि ओडर या दोन नद्यांतून होणाऱ्या वाहतुकीवर अवलंबून राही. युरोप खंडाच्या मध्यभागी पडलेल्या राष्ट्रांना प्रत्यक्ष किनारे उपलब्ध नसल्याने जहाजांच्या बाबतीत मागे पडण्याचा प्रसंग होता. पण या नद्यांमुळे समुद्रात प्रवेश करणे त्यांना शक्य असल्याने व आंतरराष्ट्रीय वाहतुकीला त्या खुल्या ठेवण्यात आल्या असल्याने या राष्ट्रांना थोड्याफार का होईना पण नौका बाळगणे शक्य झाले आहे. नाहीतर आरमाराचा व त्यांचा संबंधच आला नसता.

जर्मन सरकारने आपल्या हद्दीतून वाहणाऱ्या नदीच्या भागावर वाहतुकीसंबंधी निर्बंध घालताच इतर राष्ट्रांची चांगलीच कुचंबणा झाली. युरोपमधील नद्यांना जोडणाऱ्या कालव्यांतील वाहतुकीवर रेल्वेच्या स्पर्धेचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. विशेषत: इंग्लंडमध्ये हा परिणाम चांगलाच जाणवला. पूर्वी सर्रास खाड्यांतून व कालव्यांमधून चालणारी वाहतूक रेल्वेच्या आगमनापासून खूपच मंदावली. रेल्वेचा सर्रास प्रचार होण्यापूर्वी -म्हणजे सुमारे ५० वर्षांमागे ब्रिटनमधील वाहतुकीत कालव्यांना प्रथम स्थान असे. लिव्हरपूल ते हल् या दरम्यानची सर्व वाहतूक कालव्यांमधूनच चाले. कालव्यांमधून वाहतूक करणाऱ्या अनेक कंपन्याही अस्तित्वात होत्या. वाहतुकीचा स्वस्तपणा, वाहतूकीच्या साधनांना लागणारी अल्प सामग्री या सर्वांमुळे वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना पुष्कळच फायदा होई. दक्षिण लॅंक्शॉयर आणि पश्चिम रायडिंग यांमधील सर्व वाहतूक कालव्यांतून चाले. काळ्या प्रदेशात निर्माण होणाऱ्या लोखंड व दगडी कोळशाची प्रचंड प्रमाणात उलाढाल करण्याचे कामही कालव्यांनाच करावे लागे. औद्योगिक क्रांतीच्या कालात इंग्लंडची सर्व भरभराट या कालव्यांच्या जिवावर अवलंबून होती. पण पुढे रेल्वे कंपन्यांचा उदय झाल्यानंतर कालव्यांवरील वाहतुकीवर चांगलाच परिणाम झाला व वाहतुकीची ही साधने बेताबेताने मोडकळीस आली. १९व्या शतकाच्या शेवटी रेल्वे व कालवे यांच्या वाहतुकीचे प्रमाण १०:१ राहू लागले. काही कालवे रेल्वे कंपन्यांनी स्वत: विकत घेतले. कारण कालव्याचा व्यापार बसताच कालवा कंपन्या रेल्वे काढण्याची भाषा करू लागल्या. तेव्हा त्यांना चूप बसविण्यासाठी म्हणून रेल्वे कंपन्यांनी कालवे विकत घेऊन त्यांना भरपूर पैसा दिला. व पुढे हे कालवे पडीक टाकले. इंग्लंडमधील एकंदर वाहतुकीच्या कालव्यांची लांबी २५०० मैल आहे. यापैकी १००० मैल लांबीचे कालवे रेल्वे कंपन्यांच्या ताब्यात आहेत. इंग्लंडमधील एकंदर वाहतुकीच्या ११% वाहतूक या कालव्यांमधून केली जाते. अमेरिकेमध्येही कालव्यांच्या वाहतुकीला रेल्वेने चीत मारले आहे. अमेरिकेतील सरोवरांच्या आसपासची वाहतूक मात्र अद्यापि टिकाव धरून आहे. सुपीरियर सरोवराच्या प्रदेशात निर्माण होणारा गहू, दगडी कोळसा, लोखंड यांची बहुतेक सर्व वाहतूक कालव्यांमधून केली जाते. या प्रदेशातून पश्चिम संस्थानांकडे वाहणारा मालाचा प्रवाह कालव्यांमधूनच वाहतो. व त्यामुळे राष्ट्रात पद्धतशीररित्या कालव्यांची वाहतूक चालू ठेवल्यास रेल्वेच्या स्पर्धेचा तिला फारसा उपद्रव होत नाही असे दिसून येते. आयर सरोवर व हडसन नदी यांना जोडणारा आयर कालवा अटलांटिक समुद्राच्या किनाऱ्यावर माल आणून टाकण्यास बराचसा उपयोगी पडतो. १८२५मध्ये तयार करण्यात आलेल्या या कालव्यांमधील वाहतूक दर २० वर्षांनी दसपटीने वाढत गेली व अमेरिकन मालाची उठावणी करण्यात न्यूयॉर्क

बंदराला प्राप्त झालेले महत्व या कालव्यामुळे कमी झाले. यानंतर रेल्वेची स्पर्धा सुरू होऊन या कालव्यामधील वाहतूक मंदावली. १८७० मध्ये कालवा व रेल्वे यांचे वाहतुकीचे दर जवळ जवळ सारखे होते. पण पुढे १९००मध्ये रेल्वेने दर इतके कमी केले की, कालव्याची वाहतूक रेल्वेपेक्षा २० पटीने महाग पडू लागली. अगदी अलीकडे वाहतुकीच्या प्रांतात विमानांचा अवतार झाला. वाहतुकीचे अत्यंत जलद साधन म्हणून, विमानाशी दुसरे कोणतेही साधन स्पर्धा करू शकत नाही. टपाल आणि उतारू यांच्या वाहतुकीसाठी रेल्वे व आगबोटी यांच्याशी विमानाची स्पर्धा चालू आहे. कालवे व रस्त्यावरून चालणारी मोटार वाहतूक यांना तोंड देण्याचा ज्याप्रमाणे रेल्वे कंपन्यांनी प्रयत्न करून पाहिला, त्याप्रमाणे या नव्या प्रांतातही थोडेफार नियंत्रण मिळविण्याची खटपट केल्याशिवाय रेल्वे कंपन्यांनी सोडले नाही. विमान कंपन्यांच्या बाबतीत लक्षात ठेवण्यासारखी एक गोष्ट म्हणजे देशोदेशीच्या सरकारांनी आपापल्या आश्रयाखालील कार्यक्षम विमान कंपन्या स्थापन करून, आपल्या देशांचे विमान वाहतुकीचे नियंत्रण परकीय कंपन्यांच्या हाती जाऊ न देण्याची खटपट केली. व यामुळे विमान वाहतूक ही निव्वळ खासगी धंदेवाल्यांची बाब न राहता तिच्यात सरकारी नियंत्रण राहू लागले. साम्राज्यवादी राष्ट्रांनी दूरदूरवर पसरलेल्या आपल्या वसाहतींतील व साम्राज्यातील देशांना एकत्र जोडण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या विमान कंपन्या स्थापन केल्या. जहाज कंपन्यांप्रमाणे साम्राज्यातील देशांचे आकाशमार्गही आखून घेण्यात आले. या मार्गावरून चालणारे दळणवळण अनिर्बंध चालू ठेवण्यासाठी त्या त्या देशांच्या सरकारांना विमान कंपन्यांना भरपूर पैसा द्यावा लागे. माल, उतारू वा टपाल यापासून मिळणारा भाड्याचा पैसा विमान वाहतूकीसाठी ठेवाव्या लागणाऱ्या सर्व साधन सामग्रीच्या दृष्टीने अपुरा पडत असल्याने सार्वजनिक उत्पन्नातील काही भाग काढून सरकारला या विमान कंपन्यांना द्यावा लागे. व तो देत असताना राष्ट्रीय हिताची ही बाब असल्याने असा पैसा खर्च करणे आवश्यक आहे अशी बतावणी करावी लागे. आकाशमार्गात वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी साम्राज्यवादी राष्ट्रांची परस्पर स्पर्धा फार निकराने चालू होती. फ्रान्सने तीन तऱ्हेने आपल्या आकाशमार्गाची आखणी केली. सर्व युरोपियन राष्ट्रांशी दळणवळण प्रस्थापित करणारे आकाशमार्ग, सिरियातून फ्रेंच इंडोचायनाकडे जाणारे आकाशमार्ग, उत्तर आणि पश्चिम आफ्रिका व तेथून दक्षिण अमेरिकेतील ब्राझीलकडे जाणारे आकाशमार्ग अशा तीन मार्गांवर फ्रेंच विमाने ये जा करीत होती. गेल्या महायुद्धानंतर या मार्गांवर वाहतूक करणाऱ्या विमान मार्गासाठी फ्रान्सने १९६० लाख फ्रँक्स खर्च केले होते. खासगी विमान कंपन्यांना फ्रेंच सरकारकडून मिळणारी ही मदत लोकांच्या टीकेला पात्र झाल्यावाचून राहिली नाही. पूर्व आफ्रिका, हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया यांच्याशी दळणवळण ठेवणाऱ्या एका विमान कंपनीला ब्रिटिश सरकारचा हातभार आहे. व आता इंग्लिश सरकार उत्तर अटलांटिकवरील हवाई वाहतुकीत अमेरिकन कंपन्यांशी भागीदारी करू पाहात आहे. चालू महायुद्धानंतर जागतिक विमान वाहतुकीवर प्रभुत्व मिळविण्यासाठी चाललेली ब्रिटिश व अमेरिकन्स यांची धडपड सर्वश्रुत आहेच. हॉलंड, बेल्जम, इटली या लहान राष्ट्रांनीसुद्धा आपल्या साम्राज्यातील प्रदेशांसाठी दळणवळण ठेवणाऱ्या विमान कंपन्यांना हातभार लावला आहे. साम्राज्य नसलेले देशसुद्धा विमान वाहतुकीसाठी कसे तत्पर असत व त्यांचे सुप्त वैमानिक सामर्थ्य किती होते याची कल्पना चालू महायुद्धाने चांगलीच आणून दिली आहे. अमेरिकेमध्ये विमान वाहतुकीचे प्रमाण साऱ्यांत जास्त आहे. अमेरिकन सरकार जरी प्रत्यक्षपणे विमान कंपन्यांना हातभार लावीत नाही; तरी टपालाची वाहतूक करण्यासाठी म्हणून तिकिटाच्या उत्पन्नापेक्षा कितीतरी अधिक पैसा विमान कंपन्यांना दिला जातो. फ्रान्सकडून मिळणाऱ्या रकमेपेक्षाही अमेरिकेची रक्कम मोठी आहे. आंतरराष्ट्रीय वाहतुकीत अमेरिकन वाहतूक सर्वांत अधिक प्रभावी असून एका दक्षिण अमेरिकेत ४०हजार मैल लांबीचे आकाशमार्ग फक्त एका अमेरिकन कंपनीच्या ताब्यात आहेत. अमेरिकेपासून तो तहत ब्यूनॉस एअरस् व सँटीओगापर्यंत सर्व मार्ग एकाच कंपनीच्या ताब्यात असून बाकीचे सर्व मार्ग अनेक कंपन्यांनी चालविले आहेत. आंतरराष्ट्रीय वाहतुकीत प्रभुत्व मिळविण्यासाठी

अनेक राष्ट्रे धडपड करीत आहेत. व ज्याप्रमाणे समुद्र मार्गांच्या वाहतुकीच्या स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय तेढ निर्माण झाली त्याचप्रमाणे आकाश मार्गाच्या बाबतीतही ती होण्याचा संभव आहे. फ्रान्सने वेस्ट इंडियन बेटे व फ्रेंचगिनी यावरून उडणाऱ्या अमेरिकन जहाजांनाच फक्त परवानगी दिली. व एवढ्यासाठी फ्रेंच टपाल अमेरिकेच्या विमानातून फुकट नेले जावे अशी व्यवस्था करून घेतली. ब्राझीलच्या किनाऱ्याने असलेल्या सर्व विमानतळांचा खर्च भागविण्यासाठी जो खर्च लागे तो परस्पर अमेरिकेकडून मिळण्याची सोय फ्रान्सने करून घेतली. लंडन ते कराची हा ब्रिटिशांचा आकाशमार्ग अस्तित्वात आणतानाही अनेक राष्ट्रांच्या अनेक भानगडी निर्माण झाल्या. १९२९ साली इटलीने ब्रिटिश विमानांना आपला देश ओलांडून जाण्याची बंदी केली. १९३०मध्ये ब्रिटिशांनी 'पॅरीस सायगाव' आकाशमार्गातील फ्रेंच विमानांना हिंदुस्थानावरून उडण्याची बंदी केली. प्रत्येक देशाच्या बाबतीत अशा अनेक भानगडी निर्माण होतात. राष्ट्रीय स्वार्थ पुढे ठेवून, जोपर्यंत वैमानिक वाहतुकीकडे राष्ट्रे लक्ष देत आहेत तोपर्यंत या तऱ्हेची भांडणे होणारच. त्याबरोबरच आंतरराष्ट्रीय तेढ वाढतच राहणार. राष्ट्रीय स्वरूपात होणारी वैमानिक दलाची वाढ मानव जातीला उपकारक होण्याची फारशी आशा दिसत नाही.

वाहतुकीच्या साधनांमध्ये हिंदी कंपन्यांचे अस्तित्व क्रमाक्रमाने प्रकट होऊ लागले आहे. हिंद सरकारने वेळेवरच या हालचाली नियंत्रित केल्या नाहीत तर हिंदी कारखानदारी व भांडवलशाही पाश्चात्यांच्या पावलावर पाऊल टाकून गेल्याशिवाय व देशाला संघर्षात खेचल्याशिवाय कधीही राहणार नाही.

●●●

## ८.

चालू युगात साम्राज्यवादी भांडवलदार राष्ट्रांनी आपल्या नफेबाजीसाठी निसर्ग संपत्तीचा कसा अपहार व अपव्यय चालविला आहे याची आतापर्यंत चर्चा केली. भांडवलदार-राष्ट्रांच्या अर्थतृष्णेपुढे पाहता उपद्रव झाला नाही असा भूमीभाग पृथ्वीच्या पाठीवर दिसत नाही. विषुववृत्तीय व दुय्यम विषुववृत्तीय प्रदेशात जमिनीचा असा एकही तुकडा नाही की ज्याला भांडवलदार राष्ट्रांकडून उपद्रव पोहोचला नाही. खनिज द्रव्ये, वनस्पती यांचा उपयोग आपल्या कारखानदारीला करून घेण्यासाठी म्हणून, भांडवलदार राष्ट्रे जगभर धुमाकूळ घालीत आहेत. व गरीब अज्ञ जनतेला आपल्या हाताखाली राबवीत आहेत. देशोदेशींचा मागासलेला मानव समाज मजुरीसाठी ते राबवीत आहेतच, पण शिवाय आपल्या पक्क्या मालाला गिऱ्हाईक म्हणूनही त्याची पिळवणूक करीत आहेत. भांडवलदार राष्ट्रांच्या कुटील कारस्थानांचा खरा उपद्रव आफ्रिकेत पाहावयास मिळतो. या प्रचंड खंडाचा तसूनतसू भाग साम्राज्यवादी राष्ट्रांच्या महत्वाकांक्षेला बळी पडलेला आहे. इटलीने अबिसीनिया गिळंकृत केल्यानंतर टँजीरपासून थेट अगुल्हासपर्यंत विस्तारलेल्या या प्रचंड भूखंडात एकही स्वतंत्र भूभाग दृष्टोत्पत्तीला येत नाही. इजिप्तचे स्वातंत्र्य नामधारी असून तेथे ब्रिटिशांचे वर्चस्व शाबूत आहे. तर लिबोरियाच्या प्रदेशात अमेरिकन रबर कंपन्यांनी प्रस्थान ठेवून त्याला आपला गुलाम बनविला आहे. आफ्रिकेचा बाकी राहिलेला सर्व भाग उरलेल्या १०-१२ युरोपियन राष्ट्रांत वाटण्यात आलेला असून त्यात ब्रिटिशांनी लाटलेला बराच मोठा हिस्सा आहे. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपियन राष्ट्रांनी खरी लूट मिळविली आहे. व्यापारी कंपन्यांनी व्यापाराच्या निमित्ताने प्रथमत: आफ्रिकेत प्रस्थान ठेविले. पूर्व-पश्चिम आणि आग्नेय आफ्रिकेत जर्मन आणि पोर्तुगीज कंपन्यांनी शिरकाव केला. व्यापार करणाऱ्या या कंपन्या हळूहळू मुलूखगिरी करू लागल्या. स्वाभाविकच त्यांचे परस्परांत वितुष्ट येऊ लागले. कित्येक वेळा लुटीच्या

बाबतीत परस्पर संगनमत करून या कंपन्या योग्य विभागणी करून घेत. व कित्येक वेळे हातघाईवरही येत. ब्रिटिशांनी सायप्रसचा ताबा घेतल्यानंतर फ्रेंचांची धुसफूस सुरू झाली. पण ब्रिटिशांनी त्यांना ट्यूनीसचा ताबा घेण्याची परवानगी देऊन तडजोड केली. दक्षिण आफ्रिकेचे युद्ध चालू असता जर्मनीने ब्रिटिशांशी सौदा चालू केला व पोर्तुगिजांच्या वसाहती आपापसात वाटून घेण्याबद्दल भाषा काढली. मोझंबिक व अंगोला यांची वाटणी करण्याचा घाट जर्मनी व ब्रिटन यांनी घातला होता. गेल्या लढाईनंतर जर्मन वसाहती फ्रान्स, इंग्लंड, जपान इत्यादिकांनी कशा लाटल्या हे सर्वांना माहीत आहेच. अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे अबिसीनियाचे देता येईल. इटलीने अबिसीनिया गिळंकृत करण्याचा घाट घालताच फ्रेंच मुत्सद्दी लावल, व इंग्लिश मुत्सद्दी होअर यांनी इटलीला शासन करण्याचे सोडून अबिसीनियाची पद्धतशीर वाटणी करण्याचा डाव टाकला होता. पण इटलीला सबंध अबिसीनियाच गिळंकृत करावयाचा असल्याने हा डाव फसला. आशिया खंडातही युरोपियन राष्ट्रांची ही अरेरावी दृष्टोत्पत्तीस येते. आशियातील बरीचशी श्रीमान व समृद्ध भूमी इंग्लंड व हॉलंड या दोन राष्ट्रांनी प्रामुख्याने लाटली आहे. हिंदुस्थान, ब्रम्हदेश, मलाया, सीलोन हे विभाग ब्रिटिशांच्या ताब्यात असून त्यांचा ताबा मिळविण्यापूर्वी सुरुवातीस ब्रिटिश व्यापारी कंपन्यांनी येथे प्रस्थान ठेवले होते. व या कंपन्यांच्या कारभारातून पुढे ब्रिटिश सरकारकडे या प्रदेशाचे स्वामित्व गेले. ईस्ट इंडिज द्वीपसमूह या नावाने ओळखली जाणारी पॅसिफिकमधील जावा, सुमात्रासारखी समृद्ध बेटे हॉलंडने लाटली होती. तर चीनचा फ्रेंच इंडोचायना हा भाग फ्रान्सने बळकाविला होता. फिलीपाइन द्वीपसमुद्रावर अमेरिकेने मालकी प्रस्थापित केली, तर जपान्यांनी कोरिया, मांचूरिया, फॉरमोसा करीत करीत संबंध चीनवर आफत आणली. अरबस्थान, अफगाणिस्थान, मंगोलिया यांसारखे व्यापारी दृष्ट्या निरुपयोगी प्रदेश या धाडीपासून वाचले आहेत. अफगाणांचे स्वातंत्र्यप्रेम अगर पठाणांची स्वातंत्र्यप्रियता यांना या स्वातंत्र्याचे श्रेय नसून तेथील वाळूच्या व दगडाच्या पिकाला आहे. निसर्गाने या प्रांतांना हिरवे करावे आणि मग युरोपियन लोकांची टोळधाड त्यांच्यावर पडली नाही; तर अरबांच्या आणि पठाणांच्या शौर्याचे कोणीही गोडवे गावेत. गेली जवळ जवळ ५० वर्षे अमेरिका व युरोपियन राष्ट्रे परस्पर सहकार्याने चीनची पद्धतशीर लुबाडणूक करीत होती. आणि महत्वाकांक्षी जपानने तेथे पाय ठेवताच त्यांची कावकाव सुरू झाली. चीनची ४० कोटि प्रजा भुकेकंगाल आहे. लोकांत ऐक्य नाही, राज्ययंत्रात सुरळीतपणा नाही, अधिकारी व लुटारू यांत भेदभाव नाही, अशा या दुबळ्या राष्ट्रांत परकीय कारखानदारांनी हात पाय पसरावे यात आश्चर्य नाही. युरोपियन राष्ट्रांचा व्यापार जपान्यांच्या आगमनामुळे धोक्यात येण्याची परिस्थिती निर्माण होताच चीनसारखे दुबळे राष्ट्र युरोपियनांना एकदम मोठे वाटू लागले. चिनी संस्कृतीने जगाच्या तत्वज्ञानात फार मोठी भर टाकली आहे याची आठवण त्यांना झाली. चीनचे दारिद्रय जपान आल्यानंतर त्यांच्या डोळ्यात जितके भरले, तितके ते यापूर्वी कधीच भरले नव्हते. जपानचा पराभव होईपर्यंत चीनच्या भूमीवर चाललेला लढा युरोपियन आणि जपानी भांडवलदारांमध्ये चाललेला लढा होता. चीनबद्दल दोन्ही पक्षांना लागलेल्या काळजीमुळे चीनचे मात्र मधल्यामध्ये हाल होत होते. या दोघा हितकर्त्यांनी बाजूला होण्यातच चीनचे अधिक हित आहे. चीन अगर हिंदुस्थान यांचे राष्ट्रीय ऐक्याचे, औद्योगिकिकरणाचे प्रश्न समाधानकारक सुटल्यास युरोपियन राष्ट्रांच्या जाचातून त्यांची थोडीफार मुक्तता होणे शक्य आहे. वसाहती, मालकी, यांखेरीज मागासलेल्या देशांवर आक्रमण करण्याचा आणखी एक मार्ग पाश्चात्य राष्ट्रांनी शोधून काढला आहे. आणि तो म्हणजे प्रत्यक्ष राजकीय सत्ता काबीज करीत बसण्याचा प्रयत्न न करता, आर्थिक वर्चस्वाखाली त्या प्रदेशांना नांदावयास लावणे हाच तो प्रकार होय. सयाम आणि इराण या दोन प्रदेशांचे उदाहरण या दृष्टीने लक्षात ठेवण्याजोगे आहे. इराणमधील तेलांच्या खाणी ब्रिटिश भांडवलदारांच्या ताब्यात असून, या भांडवलदारांच्या अरेरावीपुढे इराणचा शहा कोणाच्या खिसगणतीतही नसे. जपानी आक्रमण होईपर्यंत सयामचीही तीच अवस्था होती.

मध्य आणि दक्षिण अमेरिकेत अमेरिकन भांडवलशाहीने आपले व्यापारी व आर्थिक महत्व प्रस्थापित करण्यासाठी अनेक खटपटी केल्या व त्या बऱ्याच अंशाने यशस्वीही

झाल्या. 'मनरो' तत्वांचा पुरस्कार करण्याच्या निमित्ताने अमेरिकन सरकारच्या व भांडवलदारांच्या कारवायांना सक्रीय सहानुभूती दाखविली. अमेरिकन सरकारच्या व भांडवलदारांच्या या हालचाली युरोपियन राष्ट्रांना जाचक झाल्याशिवाय राहिल्या नाहीत. व त्यामुळे स्वाभाविकच अमेरिकेचे आर्थिक धोरण सर्वच राष्ट्रांकडून निषेधार्ह मानले गेले. लॅड्वेल डेनी या गृहस्थाने लिहिलेले अमेरिका कॉंकर्स ब्रिटन हे पुस्तक इंग्लंड, अमेरिकेच्या आर्थिक स्पर्धेची कल्पना आणून देण्यास पुरेसे आहे.

ब्रिटिश, फ्रेंच आणि जर्मन भांडवलाशाह्या दक्षिण अमेरिकेतून आपले समूळ उच्चाटन होऊ नये म्हणून, खटपट करीत होत्या व त्यात त्यांना थोडे यशही पण आले. गियाना होंडूरास व वेस्टइंडीज नावांखाली ओळखली जाणारी बेटे अद्यापि युरोपियन राष्ट्रांच्या वर्चस्वाखाली होती. या युद्धानंतर अमेरिका आपल्या कक्षेतील या प्रदेशातून युरोपियन भांडवलशाहीचे संपूर्ण उच्चाटन केल्याशिवाय राहणार नाही. वसाहती निर्माण करण्याचे प्रयत्न, आर्थिक वर्चस्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न आपल्या कारखानदारीला आवश्यक असा कच्चा माल मिळविण्याचा प्रयत्न व पक्का माल हक्काने खपविण्याचा प्रयत्न या सर्वांमधूनच जागतिक महायुद्धाचा उदय होत असतो. व हे प्रयत्न भांडवलदार वर्गाकडून होत असल्याने महायुद्धांना भांडवलदार वर्गच प्रामुख्याने जबाबदार राहात असतो. हिटलर, मुसोलिनी, टोजो हे जितक्या प्रमाणात अपराधी आहेत तितक्याच प्रमाणांत चर्चिल प्रभृती लोकही आहेत. जित आणि जेते हा विचार बाजूला ठेवून नि:पक्षपाती न्यायासनापुढे यांपैकी कोणालाही उभे करावयाचे म्हटल्यास दोषाचा सारखाच वाटा सर्वांकडे जाईल. त्यांनी केलेल्या जुलमाची क्षेत्रे भिन्न राहतील एवढेच. मुसोलिनीला ॲबिसीनियातील अत्याचाराबद्दल जाब विचारावयाचा झाल्यास चर्चिलला हिंदुस्थानातील अत्याचाराबद्दल विचारावा लागेल.


ॲबिसिनीयामध्ये इटालियन भांडवलदारांनी आपल्या कारखानदारीला अवश्य असे खनीज पदार्थ व कापूस यांच्या निर्मितीला नुकतीच कोठे सुरुवात केली होती. पण ब्रिटिशांनी ॲबिसीनीयाच्या स्वातंत्र्याच्या नावाखाली इटालियन भांडवलदारांचा हा बेत मोडून काढला व आपला एक औद्योगिक प्रतिस्पर्धी नाहीसा केला. ॲबिसीनियाचे स्वातंत्र्य एवढा एकच स्तुत्य उद्देश जर ब्रिटिशांच्या डोळ्यापुढे असता तर हिंदी स्वातंत्र्याचा प्रत्येक प्रयत्न भरडून काढण्याचे अगत्य त्यांना कधीच भासले नसते. खनिज पदार्थांच्या भुकेमुळे जपानी भांडवलशाहीने चीन, मँचुरियावर धाड घातली. तर जर्मनीने पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, रुमेनिया अशी एकामागून एक राष्ट्रे पादाक्रांत केली. या सर्व प्रकारांत चोर कोण व साव कोण हे सांगणे फार कठीण आहे. या स्पर्धेत आधी लूट मारून बसलेल्या राष्ट्रांनी, मागाहून येणारांना फार तर 'डाकू' म्हणावे एवढेच. जगावरील आपले आर्थिक व राजकीय वर्चस्व नवीन पुढे येणाऱ्या राष्ट्रांनी पादाक्रांत करू नये म्हणून इंग्लंड किती जपते हे या दोन महायुद्धांनी चांगलेच दाखवून दिले आहे. नील नाईलचा उगम ॲबिसीनियात आहे. ही नदी ब्रिटिश सूदानचे जीवन असल्याने या नदीच्या उगमावर इटलीची सत्ता प्रस्थापित होणे इंग्लंडला नको होते. स्पेनमधील बऱ्याचशा खाणी ब्रिटिश भांडवलदारांच्या मालकीखाली असल्याने फ्रँकोसारखा जर्मन-धार्जिणा मनुष्य तेथे येऊ नये म्हणून, स्पॅनीश लोकशाहीचा ब्रिटिशांना पुळका आला होता. चीनमध्ये ब्रिटिश मालकीच्या खाणी असल्याने व चीनचा बराचसा व्यापार ब्रिटिशांच्या हाती असल्याने जपानचे आगमन त्यांना दु:सह झाले. यात लोकशाहीचे दिव्यप्रेम कोठेच दिसत नाही. जर्मन भांडवलदारांच्या हातून हिसकून घेतलेल्या वसाहती ब्रिटिश कारखानदारीसाठी राबविण्यात येत होत्या. पाम्, कोको, काही खनिज पदार्थ, कापूस, कॉफी इत्यादी पदार्थांचे उत्पादन या प्रदेशांमधून करून घेण्याचे काम चालू होते. येथील जनतेला जर्मन अगर ब्रिटिश या दोन्ही अमलांतील फरकासंबंधी विचारणा केल्यास काय उत्तर मिळेल हे जरी निश्चित सांगता येत नसले, तरी एका भांडवलशाहीच्या ठिकाणी दुसरी तिची बटीक बनण्यापलीकडे येथील जनता नि:संशय दुसरे काही मिळवू शकली नाही. जर्मनीने या वसाहती व साम्राज्य यांमुळे भांडवलदार वर्गाला अपरिमित नफा होतो; ही गोष्ट नि:संशय आहे. कच्च्या मालाचे उत्पादन व पक्क्या मालाचे शोषण या दोन्ही गोष्टींवर त्यांचे

संपूर्ण नियंत्रण राहिल्याने, या दोन्ही व्यवहारांतून होणारा नफा ऐनजिनसी त्यांच्या पदरात पडतो. याशिवाय परकीय स्पर्धेपासून आपल्या क्षेत्रातील देशांना खास आपल्यासाठी राखून ठेवण्याचा त्यांना अधिकार असल्याने व्यापारी स्पर्धेचे दुष्परिणाम त्यांच्या वाट्याला फारसे येत नाहीत. ब्रिटिश साम्राज्यातील 'इंपीरियल प्रेफरन्स' अर्थात 'साम्राज्यसौलत' हे तत्व लक्षात ठेवण्याजोगे आहे. परकीय मालाला साम्राज्यात वाव सापडू नये म्हणून संरक्षक जकातीची तटबंदी उभी करून ब्रिटिश भांडवलशाहीने साम्राज्याचे प्रचंड कुरण स्वत:ला चरण्यासाठी खास राखून ठेवले आहे. स्वत:च्या आर्थिक नियंत्रणाखाली आणलेल्या प्रदेशांतूनही, भांडवलदारांच्या या कारवाया चालू असतात. क्यूबातील अमेरिकन भांडवलशाहीचे वर्चस्व व अर्जेंटिनातील ब्रिटिश भांडवलशाहीचे वर्चस्व या दृष्टीने लक्षात ठेवण्याजोगे आहे. अर्जेंटिनातील मांस, लोकर, कातडी खुद्द ब्रिटिश साम्राज्यातील या पदार्थांशी स्पर्धा करू शकतात. अर्जेंटिनातील मालाला वाव न ठेवल्यास अर्जेंटिनातील ब्रिटिश भांडवलदारच मरत असल्याने साम्राज्यातील देशाचे खालोखाल अर्जेंटिनातील मालाला ब्रिटिशांना स्थान द्यावे लागते. व अमेरिकेला क्यूबाच्या साखरेबाबतही तेच करावे लागते. प्रत्येक साम्राज्य व आर्थिक नियंत्रणाखालील प्रदेश मिळून एक स्वतंत्र औद्योगिक व व्यापारी गट बनू लागला आहे. अशा गटात परकीय व्यापाराला व कारखानदारीला वाव देण्याची प्रवृत्ती नसल्याने, एका गटातील निसर्ग संपत्तीचे फायदे दुसऱ्या गटातील लोकांना मिळू शकत नाहीत. व त्यामुळे शेवटी असा परिणाम होऊ लागला आहे की या गटा-गटांतील स्पर्धा युद्धे निर्माण करण्याला कारणीभूत होते; नाहीतर सर्वसामान्य जनतेला जागतिक उत्पादनापासून मिळणाऱ्या फायद्यांना तरी मुकविते. आर्थिक राष्ट्रीयवाद हा या अशाच गटबाजीचा परिणाम आहे. परकीय मालाला देशाचे दरवाजे बंद करून, बहुजन समाजाच्या सर्व गरजा भागविण्याचा मक्ता देशातील भांडवलदार वर्गाला देऊन समाजाला नुकसानीत आणण्यात येते. कृत्रिमरित्या उत्पादन करण्यामुळे राष्ट्रीय सरकारला उत्पादकांना हातभार लावण्याचा प्रसंग येतो. सरकार हा पैसा स्वाभाविकच बहुजन समाजाकडून वसूल करते. व त्यामुळे नुकसानीत होणाऱ्या उत्पादनाचा सर्व बोजा अप्रत्यक्षपणे जनतेवर पडतो. भौगोलिक दृष्ट्या एखाद्या जिनसाचे उत्पादन ज्या ठिकाणी जास्तीत जास्त किफायतशीर होते, अशा ठिकाणीच ते करणे श्रेयस्कर आहे. व अशा दृष्टीने व्यापार व उत्पादन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संस्था अस्तित्वात येऊन, जागतिक निसर्ग संपत्तीचे उत्पादन व शोषण पद्धतशीरपणे झाल्यास बहुजन समाज तर सुखी होईलच; पण महायुद्धासारख्या आपत्तीही टळतील. भांडवलशाही युगात मनुष्याच्या हाडीमाशी खिळविण्यात आलेल्या राष्ट्रीयत्वाच्या वर्णभेदाच्या जातीय उच्चनीचतेच्या सर्व कल्पना मोडून काढल्याने ही गोष्ट साध्य होणे शक्य आहे. साम्राज्यवाद, आर्थिक राष्ट्रीयवाद, फॅसिस्टवाद ही सर्व भांडवलशाहीची अपत्ये आहेत व त्यांच्या लीलांनी बहुजन समाज पीडला जात आहे. अप्रत्यक्षरित्या डोईवर बसणारी गुलामगिरी यांमुळे जागतिक बहुजन समाज संत्रस्त झाला आहे.काळ्यांना ज्या हालआपत्ती आहेत, त्याच गोऱ्यांना पण आहेत. पण ही जाणीव गोऱ्या बहुजनसमाजाला फारशी झालेली दिसत नाही. नाही तर गोऱ्या भांडवलशाहीचे गोरे गुलाम, जगभर रक्त सांडीत हिंडले नसते. लष्करी शिस्तीच्या नावाखाली भांडवलशाहीचे गुलाम, बौद्धिकदृष्ट्या अज्ञान समजल्या जाणाऱ्या काळ्या आदमीइतकेच नि:संशय अक्कलमंद असले पाहिजेत. दोहोंच्या गुलामगिरीतील फरक काढावयाचा झाल्यास असे म्हणता येईल की एक युरोपियन भांडवलदारांच्या कारखानदारीखाली भरडून निघत आहे. तर दुसरा लष्करी यंत्राखाली पिळून निघत आहे.

नफ्यासाठी जग धुंडाळणाऱ्या भांडवलदार वर्गाला, आपल्या चौकटीत न बसणारा मानव समाज दृष्टोत्पत्तीला येताच त्याचा समूळ नाश करण्याची चटक लागली आहे. हिंदुस्थान, चीन, सयाम, मलाया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका या प्रदेशांतील कित्येक निरपराधी लोक दारिद्र्य व उपासमार यांना बळी पडले आहेत. त्यांच्यावर लादण्यात आलेली ही आपत्ती बुद्धीपुरस्पर होती असे दिसून आले आहे. पूर्व आफ्रिकेतील रहिवाशांनी सुपीक जमिनीवर शेती करू देण्यास बंदी करून ब्रिटिशांनी त्यांना नापीक प्रदेशात

हाकून दिले व तेथे त्यांचा नाश झाला. अमेरिकेत लाखो रेडइंडियन्सची कत्तल करण्यात आली आहे. दक्षिण आफ्रिकेतील रहिवाशांना शिकारीची बंदी करून त्यांचे निर्वाहाचे नैसर्गिक साधन काढून घेण्यात आले व त्यामुळे गोऱ्यांची गुलामगिरी करण्यापलीकडे त्यांना निर्वाहाचे साधन राहिले नाही. कलहारी वाळवंटातील भटक्या अरबांचा नायनाटही अशाच पद्धतीने करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथील मानवसमाजावरही ब्रिटिश भांडलवदारांनी हीच आपत्ती आणली आहे. टास्मानियातील मूळचा मानव तर आज अजिबात नष्ट आहे. आणखी किती जुन्या मानवसमाजांवर ही आपत्ती ओढवणार आहे हे सांगणे कठीण आहे. भांडवलदारांच्या नफेबाजीमुळे मानवसमाज व निसर्ग संपत्ती यांच्यावर ओढवलेली अनर्थ परंपराही याच स्वरूपाची आहे. काही ठिकाणचे निसर्ग संपत्तीचे झरे आटून जाण्याची वेळ आली आहे. जादा उत्पादनाचे दुष्परिणाम ठिकठिकाणी दिसत आहेत. किमती पडू न देण्याच्या खटपटीमुळे बहुमोल पदार्थ मातीमोल होत आहेत. देशोदेशींच्या सरकार संस्था भांडवलदारांच्या गुलाम बनून, बहुजनसमाजाचा पैसा लुबाडण्याच्या कामी भांडवलदारांना मदत करीत आहेत. साम्राज्ये वसाहती निर्माण करण्यासाठी त्यांच्याशी संगनमत करीत आहेत. आजच्या भांडवलशाही जगात मानवाच्या निसर्गसिद्ध गरजा व त्यांचे निवारण यांसाठी निश्चित व हितकारक अशी योजना नाही. निर्मिती व शोषण यांचा परस्पर संबंध नाही. आजच्या उत्पादनाचा पाया नफा असल्याने या भूगोलावर चाललेल्या मानवाच्या हालचालींना अत्यंत किळसवाणे स्वरूप प्राप्त झाले. व हे स्वरूप स्पष्ट करण्याच्या हेतूने सदर पुस्तक लिहिले आहे.

●●●




जागतिक बहुजनसमाजाचे रक्तशोषण करणाऱ्या अँग्लोअमेरिकन भांडवलशाही जळवा